साप्ताहिक २१ डिसेंबर ८५ / २ रुपये


# माणूस

## तलाक मुक्ती मोर्चा




## आता उठवू सारे रान...

## वाङ्मयीन नियतकालिकांचे कार्य



साप्ताहिक

# माणूस

वर्ष : पंचविसावे
अंक : तिसावा

२१ डिसेंबर १९८५
किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ—श्याम देशपांडे

## शहाबानो प्रकरण

# मूळ प्रश्न विस्तारवादाचा आहे

श्री. ग. मा.

सांगली शहर हे राजकीयदृष्ट्या काँग्रेसपक्षाचा एक बालेकिल्ला. या शहरात हिंदू एकता या संस्थेने पुकारलेल्या 'बंद'ला पूर्णपणे पाठिंबा लाभतो, हे दृश्य बदलत्या लोकमानसाचा एक रोकडा पुरावा म्हणता येईल. समान नागरी कायद्याच्या समर्थनार्थ आणि आणि शहाबानोप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर घडलेल्या अनुचित प्रकारांच्या निषेधार्थ हे सांगली बंदचे आवाहन करण्यात आले होते. (दि. १२ डिसेंबर) शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा, सिनेमागृहे हे सर्व व्यवहार बंद होते व किरकोळ अपवाद वगळता शांतताभंगाचे प्रकारही झाले नाहीत. पोलीस बंदोबस्त चोख होता. बंदच्या आयोजकांचे या यशाबद्दल अभिनंदन केले पाहिजे. कारण शहाबानो प्रकरणाला सध्या जे अनिष्ट वळण लागले आहे, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाविरुद्ध जे रान उठवले जाते आहे, त्याबद्दल पक्ष किंवा धर्म यापलिकडे जाऊन ठोस व शांततापूर्ण मार्गांनी, राष्ट्रीयवृत्तीच्या सर्वच नागरिकांकडून प्रखर निषेध व्यक्त होणे आवश्यकच होते. सांगलीच्या नागरिकांनी हे काम केले. इतरानीही सांगलीचा कित्ता घेऊन असेच शांततापूर्ण निषेधाचे कार्यक्रम योजले पाहिजेत. दरवेळी, दर ठिकाणी बंद हाच कार्यक्रम योजला पाहिजे असे नाही. वृत्तपत्रातून, सभापरिषदातून, मोर्चातून, राज्यकर्त्यांना, याप्रकरणी राष्ट्रीयवृत्तीच्या सर्वसाधारण समाजाची भावना काय आहे, हे दाखवून देणेही पुरेसे आहे. मुबईला शिवसेनेने काँग्रेस शताब्दी अधिवेशनावर मोर्चा नेण्याचा कार्यक्रम जाहीर केला होता. आता तो पुढे ढकलला गेला आहे. पुढे ढकलण्यात गैर काही नाही; तो मागे घेतला गेला तर मात्र ती पिछेहाट ठरेल. काँग्रेस शताब्दी समारोहावर मोर्चा धडकला असता तर हवाच होता. पण उगाच शांतताभंग, गैरप्रकार यानिमित्त होणेही उचित नव्हते. इतरही प्रमुख शहरातून असे छोटेमोठे कार्यक्रम वेळप्रसंग पाहून व्हायला हवेत. दिल्लीत मोमीन परिषदेत भाषण करताना राजीव गांधींनी या सर्व शहाबानो प्रकरणाचा फेरविचार करण्याची तयारी दाखवली. या त्यांच्या भूमिकेचा तीव्र शब्दात धि:कार करणारे पत्रक पुण्याच्या विद्वान–विचारवंतांनी काढले; पुणे–मुबई येथील वकिलांच्या संघटनेनेही राजीव गांधी यांच्या या फेरविचार आश्वासनाचा पत्रके काढून निषेध केला आहे. अशा प्रतिक्रिया इतर क्षेत्रातून का उमटू नयेत ? काँग्रेसवाले उघडपणे हे करणार नाहीत. कारण पक्षशिस्तीचा प्रश्न असतो. पण बहुसंख्य काँग्रेसवाल्यांचा मनापासून या सुप्रीम कोर्ट निर्णयाला पाठिंबाच आहे. इतर विरोधीपक्ष–विशेषत: भाजपसारखे मूळचे हिंदुत्ववादी पक्ष, यात उघडपणे व मोठ्या प्रमाणावर पुढा-

कार घेऊ शकतात. तसा त्यांनी तो घेतलेला अजून तरी दिसत नाही. रा. स्व. सघाच्या मंडळींनी केरळात वगैरे काही परिसंवाद घेतल्याच्या बातम्या आहेत. इतरही सांस्कृतिक–आर्थिक संघटनानी आपली अलिप्तता सोडून सुप्रीम कोर्टाने दिलेला निर्णय मागे घेतला जाऊ नये म्हणून प्रयत्न करायला हवेत. फाळणीपूर्वी देशात जसे वातावरण मुस्लिम लीगने निर्माण केले होते तशी हवा आज पुन्हा दिसते आहे. हे १९४५–४७ साल नाही, तो इतिहास घडून गेला, पुन्हा ती वेळ येणार नाही अशा भ्रमात, निदान राष्ट्रवादी जनतेने तरी राहू नये. याचा अर्थ जो मुसलमान आहे, अल्पसंख्याक आहे त्याच्याकडे संशयाने, अविश्वासाने पाहाणे असा नाही. पण मुबईत सुप्रीम कोर्ट निर्णयाच्या निषेधार्थ, अगदी नवख्या पुढाऱ्यांनी संघटित केलेल्या मोर्चात लाखभर मुस्लिम सामील होतात आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळाने योजलेल्या तलाक मुक्ती मोर्चावर नगरसारख्या शहरात दगडफेक होते, मोर्चाला माघार घ्यावी लागते, ही वस्तुस्थितीही दृष्टिआड करणे शहाणपणाचे नाही. आर्थिक परिस्थिती सुधारली म्हणजे शरियतवाद्यांचा जोर कमी होईल या डाव्या आशावादातही फारसे तथ्य नाही. केरळात मध्यपूर्वेतून खूप पैसा आल्यावर तेथे मुस्लिम धर्मवाद कमी होण्याऐवजी उलट वाढतच गेला. आता खुद्द कॉम्रेड नंबुद्रीपाद महाशयच या धर्मवादाविरुद्ध लढण्याची भाषा उच्चारत आहेत. तेव्हा प्रश्न आर्थिक मागासलेपणाचा नाही– तो जरूर कमी व्हावा; प्रश्न कमी शिक्षणाचा नाही– ते जरूर वाढावे. प्रश्न आहे राजकीय विस्तारवादाचा– सत्तासंघर्षाचा. म्हणून तो राजकीय पातळीवरच हाताळला जाणे आवश्यक आहे. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न तरी मुळात काय आहे ? काही प्रमाणात पूर्वेकडील ख्रिश्चन आणि बहुतेक ठिकाणचा मुस्लिम समाज अलगतावादी भूमिका घेत आहे. बहुसंख्य शीख खलिस्तानवादी नव्हते– आजही नाहीत. दक्षिणेकडचे एकही राज्य आज आपल्याला फुटून निघायचे आहे असे म्हणत नाही. दलितांना वेगळे दलितस्थान हवे, असे एखादाच वेडापीर अधुनमधून बोलत असतो. तेव्हा राष्ट्रीय एकात्मता म्हणजे मुख्यत: मुस्लिम–ख्रिश्चन अलगतावादाशी मुकाबला. याविषयी गुळमुळीत बोलायचे आणि उगाच एकात्मतेवर गोलमाल प्रवचने–भाषणे ठोकायची, परिसंवाद भरवायचे, पदयात्रा काढायच्या, हा निव्वळ वेळेचा, शक्तीचा अपव्यय आहे. मुस्लिम धर्मांधतेविरुद्ध हल्लीहल्ली बरेच परखड लिहिले–बोलले जाते, हे खरे आहे. पण इथेही एक समजुतीचा घोटाळा किंवा मखलाशी आहे. मुस्लिम समाज धर्मांध आहे म्हणून विस्तारवादी, अलगतावादी आहे हे फारसे खरे नाही. धर्मावर बिलकूल विश्वास नसणाऱ्या, पूर्ण सेक्युलरवादी जिनांनीच शेवटी पाकिस्तान निर्माण केले. जेथे मुस्लिम अल्पसंख्य आहेत तेथे प्रथम मुस्लिम बहुसंख्या निर्माण करायची आणि बहुसंख्या झाली की स्वतंत्र राज्याची मागणी व स्थापना, असा हा मुस्लिम राजकारणाचा पूर्वापारचा प्रवास आहे. या प्रवासाची प्रेरणा मुस्लिम समाजाला त्याच्या धर्मातून मिळते. कारण या धर्माने जगाचे फक्त दोनच भाग कल्पिले आहेत. दारूल हरब आणि दारूल इस्लाम. हरबचे म्हणजे बिगर मुस्लिम जगताचे इस्लाममध्ये रूपांतर करणे ही मुसलमान समाजाची आद्य प्रेरणा आहे. हे इस्लामचे गतीतत्त्व आहे व ते नीट ध्यानात न घेता, केवळ त्याच्या शरियतनिष्ठेवर तोफा डागण्यात काही अर्थ नाही. आपला, राष्ट्रीय एकात्मतावाद्यांचा विरोध या मूळ गतीतत्त्वाला, यातील सुप्त विस्तारवादाला असला पाहिजे. इस्लाम न मानणाऱ्या राज्यात बरोबरीच्या नात्यानी, लोकशाही पद्धतीने राहण्याची सवयच या समाजाला नाही. हिंदुस्थानात तसे राहावे लागणार आहे. त्यामुळे खळबळ आहे, अस्वस्थता आहे, अलगतावाद पुन्हा पुन्हा डोके वर काढतो आहे. भोगळ उदारमतवाद किंवा एकांगी अर्थवाद स्वीकारून आपण इस्लामी राजकारणाच्या या मूळ प्रवाहाकडे दुर्लक्ष करू तर एकच काय, डझनभर पाकिस्ताने आपल्याला तोडून द्यावी लागतील. पाहता पाहता, आपल्या अगदी डोळ्यादेखत सायप्रसमध्ये वेगळे तुर्की राज्य अस्तित्वात आलेच की नाही ?

**नवा इतिहास घडवत असता**


याचा अर्थ येथील बहुसंख्य व अल्पसंख्य समाजासमोरील इतर समस्यांकडे दुर्लक्ष करावे असा नाही. येथे, दोन्ही समाजात आर्थिक–सामाजिक विषमता आहे, शैक्षणिक मागासलेपण आहे. याविरुद्ध उपाययोजना करणे– लढा देणे, या समस्या सामाजिक न्यायाच्या, समतेच्या दृष्टिकोनातून सोडवण्याचा प्रयत्न करणे, ही येथल्या राष्ट्रवादी, एकात्मतावादी धुरिणांची जबाबदारी निश्चितच आहे. पण ही जबाबदारी पार पाडत असताना मूळ प्रश्न झाकून ठेवणे, किंवा तो नाहीच अशी समजूत करून घेणे किंवा एकदा शोषणमुक्त, समानतावादी समाज अस्तित्वात आला की, हा प्रश्न आपोआप विरघळून जाईल अशा भ्रमात राहणे, हेही फार धोकादायक आहे. नवा इतिहास घडवत असताना जुन्या

इतिहासाचे प्रवाहही ध्यानात घ्यावे लागतात. हे प्रवाह काय सांगतात ? एका इतिहासविवेचकाचे मत येथे नोंदवून ठेवणे आवश्यक वाटते. हा इतिहासविवेचक पेशवाई विरोधक म्हणून प्रसिद्ध होता, हे जाणत्यांना तरी माहित असावे. १९४७ मध्ये त्यांनी हे मत नोंदवले आहे. ' रसना ' म्हणून एका नियतकालिकाच्या दिवाळी अंकात इतिहासकार त्र्यं. शं. शेजवलकर यांची एक मुलाखत प्रसिद्ध झालेली होती. शेजवलकरांना प्रश्न विचारण्यात आला तो असा होता– ' हिंदू मुसलमान प्रश्न सोडविण्याचे इतिहासात कोणकोणते प्रयत्न झाले ? त्यातील कोणता प्रयत्न, पुरोगामी विचारसरणी न सोडताही, आजच्या कालास विशेष मार्गदर्शक ठरेल ?' शेजवलकरांचे लिखित उत्तर असे–

' शाहूच्या मार्गाने हिंदुस्थान दुबळा होऊन त्यात दुफळी झाली. आज तोच मार्ग गांधींनी अवलंबिल्यामुळे हिंदुस्थानची छकले झाली, व यादवी ही आता कायमचीच पाठीस लागणार आहे. या सर्व अनर्थाचे कारण एकच व ते म्हणजे अनैतिहासिक, आत्मानात्म विवेकावर उभारलेली राजकीय विचारसरणी. शिवाजीचा ऐतिहासिक मार्ग स्वीकारण्याची बुद्धी हिंदुस्थानला होणार नसेल तर हिंदूंचे रक्षण काळच करणार असेल तर असो !

' शिवाजी म्हणजे पाचशे वर्षांच्या हिंदु मुसलमान लढ्याचा अन्वयार्थ समजलेला एकमेव कर्ता पुरुष; मुसलमानी संस्कृतीतील सर्व उत्तम अंगे आत्मसात केलेला एक पराक्रमी वीर; हिंदुत्वाचा नितांत अभिमान उचललेला एक धर्मनिष्ठ माणूस; बापाच्या पंधरावीस वर्षांच्या धडपडी पाहून, चार राज्यांच्या बंदीत राहून शहाणपणा शिकलेला मुत्सद्दी होता. माणसांची पारख त्यास उपजतच होती. ' व्रजन्ति ते मूढधियः पराभवं, भवन्ती मायाविषु ये न मायिनः ' हे भारवीचे वचन डोळ्यांसमोर ठेवून, त्याने कधीही फसवून न घेण्याचा निश्चय केला. हिंदूंचा सर्व इतिहास म्हणजे काल्पनिक, वैयक्तिक ध्येये आचरणात आणण्याचा अट्टाहास धरून स्वतःच्या घरात गुलाम होऊन बसलेल्या, दुबळ्या, फसलेल्या लोकांचा इतिहास, हे त्यास कळून चुकले होते. चोरावर मोर होऊन हा वज्रलेप इतिहास आपल्या हयातीत त्याने खरवडून टाकला ...'

शिवाजीने जो खरवडून काढला तो इतिहास पुन्हा घडू देण्याचा करंटेपणा निदान या पुढे तरी कोणी करू नये. □



# मुंबापुरी

## □ दोन सभा

केंद्र सरकारने जाहीर केलेल्या वस्त्रोद्योग धोरणाबाबत मुंबापुरीत झालेल्या दोन सभांबाबत आज आम्ही लिहिणार आहोत. दोन्ही सभा गुरुवारी झाल्या. पहिली जनता पार्टीची पक्षाच्या नरीमन पॉईंटवरील कार्यालयात झाली तर दुसरी शेतकरी संघटना आणि कामगार आघाडी यांनी संयुक्तपणे घेतलेली शिवाजी पार्क येथील सभा.

चक्री वादळात कोकणच्या किनारपट्टीची व्हावी तशी काहीशी अवस्था मुंबापुरीत सध्या जनता पार्टीची झाली आहे. सभेसाठी भिवंडी, कल्याण, इचलकरंजी, मालेगाव येथून यंत्रमाग चालविणाऱ्यांचे प्रतिनिधी, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते कामगार पुढारी इत्यादींना आग्रहाचे निमंत्रण होते. आम्ही दोन वाजता पक्षाच्या कार्यालयात पोहोचलो. सभेची वेळ दोनची असल्याने साधारणपणे तीन वाजता सभा सुरू होईल असे आम्हाला सांगण्यात आले. साडेतीनच्या सुमारास एकूण दहा माणसे जमली. त्यातले दहावे आम्ही. सभेच्या अध्यक्षस्थानी होते निहाल अहमद. सुरुवातीलाच त्यांनी यंत्रमाग व्यवसायात आलेली मंदी ही नव्या वस्त्रोद्योग धोरणामुळे आलेली आहे की, त्याची इतर काही कारणे आहेत, याचो चौकशी केली. यावर कुणाचेही एकमत होईना. एकमताच्या प्रश्नावर दुमत झाले नाही तर ती जनता पार्टी कसली ? कम्युनिस्ट पार्टीचे चिटणीस यांचे मत पडले की, आम्ही यंत्रमागाच्या मालकांसाठी लढायला तयार आहोत; पण तुम्ही कामगारांना काय देणार हे आधी स्पष्ट करा. केंद्र सरकारच्या नव्या धोरणाचा विचार करण्यासाठी अधिक विस्तृत पातळीवर सभा घ्यायला पाहिजे असे ठाम मत व्यक्त करून ते सभेतून बाहेर पडले. त्यामुळे आता थोड्याच वेळात ही छोटी सभाही गुंडाळली जाते की काय याची आम्हाला भीती वाटू लागली.

वीस तारखेला पार्लमेंट संपायच्या आत आपण काहीतरी लक्षवेधक करायला हवे याबाबत सर्वांचे एकमत होते. मग मोर्चा काढण्याची कल्पना पुढे आली; पण समजा मोर्चाला लोक जमले नाहीत तर नाचक्की होईल असे निहाल अहमद यांचे म्हणणे पडले. मग कमीतकमी त्रासाचा आणि जास्तीतजास्त प्रसिद्धी मिळवून देणारा एकमेव मार्ग म्हणजे पुतळा जाळण्याचा कार्यक्रम. परंतु मंत्र्याचा पुतळा जाळला म्हणजे अटक होण्याची भीती आहे. शेवटी असे ठरले की, नव्या वस्त्रोद्योग धोरणाचा पुतळा आणि तेही जमले नाही तर धोरणाची प्रत जाळली जावी. अठरा तारखेला बुधवारी महाराष्ट्रात सर्व ठिकाणी हा कार्यक्रम हाती घेण्याचे ठरले. चार सव्वाचारला सभा आटोपली तेव्हा नव्या सरकारी धोरणावर कोणतीही चर्चा झालेली नव्हती.

साडेपाचला शेतकरी संघटनेच्या सभेला आम्ही शिवाजी पार्कवर पोहोचलो तेव्हा जवळजवळ लाखाचा जनसमुदाय जमला होता. शरद जोशींच्या चळवळीत योग्य काय आणि टीका करण्याजोगे काय याची चर्चा आम्ही येथे करीत नाही. दत्ता सामंत यांनी कामगार चळवळीला कोणत्या थराला आणून सोडले आहे याचा उहापोहही आम्हाला करायचा नाही; परंतु ह्या चळवळीच्या निमित्ताने शेतकरी आणि कामगार एका व्यासपीठावर आले. सामंत आणि जोशी हे दोघेही एकांडे शिलेदार आहेत आणि तरीही

शेतकरी संघटना आणि शिवसेना ह्या युतीपेक्षा कामगार आघाडी आणि संघटना याचे एकत्र येणे ही काळाची गरज आहे. सामंत रंजक भाषणे करतात; पण जोशी मुद्देसूद बोलतात. ज्या अर्थवादावर संघटनेचा लढा त्यानी उभारलेला आहे तो अगदी साध्या सोप्या शब्दात ते लोकापर्यंत नेऊन पोहोचवतात. ज्या जनतेचे नेतृत्व आपण करतो त्याचे दुःख नेमके कशात आहे ह्याची जोपर्यंत व्यासपीठावरील नेत्याला जाणीव होत नाही, तोवर जनसमुदायाच्या काळजाला स्पर्श करणारे शब्द त्याच्या ओठावर येणार नाहीत. जोशीना ही कला साधते ते सहज सुंदर आणि मनापासून बोलतात. बोलण्यातला आवेश सामंतामध्येही आहे; पण त्यांनी कामगारलढा हा उद्योगधंदा केला आहे. शेतकरी संघटना ही अजूनही चळवळ आहे. तिचा पाया सामंताच्या लढ्यापेक्षाही विस्तृत आहे.

गेल्या सहा महिन्यात काँग्रेसजनांनीही दाखवू नये इतकी भक्ती विरोधी पक्षानी राजीव गांधीविषयी दाखविली आहे. एक विशिष्ट तत्त्वप्रणाली घेऊन या घटकेला काँग्रेसच्या *अर्थकारणाविरूद्ध* उभे *ठाकण्याचे* सामर्थ्य शरद जोशींनी दाखविले आहे. आजच्या ह्या बदललेल्या राजकीय वातावरणात जर ते लाखो शेतकरी–शेतमजुराचे आंदोलन उभे करण्यात यशस्वी होत असतील तर ह्या लढ्याचे भवितव्य निश्चितच उज्ज्वल आहे. असो.

ह्या सभेसाठी महापौर छगन भुजबळ भगवा फेटा घालून हजर झाले. महापौराच्या उत्साहावर आम्ही पामरांनी काय लिहावे ? समोर आयता बसलेला जनसागर पाहून त्यांनी राजा भीमदेवी थाटात भाषण सुरू केले. आपण ज्या लोकापुढे भाषण करीत आहोत, त्यात गिरण कामगार आणि झोपडपट्टीतील रहिवासी आहेत याचे त्यांना भान राहिलेले दिसले नाही; परंतु लोकांनी भुजबळ चलेजाव म्हणून घोषणा द्यायला सुरुवात केली. काहीनी संतापाने व्यासपीठाकडे धाव घेतली.

दुसऱ्या दिवशी भुजबळानी आपल्याला बोलावणे होते म्हणून आपण तेथे गेलो असे स्पष्टीकरण दिले. खरे पाहता जे व्यासपीठ आपले नाही तेथे भुजबळानी जाण्याची आवश्यकता नव्हती. फारफार तर शेतकऱ्याचे स्वागत करून त्यांना परत फिरता आले असते. गर्दी आणि सत्तेनुसार विचार फिरवायचे धोरण कधीतरी अंगाशी येते

दत्ता सामंत भाषणात २७ डिसेंबरच्या मोर्चाची घोषणा करताना म्हणाले, शिवसेनेप्रमाणे आमचा निर्णय आम्ही मागे घेणार नाही. आधी वाघासारखी घोषणा करायची मग मांजरासारखे पाठी यायचे आणि मग प्रत्यक्ष दिवस उजाडला की, उंदरासारखे बिळात शिरायचे असे आम्ही करणार नाही.

आता अखेर शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांसाठी एक महत्त्वाचे :–

राजीवस्त्रे जाळण्याच्या समारंभाला उपस्थित रहाणारे डॉक्टर सामंत आणि 'शेतकरी पुत्र' छगन भुजबळ हे दोघेही राजीवस्त्रे परिधान करूनच सभेला आले होते!

## □ पवित्रे, चढाया, माघार !

मुंबईला सदोदित कसली ना कसली तरी 'किक्' असते. 'किक्' शिवाय या शहराचं काम भागत नाही. काँग्रेस शताब्दी सोहळ्यांचा असा पंचरंगी नशा मुंबैवर डोलून राहिलाय की बात नही !

रस्ते, गल्ल्या, स्टेशनं अन् वीजेचे खांब रंगून सजून निघतायेत आणि कामात केवढी गती ? मुरली देवरानी नुस्ती *सांगायची* खोटी की रस्त्याची दुरुस्ती झालीच समजा. धारावी, म्हातारपाखाडी, लालबाग वगैरे गावं सोडा. पण ब्रेबॉर्न स्टेडियम, मलालक्ष्मी रेस–कोर्स, सी. सी. आय. वगैरे गावठाणं येत्या आठवड्याभरात एकविसाव्या शतकात पोचतील !

गेल्या सोमवारी महापौर छगन भुजबळ यांनी महापालिकेत घोषणा केली, महालक्ष्मी रेसकोर्सवर शताब्दीनिमित्त चाललेलं बांधकाम परवानगीशिवाय होतंय. तेव्हा आम्ही चौकशी करणार. जरूर भासली तर बांधकाम बंद पाडणार. झालं, आम्ही मनात म्हटलं मऱ्हाटी अस्मितेची बाणेदार गर्जना म्हणतात ती हीच पण कसच काय अन् कसच काय. महापौर घोषणा करून आपल्या कक्षात परतले तर तिथे मुरली देवराचा फोन ! सभागृहात एकदम टिपेत बोलणारे महापौर फोनवर मऊ खर्जात बोलले. याला म्हणतात 'सक्सेसफुल रिट्रीट !'

ठाकऱ्यानी सत्तावीस डिसेंबरला जाहीर केलेला शरियतविरुद्धचा मोर्चा आता परत घेतलाय. पुन्हा एकदा यशस्वी माघार बरं, या आपल्या एकसेएक गनिमी काव्यासबधी ठाकरे एक अवाक्षरही बोलत नाहीत आता बोलीन तर फक्त प्रितिश नंदीशीच अशी भूमिका ठाकऱ्यानी घेतली असावी, कोणास ठाऊक.

तर सध्या हे असं मुंबापुरीत चाललय. येत्या आठवड्याभरात अनेक चढाया होतील. पवित्रे जाहीर केले जातील. माघारी घेतल्या जातील. अन् सरतेशेवटी जेव्हा हिंदोस्थान ए–आझम शहेनशाह राजीव गांधी मुंबईत येतील तेव्हा सगळे लढवय्ये शस्त्रं टाकून मैदानात विवचना करीत बसतील. सगळे एकाच कुटुंबातले ना. इथून तिथून गोत्र एकच. आपल्याच माणसावर शस्त्र कसं उगारायचं ?

पहिली मिलन–मिठी शरद पवारानी नाही मारली म्हंजे मिळवली सध्या (आय) काँग्रेसवाल्याना पवाराची 'किक' लागलीये.

## □ ये सर्द हवायें

थंडीची गुलाबी चाहूल नुक्तीच लागायला सुरुवात झालीये. आम्हा मुंबईकराच्या एरवी घामट, ओशट आयुष्यातले हे पधरा–वीस दिवस म्हणजे सुलतानाचा खजिना !

सध्याकाळचं नीरव, दाट आभाळ अनुभवण्याचे हेच तर दिवस आकाशाचे गहिरे रंग, रात्रो चांदण्याची महिफल. रात्रपाळी झाली की चर्चगेट स्टेशनवर येताना वाटेत सी. टी. ओ. कडे कडक, गुलाबी चहा प्यायचा, हुतात्मा चौक ते थेट इरॉस सिनेमापर्यंत जागोजागी शेकोट्या पेटवलेल्या असतात. एखादी शेवटची बस दिसली की मफलर गुंडाळलेला ड्रायव्हर मुद्दाम थांबून बाहेर डोकावतो, खुणेनं विचारतो आपणही. नुस्तं हात हलवून स्टेशनाच्या दिशेनं खूण करायची. बस पुन्हा फुरफुरत निघून जाते. आपण निःशब्दाच्या वाटा पकडून चालत राहायचं. हे असे थंडीचे दिवस !

एकदा आकाशवाणीचं ध्वनिमुद्रण आटपून *उस्ताद बडे गुलाम चौपाटीवर भर पावसात* मालकंस गात बसले. अंगावर पाऊस. समोर दरिया. चहूकडे तानांचे तांडव. शिष्याने परततेवेळी विचारलं की, भर पावसात गावस का वाटलं. बडे गुलाम उत्तरले, 'कुदरतको आदाब कर रहा था.'

निसर्गाला नमन करण्याची ही पद्धत ग्रेटच वाटते, नाही ? परवा शोभा गुर्टूंच्या वरळी सी फेसवरच्या नव्या घरी खूप दिवसानंतर गेलो. सध्याकाळची सुखद हवा, समोर मावळतीचा सूर्य, वातावरणात प्रसन्न गारवा. मावळत्या सूर्याला नमस्कार करून बाई इतकच म्हणाल्या, 'या निसर्गाचं कौतुक कराव तेवढं थोडं.'

शाल घट्ट लपेटून पुन्हा गायला बसल्या. 'यह सर्द हवाये...'

—विष्णू जयदेव

## पुणे वार्ता

# 'टि. ए.' ने रसिक प्रेक्षकांना दिलेला निर्भेळ आनंद

सांस्कृतिक पुण्यातली एक रसरशीत संध्याकाळ. टिळक स्मारक मंदिराच्या आवारात लोक जमताहेत. काही घोळक्याघोळक्यांनी मजेत गप्पा मारताहेत, तर काही लगबगीनं थिएटरमध्ये जाताहेत–पुढे जागा मिळण्यासाठी. सर्वांचा आवडता कलाकार अमोल पालेकर आज बोलणार आहे. पुष्कळांना त्याला बघायचंय. पुष्कळांना त्याला ऐकायचंय पुष्कळांना त्याला जाणायचंय. हलव्याचा काटा उठवणारी थंडी शालीमध्ये आणि स्वेटरमध्ये लपेटून आलेला तमाम सुशिक्षित उच्चभ्रू वर्ग पडदा वर जाण्याची उत्सुकतेनं वाट पहातोय

पडदा वर जातो. स्टेजवर बसलेत अमोल पालेकर, सतीश आळेकर आणि श्रीधर राजगुरु. सयोजकांनी वेळेचं, काळाचं भान चांगलंच ठेवलं आहे. आभाराचं भाषण कॅन्सल करून अगोदरच ते अमोल पालेकराना एक सुदरसा पुष्पगुच्छ देतात. 'प्रास्ताविक', 'ओळख करून देणे' या प्रकारात अजिबात वेळ न घालवता पूर्ण वेळ ते वक्त्याला देतात. हे निश्चितच स्पृहणीय.

नाट्य आणि चित्र या दोन्ही माध्यमांमध्ये अमोल पालेकर ज्या सामर्थ्यानं आणि सहजपणे वावरले, ते त्याचे दोन्ही परफॉर्मन्सेस जाणकारीनं पाहिलेला समजस श्रोतृवर्ग जसा इथं आलेला आहे, त्याचप्रमाणे 'जुलूस' 'वासनाकाड', 'मुखवटे' न पाहिलेला पण 'रजनीगधा' 'चितचोर' आणि 'अनकही' पाहिलेला श्रोतृवर्गही इथं मौजूद आहे. त्यांना प्रत्यक्षात पहायची उत्सुकता तर प्रत्येकालाच आहे.

'अमोल अजूनही देखणा दिसतोय बरं का!' असं मनाशी म्हणत त्याचं भाषण ऐकायला सुरुवात केली.

'माझं पहिलं नाटक म्हणजे 'वल्लभपूरची दतकथा' १९६९ मध्ये सत्यदेव दुबे आणि मी– त्याचं दिग्दर्शन केलं.'

मग दुसरं, मग तिसरं, मग चौथं अरे बापरे! सर्वकाही फारच संथ, मंद, निवेदनात्मक. आता शेवटचं 'मुखवटे' कधी एकदा येतंय असं श्रोत्याना होऊन गेलं. (म्हणजे एकदा संपलं)

आणि तसं ते संपलंही. संपता संपता एक पॉइंट मात्र त्यांनी छानच सांगितला. ते म्हणाले–

'कलाकार नाटक करताना एक विशिष्ट अनुभव घेत असतात. तो अनुभव ते प्रेक्षकांपर्यंत पोचवत असतात. हा जो परस्पर–संवाद आहे, तो प्रयोगानंतर उरत नाही. कित्येक प्रयोग होतात आणि संपतात. मागं काय रहातं? तर पत्रकारांनी केलेली परीक्षणं. खरा महत्वाचा असतो तो अनुभव आणि नेमका तोच आपण पकडून ठेवू शकत नाही.

हे आवडलं आपल्याला. हे आजवर डोक्यातच आलं नव्हतं.

पण त्यांच्या इतर भाषणाबद्दल काय? 'माझा नाट्यदिग्दर्शनाचा प्रवास', या विषयावर बोलायचं म्हणजे अथपासून इतिपर्यंत सर्व नाटकाची जंत्री सांगायला हवी काय? हे म्हणजे 'प्रथम सकाळी ६ वाजता पुणे स्टेशनवर आलो. 'महाराष्ट्र एक्सप्रेस' पकडली. प्रथम मिरज लागल मग हुबळी लागलं आणि शेवटी दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता बंगलोरला पोचलो–' या पद्धतीचं झाल. श्रोते हे ऐकायला आले होते का? मुळीच नाही.

श्रोते ऐकायला आले होते अमोल पालेकर 'दिग्दर्शक' म्हणून कसे घडले आणि वाढले ते. दिग्दर्शन करता करता ते स्वत.च कसे समृद्ध होत गेले ते.

पण त्यानी निराशा केली. बोलताना त्याची भाषा नम्र असली तरी पहिल्यापासून आजतागायत आपण उत्तमच दिग्दर्शन केलं हा भाव त्याच्या बोलण्यात निश्चितपणे होता

माणूस सुरुवातीला काहीसा अजाण असतो, सुरुवातीला तो धडपडत असतो, चाचपडत असतो. तसं करता करता त्याच्या हाती काही गवसतं आणि शिकवता शिकवता तो स्वत.ही बरंच काही शिकतो. पालेकराचही असं झालेलं असणारच; पण हे त्यांनी सागितलं नाही. पहिल्यापासूनच एक 'जाणकार दिग्दर्शक' ही कल्पना जोपासतच त्यानी भाषण केलं. नव्हे निवेदन केलं.

### स्वत:तलं अपुरेपण

त्यानंतर महेश एलकुचवार. ताकदीचे म्हणता येतील अशा हाताच्या बोटांवर मोजता येणाऱ्या नाटककारापैकी एक. ते स्वत:ला ग्रेट वगैरे अजिबात मानत नाहीत. ते म्हणतात 'कला' ही काही आयुष्याला व्यापून उरणारी नव्हे. तो आयुष्यातला एक भाग. नाटक हा त्याचा एक छोटासा घटक. यामध्ये कुठे चारदोन नाटकं लिहिली म्हणजे फार मोठं काहीच केलं नाही. व्यापक विश्वाच्या तुलनेत हे माझं काम अगदीच नगण्य आहे. मी रगभूमीला काय दिलं यापेक्षा नाटकानं मला काय दिलं हे मला महत्त्वाचं वाटतं.'

मूळचे एका खेड्यातून आलेले एलकुंचवार–ज्यांच्यावर कसलेही 'वाङमयीन' किंवा 'नाट्यसस्कार' पूर्वी कधी झालेले नव्हते, ते अनपेक्षितपणे नाट्यक्षेत्राकडे कसे वळले, त्याकडे कसे ओढले गेले हे त्यानी सागितलं. ते म्हणाले–

'तरुण वयात तेंडुलकरांच्या नाटकांचा प्रभाव माझ्यावर पडला. कारण तेंडुलकरांची नाटकं ठराविक चौकटीत बंदिस्त न राहता, पुढे जाणारी आणि प्रस्थापित मूल्य व्यवस्थेला प्रश्न विचारणारी होती. हे प्रश्न त्या काळच्या तरुण पिढीला खरोखरच सतावणारे होते. त्यामुळे तेंडूलकर अधिक जवळचे वाटले.'

एलकुचवारांनी स्वत:च स्वत च्या नाट्यप्रवासाचा शोध घेऊन प्रामाणिकपणाने, मोकळेपणाने आणि निर्भयपणे आपली मतं माडली.

'लोकनाट्याचा वापर करणं, रस्त्यावर जाऊन नाटकं करण–असल्या गोष्टी मला पटत नाही नटांनी मधेच प्रेक्षकामधे जायचं, कधी त्याना टिळा लावायचा असल्या गोष्टी

करावं लागणं याचा अर्थ कलाकार म्हणून तुम्ही कुठं तरी कमी पडता—असा होतो. प्रेक्षक आणि कलाकार यांच्यामधला दुवा स्टेजवर होणाऱ्या अभिनयानच साधला पाहिजे. मी माझी नाटकं स्टेजवर करणार.'

एलकुंचवार आपल्याला जे वाटतं ते निखळपणे सांगतात. सुरुवातीला 'फॉर्म 'चा आणि 'बडखोरी 'चा केलेला हव्यास आता कसा हास्यास्पद वाटतो—हे त्यानी सांगितलं. 'वासनाकांड', 'पार्टी', 'वाडा चिरेबंदी' ही स्वत.ची नाटकं त्यांना समाधान देत नाहीत. त्या नाटकांचं अपुरेपण, फसलेपण त्याना सलत राहतं. ही नाटक म्हणजे विशेष काहीच नाही असं त्यांना राहून राहून वाटतं.

त्यांनी लावलेला हा नकारात्मक सूर—त्याला काय म्हणायच? इतर सामान्य वक्त्यासारखा तो नम्रपणाचा आव नक्कीच नव्हता. त्याच्या सांगण्यामधलं जे सच्चेपण होतं, जो नितळपणा होता—त्यावरून असच म्हणावस वाटत की त्यांना स्वत च्या लेखनाबद्दल खरोखरच तस वाटत असाव.

श्रीराम लागू आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, 'त्याच्या बडखोरीच्या पवित्र्यासारखाच हाही एक पवित्रा नसेल ना?'

तुम्हाला काहीही वाटत असो एलकुंचवार! आम्हाला मात्र तुमची नाटकं श्रेष्ठच वाटतात.

## विजयाबाई—दिलखुलास

विजया मेहता गेली ३० वर्षं नाट्य आणि दिग्दर्शन या क्षेत्रात नाव गाजतय. रंगभूमीवर सामर्थ्यानं वावरतायत! यापूर्वी टी. व्ही. वर आणि पुण्यामध्येही अनेक वेळा त्याच्या मुलाखती आणि व्याख्यानं होऊनही त्याच्या व्याख्यानांचा 'साचा' झालेला नाही. त्याचं बोलण ऐकावस वाटतं. बोलण्यात कुठेही आढयता नाही. गर्व नाही. आजवरच्या आपल्या नाट्यप्रवासाकडे स्वत.च अलिप्तपणे पाहून त्याची छाननी किंवा डिसेक्शन त्या सहजपणे करतात. प्रथम राष्ट्र-सेवादल, तसंच नतर अल्काझी आणि मर्झबान ही त्याची श्रद्धास्थानं. त्यांच्याकडून जितकं घेता येईल तितकं त्यानी तळमळीनं घेतलं, आणि स्वतःच्या दिग्दर्शनात त्यानी ते भरभरून वाटलं. त्या म्हणतात,

'जर दिग्दर्शक म्हणून माझी ताकद जबरदस्त असेल, तर माझ्या हातून नाटककार घडायला हवेत. तसच दिग्दर्शक म्हणून मी जो अभिनय शिकवीन, तो तेवढ्या विशिष्ट नाटकापुरताच मर्यादित राहता कामा नये. मी केलेले अभिनयाचे संस्कार त्या नटामधे कायमचे रुजले पाहिजेत. तस होतं का? तर त्याचं उत्तर 'नाही' असंच द्यावं लागेल ही माझ्या दिग्दर्शनाची मर्यादा आहे.'

'खुर्च्या' आणि 'एक शून्य बाजीराव' यासारखी नाटकं करताना एका बाजूनं आपण अस्वस्थ होतो. खऱ्या अर्थानं ही नाटक आपल्याला झेपली नाहीत. जरी ती नाटक प्रेक्षकाना आवडली असली तरी. ही प्राजळ कबुली देऊन त्या पुढे म्हणतात—

'सध्याछाया' सारखं नाटक अगदी छोटयाशा खेडयात करायची वेळ आली तेव्हा वाटलं, 'इथे काय या नाटकाच चीज होणार?' पण आश्चर्य म्हणजे त्या लोकाचा अत्यत चागला रिस्पॉन्स मिळाला. इतका, की साऱ्या कष्टाचं सार्थक झाल्यासारख वाटल. मन भरुन पावल. हा जो वेगळाच आनंद मला मिळाला त्याबद्दल खरोखरच व्यावसायिक रंगभूमीची मी ऋणी आहे.'

'तुमच्यातल्या कामावर प्रेम करा. कामातल्या तुमच्यावर नको.' हा मत्र राष्ट्रसेवादलाकडून त्याना लहानपणी मिळाला. आणि आजतागायत त्यानी तो असोशीनं पाळला.

'मादी', 'जास्वंदी', 'सध्याछाया' 'हमीदाबाईची कोठी', 'महासागर' अशी यशाची किती शिखरं त्यांनी गाठली! त्याचं अनुभवविश्व जेवढं व्यापक आणि समृद्ध आहे, तेवढंच त्याच मनही समृद्ध आहे. नाहीतर स्वत कडे इतक्या objectively बघणं त्याना जमलं नसत.

त्यांच भाषण हे भाषण नव्हतं. ते बोलणं होतं. त्यामध्ये एक अनौपचारिकपणा आणि दिलखुलासपणा होता. स्वतःच स्वतःचा घेतलेला तो शोध होता. वक्ता आणि श्रोते यांच्यामधे घडलेला तो एक सुदर संवाद होता.

आता शेवटी जब्बार पटेल. 'घाशिराम' पूर्वी त्यानी 'जनावर' केलं होतं, 'अशी पाखरे येती' केलं होत पण जब्बार खरे लोकांच्या नजरेत भरले, ते 'घाशिराम' मुळेच. एक वेगळाच आकृतीबंध—आजवर कधीही न हाताळलेला. अत्यत शिस्तबद्ध, तालबद्ध आणि लयदार हालचालीतून लेखकाला जे म्हणायचं होतं, ते त्यांनी फार सुदर 'पदबद्ध' केलं. अगदी वेगळ्या ढंगानं. त्यातल्या विषयाबद्दल कितीही गदारोळ उठलेला असो, 'घाशिराम'च्या 'प्रेझेंटेशन'-बद्दल म्हणजेच जब्बारच्या कौशल्याबद्दल कुणाचंच दुमत नव्हतं. जब्बार पटेलाची ताकद त्यावेळी सर्वांच्या खऱ्या अर्थानं लक्षात आली. इतकी की, पु. ल. नाही आपल 'तीन पैशाचा तमाशा' हे नाटक जब्बारनाच द्यावसं वाटल.

तर असे हे जब्बार. चित्रपटाच्या बाबतीतही 'डिस्को'चा काळ आलेला असूनही त्यांचं 'सामना', 'सिंहासन' आपण विसरू शकलेलो नाही. त्याच नाटक असो, अगर सिनेमा. सार कसं आखीव—रेखीव, पद्धतशीर आणि शिस्तबद्ध! ते म्हणतात—

ही method किंवा ही शिस्त मला विजयाबाईंकडून मिळाली. त्या नाटकामधली, त्या विषयामधली, त्या तालमीमधली जी devotion आहे,जी involvement आहे, ती त्यांच्याकडून मी घेतली, मग भले मी त्याच्यापेक्षा वेगळ्या वाटेन का गेलेला असेना!'

'घाशिराम कोतवाल', 'तीन पैशाचा तमाशा' आणि 'पडघम' या नाटकासबधीच मुख्यत्वे ते बोलले. (सतीश आळेकरांनी सुचवल्याप्रमाणे) ते म्हणाले, 'सोलापूर-सारख्या ठिकाणी लहानपण गेल्यामुळे निरनिराळ्या लोककलांचे जे घाट मी पाहिले होते, तेच मी या नाटकांमध्ये वेगवेगळ्या ढंगानं वापरलं.'

आज आम्हाला खऱ्या अर्थानं चागली आणि आव्हानात्मक नाटकच मिळत नाहीत. सारा प्रेक्षकवर्ग दूरदर्शनच्या कचाटयात सापडलाय. त्याला त्यातून बाहेर काढून रंगभूमीकडे खचू शकतील अशी समर्थ नाटक आज निर्माण व्हायला हवीत. अर्थात मी काही निराशावादी नाही.

आम्हाला टी. व्ही.नं फार ग्रासलंय असं आम्ही रोज म्हणतच होतो; पण जब्बार-नाही हे म्हणायची वेळ यावी! जब्बार-सारख्या माणसालाही 'नाटक—टंचाई' भेडसावत असेल अस वाटलच नव्हतं कधी.

आता 'पेपरी' स्टाईलनंच बोलायचं झालं, तर असं म्हणता येईल की—

'नाट्यलेखन शिबिराच्या निमित्तान सुरु झालेला हा उपक्रम मोठा छान झाला आणि रगला.'

रंगभूमीन या दिग्दर्शकाना काय दिलं, दिग्दर्शकानी आणि नटानी नाटकाला आणि रगभूमीला काय दिलं, म्हणजेच एकमेकानी एकमेकाना काय दिलं, याबद्दल गेले चार दिवस बराच उहापोह झाला या साऱ्यांनी आम्हा रसिक प्रेक्षकाना उर्फ श्रोत्याना काय दिलं?

तर निखळ आनंद!

थिएटर ॲकॅडमी, धन्यवाद!

—रंजना पंडित

## तलाक मुक्ती मोर्चा

# मुस्लिम विचारवंत आता कोणती भूमिका घेणार आहेत ?

प्रतिभा रानडे

इस्लामची स्थापना झाल्यानतरच्या अगदी सुरवातीच्या काळात मोहम्मद पैगंबराना सतत युद्ध करावी लागली. तेव्हा त्यांच्या जवळ मनुष्यबळ कमी होत. त्यावेळी त्याना नवमुस्लिम स्त्रियांची फार मदत होत असे. जखमी सैनिकांची शुश्रूषा करण, त्यांच्या जेवण्याखाण्याची सोय करणं, वीरश्रीयुक्त पवाडे गाऊन सैनिकाना लढण्यासाठी उद्युक्त करणं, असं करता करता त्या स्त्रिया स्वत ही हातात तलवारी घेऊन युद्ध आघाडीवर जात. पुरुषाच्या बरोबरीने लढत. पुढे जसजसा इस्लामचा झपाट्यानं प्रसार झाला, अमाप सत्ता आणि संपत्ती इस्लामी पुरुषांच्या हातात आली, तसतशी मुस्लिम स्त्री बुरख्यात ढकलली गेली. तिच्या प्रतिष्ठेचे, अस्मितेचे पंख छाटले गेले

मुस्लिम सत्यशोधक मडळाने नोव्हेंबरच्या ३ तारखेपासून पंधरा दिवसांचा तलाक मुक्ती मोर्चा महाराष्ट्रात काढला होता. एक निरीक्षक या नात्याने काही भागात या मोर्चाबरोबर हिंडताना ह्या हकिगतीची सतत आठवण येत होती. ऐतिहासिक काळाप्रमाणे मोर्चामध्ये भाग घेतलेल्या आजच्या मुस्लिम स्त्रीनं हातात तलवारी ऐवजी जुबानी तलाक मुक्तीचे, पोटगीच्या मागणीचे आणि द्विभार्या प्रतिबधक कायद्याच्या मागणीचे कापडी बॅनर्स हातात घेतले आहेत. तिच्या तोंडी वीरश्रीयुक्त पवाडे आहेत. ते स्वतःवर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध न्याय मागण्याचे.

गेली वर्ष दोन वर्षं, मुस्लिम स्त्री, तिचे प्रश्न, तिच्यावर होणारे अन्याय यावद्दल आपल्याला वृत्तपत्रातून सतत काही ना काही वाचायला मिळते आहे. काही ठिकाणी स्वतःच्या हक्काच्या जपणुकीसाठी मुस्लिम स्त्रिया आवेशान उठलेल्या दिसतात तर त्यांचा आवाज बद करण्याचे निर्घृण प्रयत्नही सतत चालू आहेत, असंही दिसतं.

शहनाझ शेख या विशीतल्या मुलीला तिच्या प्रोफेसर नवऱ्याने एकतर्फी घटस्फोट दिला. शरियतच्या चार घराण्याच्या मुल्लामौलवींकडे तिने त्याविरुद्ध दाद मागितली. पण तिला कोणीच न्याय दिला नाही म्हणून १४ डिसें. १९८३ या दिवशी सुप्रिम कोर्टामध्ये भारत सरकार विरुद्धच दावा लावला की, जर घटनेने, प्रत्येक भारतीयाला धर्म, जात लिंग निरपेक्ष ।समानतेचे हक्क दिले आहेत, तर घटनेन जे अधिकार हिंदू स्त्रीला दिले आहेत ते अधिकार मुस्लिम स्त्रीला का दिले जात नाहीत ? सुप्रीम कोर्टाने भारत सरकारकडे यावद्दलचे स्पष्टीकरण पंधरा दिवसांच्या आत द्यावे अशी नोटीस पाठवली होती. पण त्याचे उत्तर सरकार अजून देऊ शकलेले नाही दुसरे उदाहरण अख्तरुन्निसा मेहबूब सय्यद याचे आहे. या बाईंना स्वत.चे मूल नाही. होण्याची शक्यताही कमी. यांना एका मुलाला दत्तक घ्यायचे आहे. पण शरीयतप्रमाणे तशी परवानगी नाही. म्हणून त्यानीही भारत सरकार ( समाज कल्याण खाते ) आणि स्वत चे पती ( कारण शरीयत प्रमाणे, मुलासाठी ते दुसरं लग्न करतील म्हणून ) याच्यावर हिंदू स्त्री व मुस्लिम स्त्रीला मिळणाऱ्या न्यायाच्या बाबतीतल्या तफावतीवद्दल दावा लावला आहे. शाहवानो याची केस तर आजकाल वृत्तपत्रातून गाजतेच आहे. तेव्हा त्यावद्दल एवढेच म्हणते की, या त्रेसष्ठ वर्षाच्या 'अंगुठा छाप' वृद्धेन आठ वर्षे केस लढवून आपल्या नवऱ्याकडून तहहयात पोटगीचा हक्क मिळवला आहे.

एका बाजूला अशी उदाहरणं आहेत, तर दुसऱ्या बाजूची उदाहरणं हृदयद्रावक आहेत. केरळातल्या बीमापल्ली गावातल्या सुलेखाबीबी या पन्नाशीला आलेल्या, पुना नातवंडं असलेल्या बाईवर गावच्या जमातीने आरोप ठेवला की वाई दारू पितात, व्यभिचारी आहेत, म्हणून त्याना शंभर फटक्याची शिक्षा द्यावी व त्याचे केशवपन करावे. बाईचा नवरा, हे कळल्यावर घाईघाईने आखाती देशातून रजा घेऊन आला आणि त्याने सरळ पोलीस चौकीवर जमातीविरुद्ध, तिथल्या मुल्लामौलवीविरुद्ध तक्रार केली की भारताची न्यायसस्था असताना इतर कुणालाही कायदा स्वत.च्या हातात घ्यायचा अधिकार नाही. पोलिसांच्या भीतीमुळे जमातीने आपले आरोप मागे घेतले. सुलेखाबीबी या महासंकटातून सुटली. पण तिच्या अगोदर अशा तऱ्हेच्या शिक्षेची अंमलबजावणी किती तरी दुर्दैवी मुस्लिम स्त्रियावर त्याच जमातीने केली होती हे बिमापल्लीच्या लोकांना माहीत होते. पण जमातीच्या विरुद्ध, मुल्लामौलवींच्या विरुद्ध बोलायची हिंमत कुणामध्येही नव्हती अजूनही नाही. केरळमधलीच आणखी एक घटना नादिरा या स्त्रीची. चार मुलं झाल्यावर, चौदा वर्षे लग्नाला झाल्यानतर हिच्या नवऱ्याने दुसरं लग्न करून नादिरा आणि चार मुलाना वाऱ्यावर सोडून दिले. नादिराने मुल्लामौलवींच्या मशिदीचे उंबरठे झिजवले की माझ्या नवऱ्याचा दुसरा निका लावून देऊ नका, निदान त्याला माझ्या मुलाची तरी काही सोय करायला सांगा. पण तिच्या नवऱ्याला दुसऱ्या लग्नापासून कोणीही अडवू शकत नाही की तिच्या, मुलाच्या भरण पोषणाच्या जबाबदारीतून तो सुटूही शकतो. शेवटी नादिराने निराश होऊन आपल्या चार मुलाना घेऊन नदीत उडी मारुन जीव दिला.

### शाहबनत प्रकरण

आणि अगदी अलीकडची बातमी म्हणजे दहा नोव्हेंबरला शाहबनत या २६ वर्षांच्या,

दोन मुलाच्या आईची. हिला नवऱ्याने घरातून हाकलून दिले, पण तो सतत तिच्या आईच्या घरी जाऊन तिला त्रास द्यायचा, दारूसाठी पैसे मागायचा. एकदा तिनं नाही म्हणताच नवरा आणि दीर दोघानी जमाती कडे तक्रार केली की शाहबनत व्याभिचारी आहे. शरियत कायद्याप्रमाणे दोन पुरुषाची साक्ष पुरेशी असल्यामुळे जमातीने नेहमीचीच शिक्षा ठोठावली ताबडतोब नवऱ्याने शाहबनतला ती मच्छीमारीच काम करते त्या समुद्रकिनाऱ्यावरून फरफटत ओढत मशिदीत आणलं. तिला बेदम मारण्यात आलं आणि ती बेशुद्ध झाल्यावर तिचं केशवपन करून तिला अर्धमेल्या स्थितीत घरी नेऊन टाकलं. शाहबनत आणि तिची आई इतक्या गरीब आहेत की त्याचं म्हणणसुद्धा कधी कोणी ऐकून घेतलं नसतं. कारण अशा शिक्षा होतातच हे माहीतच आहे सगळयाना. पण यावेळी कस कुणास ठाऊक; पण वेगळंच घडलं. जमातीमध्येच फूट पडली. परमथुरा हे गाव, आखाती देशातून पैसा आणणाऱ्याचे केरळमधले दोन क्रमांकाचे गाव. अरब देशातून श्रीमत होऊन आलेले आणि–इतर असे दोन तट गावात आहेत. दुसऱ्या गटाचे म्हणणे आहे की हे श्रीमंत लोक अरब देशातून इस्लामी पुनरुज्जीवनवादाचे वेड डोक्यात घेऊन येतात आणि आम्हा गरीबावर असा अन्याय करतात. त्याशिवाय इंडियन युनियन मुस्लिम लीगनेही कधी नव्हे तो जमातीविरुद्ध याबाबतीत पवित्रा घेतला आहे परमथुरा गावात तर या प्रकरणामुळे खूपच खळबळ माजली. आणि आता सरकारनेही या प्रकरणाची चौकशी करण्याचे ठरवले आहे.

ही आणि अशी कितीतरी उदाहरण. अस म्हटल जातं की, एकही मुस्लिम घर असं नसेल की जिथं अेकही जुबानी तलाक झाला नाही शेकडो वर्षे मुस्लिम स्त्रिया असे अन्याय निमूटपणे सहन करीत आलेल्या आहेत, कारण दाद तरी कुणाकडे मागायची ? शरियत विरुद्ध भल्याभल्याची बोलायची हिंमत नसते. तिथं या गोषाच्या अंधारात जीवन कठणाऱ्या, असंघटित मुस्लिम स्त्रियांची काय कथा ? अशा स्थितीत शहनाज शेख, अख्तरुन्निसा, शाहाबानो (आता जरी त्यानी आपली केस माग घेण्याची भाषा केली आहे तरी) याच कोर्टात जाण्याचं धाडस हे अफलातूनच म्हणायला हवं. अर्थातच मुस्लिम परपरावाद्यानी त्याच्याविरुद्ध रान उठवायला सुरुवात केली. न्यायसंस्था आणि मानवतावादावरचा हा प्रश्न त्यानी आता धार्मिक आणि राजकीय पातळीवर नेऊन ठेवला आहे. सरकारने आमच्या वैयक्तिक कायद्यात ढवळाढवळ केलेली आम्हाला खपायची नाही. समान नागरी कायदा आणला तर रक्ताचे पाट वाहतील अशी बेजबाबदार धमकीसुद्धा त्यांनी सरकारला दिली आहे.

पण या सगळ्या कोर्टाच्या केसेस, शरियत कायदा, त्याची अमलबजावणी, आणि घटनेनं दिलेले अधिकार, याबद्दल सर्वसामान्य मुस्लिम माणसाच्या मनात गाढ अधार आहे. त्याला कळते ते फक्त परंपरावाद्याचे एकच म्हणणे, 'इस्लाम धोक्यात आहे' आणि त्यासाठी मग काहीही करायला त्याची तयारी असते. सत्तेसाठी हपापलेले धार्मिक नेते आणि राजकीय नेते याचा पुरेपूर फायदा घेतात आणि ज्यांच्या जीवावर हे नेते आपली पोळी भाजून घेत असतात, ते सर्वसामान्य लोक मात्र अज्ञान आणि अन्याय यामध्येच अडकून पडतात–नव्हे त्यांना तसच ठेवलं जातं.

## मुक्ती मोर्चाची कल्पना

ही स्थिती पालटावी, सर्वसामान्य मुसलमानाना स्वतःचा विचार स्वतःच करता यावा म्हणून त्याना सर्व परिस्थितीचे ज्ञान व्हायला हवे, या उद्देशाने मुस्लिम सत्यशोधक समाजाने तलाक मुक्ती मोर्चा काढायचे ठरविले. त्यासाठी तत्कालिक कारण घडले, तेही शरीफाबी नावाच्या अेका विशीच्या आतल्या मुलीचा लग्नानतर चार महिन्यातच तलाक झाला म्हणून. तिच्या चेहऱ्यावरचे मुरूम हा महारोग आहे हे कारण देऊन तिच्या नवऱ्याने तिला तलाक दिला. शरीफाबी डॉक्टरी तपासणीला तयार होती म्हणून यावेळी जमात तिच्या बाजूने होती. तरी कुणालाही न जुमानता नवऱ्याने घटस्फोट दिलाच. लग्नात मिळालेल्या वस्तू आणि हुंडा अतिशय दडपण आल्यामुळे त्याला परत करावा लागला. पण त्याने शरीफाबी कडून लिहून घेतले की पोटगी मागणार नाही. कारण त्याचवेळी शाहबानोला कोर्टाकडून पोटगीचा अधिकार मिळाला होता. या सगळ्याचा उबग येऊन, लोकमत तयार करण्यासाठी, स्वतःचा विरोध नोदवण्यासाठी कोल्हापूरच्या मुस्लिम सत्यशोधक मडळाचे कार्यकर्ते श्री. हुसेन जमादार यांनी शरीफाबीचे एक दिवसाचे उपोषण आयोजित केले. लोकानी त्याला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला. कितीतरी मुस्लिम स्त्रीपुरुष उपोषणाच्या ठिकाणी, शरीफाबीला सहानुभूती दाखवण्यासाठी जमले, कितीतरी स्त्रिया तिच्याबरोबर उपोषणाला बसल्या. दीडशे स्त्रीपुरुषानी जुबानी तलाकवर बदी आणली पाहिजे आणि मुस्लिम स्त्रियाना पोटगीचा अधिकार मिळाला पाहिजे या निवेदनावर सह्या केल्या. आणि उत्स्फूर्तपणे या सर्वांचा मोर्चा कलेक्टरकडे गेला आणि त्याना ते निवेदन देण्यात आले.

कोल्हापूरचा हा अनुभव घेतल्यावरच 'तलाक मुक्ती मोर्चा' ची कल्पना सुचली आणि ताबडतोब कार्यवाहीत आणायचे ठरले. मोर्चा काढायचा तो पुणे-मुंबईसारख्या शहरापेक्षा विदर्भ, मराठवाडाकडे जायचे ठरले. कारण तिथे मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणावर आहे आणि नवविचाराचे वारे जावे तितक्या प्रमाणात तिकडे जात नाही. आपल्या या मोर्चाला ठिकठिकाणी परंपरावादी मुस्लिमाकडून विरोध होणारच याची पूर्ण कल्पना सयोजकाना होती. मुळातच मुस्लिम सत्यशोधक मडळाचे संस्थापक कै. हमीद दलवाई हे रा. स्व. सघाचेच आहेत, इथपासूनच हे परंपरावादी सुरुवात करतात. त्यामुळे मंडळाचे लोक हे सच्चे मुस्लिम नाहीतच असा त्यांचा आग्रह. अर्थातच त्यांना कट्टर विरोध हा क्रमप्राप्तच. हुसेन जमादार, मेहरुन्निसा दलवाई म्हणतात, आम्हाला रा. स्व. स. आणि मुस्लिम लीग दोघेही सारखेच. म्हणूनच त्यानी ठिकठिकाणी ज्या स्वागत समित्या स्थापन झाल्या तिथे रा. स्व. सघ, पतितपावन सघटना, शिवसेना याचे सहाय्य घ्यायचे नाही असे ठरविले. मुस्लिमाची कोणतीही संघटना आपल्याला सहाय्य देणार नाही हे अगोदरच माहीत होते. ते घडलेही तसेच. अपवाद फक्त अमरावतीचे मुस्लिम सत्यशोधक मडळाचे कार्यकर्ते श्री. वझीर पटेल आणि औरगाबादच्या कार्यकर्त्या श्री. रजिया पटेल यांचा. मोर्चाने मदत घेतली ती समाजपरिवर्तनासाठी झटणाऱ्या सघटनाची.

## हम कैसे जाये ?

तीन नोव्हेंबरला मोठ्या समारंभाने, उत्साहाने हा मोर्चा निघाला. मोर्चामध्ये एकोणीस स्त्रिया, यातील चार तलाक मिळालेल्या होत्या, चौदा पुरुष आणि दहा लहान मुलं होती. मु स. शो. मंडळाचे अध्यक्ष श्री. बाबूभाई बँडवाले हे ब्याऐंशी वर्षांचे, तर सर्वात छोटा मोर्चेकरी दहा महिन्यांचा मुद्दस्सर. मिरज, सोलापुर, उस्मानाबाद, लातूर, अंबेजोगाई, परभणी, नांदेड, चंद्रपूर, अमरावती, बुलढाणा, जळगाव करून १८ नोव्हेंबरला अहमदनगरला मोर्चा आला. आणि तिथे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे श्रीरामपूर, नाशिक इथला मुक्काम रहित करून मोर्चा माघारी फिरला. इथे मोर्चाचा पहिला टप्पा संपला. दुसऱ्या टप्प्यामध्ये. जानेवारीमध्ये विधानसभेचं हिवाळी अधिवेशन भरेल, तेव्हा हा मोर्चा नागपूरला जाणार आहे आणि मुख्यमंत्र्यांना निवेदन देणार आहे.

प्रत्येक ठिकाणी मोर्चाला अपेक्षेप्रमाणे थोडाफार विरोध झालाच. काळी निशाणं दाखवणं, मुर्दाबादच्या घोषणा देणं आणि दगडफेकीचे प्रकार प्रत्येक वेळी झाले. ते अपेक्षित होतेच एके ठिकाणी मोर्चा निघायच्या अगोदरच दगडफेकीला सुरुवात झाली. एक दगड डी. एस. पीच्या गाडीला लागल्यावर पोलिसांनी विरोधकांना ठोकून काढलं. तिथला एक पोलीस ऑफिसर स्वतःच मुस्लिम होता तरी त्याने विरोधकांच्या म्होरक्याला एका मुल्लाला त्याचं बकोटं धरून चांगलेच चोपले. मोर्चामधल्या एका तलाक मिळालेल्या मुलीला त्याचा फार आनंद झाला. कारण तिला जेव्हा तलाक मिळाला तेव्हा तिनंही एका मुल्लाकडून मदतीची, न्यायाची अपेक्षा केली होती आणि कुठल्याच मुल्लानं तिला मदत केली नव्हती. इतका विरोध होत असूनही, त्या त्या ठिकाणी मुस्लिम स्त्री-पुरुष काही उघडपणे तर कधी गुपचूपपणे मोर्चाच्या आयोजकाना येऊन सांगत होते, 'आमचा तुम्हाला पाठिंबा आहे. आम्हालाही तलाक मुक्ती, पोटगीचा अधिकार हवा. पण उघडपणे तुमच्या बाजूला येण्याची आमची हिंमत नाही.'

एक निरिक्षक म्हणून जळगावपासून मी या मोर्चामध्ये सामील झाले होते. तेव्हा मलाही थोड्याफार प्रमाणात हा अनुभव आला. मुंबईहून निघाले ती दुपारी दोन वाजता जळगावला पोचले. स्टेशनवरून थेट 'लोकमत' या स्थानिक वृत्तपत्र कचेरीत गेले. तिथे मोर्चाचा ठावठिकाणा, कार्यक्रम याबद्दल चौकशी केली आणि रिक्षाने निघाले. रस्त्यात एके ठिकाणी दोन मुस्लिम स्त्रिया दिसल्या. दोघींनी बुरखे घेतले होते, पण चेहरे मात्र झाकलेले नव्हते. मला आपलं वाटलं त्या दोघी मोर्चाकडेच निघाल्या असाव्यात. म्हणून मी रिक्षा थांबवून त्यांना विचारलं, 'आप दोनो मोर्चा की तरफ जा रही हो ?'

त्यांनी 'नाही' म्हणून फक्त मान हालवली.

मला वाटलं त्यांना काही माहीत नसेल म्हणून विचारलं, 'अभी यहाँपर मुसलमान औरतोका मोर्चा निकलनेवाला है. पता है ?'

'हो' म्हणून त्यांनी परत मान डोलावली. मला आता एका गोष्टीचं आश्चर्य वाटतं, जळगावसारख्या गावातल्या मुस्लिम बायकांशी मी आपणहूनच हिंदी-उर्दू का बोलायला सुरुवात केली ? कारण नंतरचा माझा अनुभव असा आहे की मोर्चातील मंडळी झकास पैकी मराठी बोलत होती, बायका मात्र आपल्या मुलाशी पुष्कळदा बंबय्या हिंदीमध्ये बोलत होत्या.

'फिर आप वहाँ नही गयी ?' मी पुन्हा विचारल.

'नही...हम नही जाते. हम कैसे जाये ?' त्यांनी मलाच विचारलं. 'आम्ही कशा जाणार ?' हा त्यांचा प्रश्न बरंच काही सांगून जातो.

### विरोधकांच्या धमक्या

सकाळी असा अनुभव आल्यामुळेच रात्री नऊ वाजता जाहीर सभा झाली त्यावेळेस तिथे एक स्थानिक समाजकार्यकर्त्या भेटल्या, त्यांच्याकडे चौकशी केली. त्या बाई स्वतः हिंदू आहेत. माँटेसरी शाळेच्या शिक्षिका आहेत. त्यांच्या बरोबरच्या बऱ्याच शिक्षिका मुस्लिमही आहेत. एकदा त्या सगळ्यांचेच पगार काही कारणाने थांबून राहिले होते. म्हणून त्या सगळ्याजणी मिळून कलेक्टर कचेरीवर पगार मागायला गेल्या. तेव्हा या बाया काही गडबड करायला आल्या आहेत असं समजून पोलिसांनी त्यांना पोलीस कस्टडीत बंद केलं. बाईंना काळजी वाटली की, मुस्लिम स्त्रिया कस्टडीत गेलेल्या बघून त्यांच्या घरचे पुरुष माणसं संतापून गोंधळ घालणार. पण तसे काही झालं नाही. उलट त्याचं म्हणणं पडलं की, काही चांगल्या कारणासाठीच हे काम सगळ्यांनी मिळून केलेलं आहे तेव्हा मुस्लिमस्त्रिया पोलीस कस्टडीत जाऊन आल्या तरी आमची काही हरकत नाही. शिवाय तुम्ही त्यांच्याबरोबर आहात म्हणजे आमच्या बायका सुरक्षित आहेत याची खात्री आहे आम्हाला. असा विश्वासही त्यांनी समाजसेविका बाईंजवळ व्यक्त केला. पण जेव्हा त्याच बाई या मोर्चासाठी आपल्या त्याच मुस्लिम शिक्षिकांना बोलवायला गेल्या--मोर्चात येणं नको वाटत असेल तर निदान सभेला तरी या असं म्हणायला, तेव्हा मात्र त्यांच्या घरच्या पुरुषमाणसांनी नकार दिला. त्यांचं म्हणणं, 'हा मोर्चा, ही सभा या फार वेगळ्या गोष्टी आहेत. एकतर्फी दिला जाणारा जुबानी तलाक बंद व्हायला हवा हे खरं असलं तरी आम्ही त्यामध्ये प्रत्यक्ष भाग घेऊ शकत नाही. हा आमच्या धर्माचा, समाजाचा अंतर्गत प्रश्न आहे. आम्ही यामध्ये भाग घेतलेल्या आमच्या समाजातल्या पुढाऱ्यांना, मुल्ला मौलवींना आवडायचं नाही. आणि जे त्यांना आवडत नाही ते आम्ही करू शकत नाही.'

सर्वसाधारण मुस्लिम समाज, ज्याला समाज सुधारणेची आवश्यकता सर्वात जास्त असते, तो या बाबतीत उदास का रहातो याच हे मुख्य कारण आहे. धार्मिक आणि राजकीय पुढारी जे सांगतात त्याचं उल्लंघन करण्याची हिंमत आणि कुवत सर्वसामान्यांत नाही. खरं म्हणजे ती कोणत्याच धर्मात, समाजात नसते. पण मुस्लिम समाजात ही गोष्ट अति कडवेपणान पाळली जाते असं दिसतं. त्याचं कारण असं की, इस्लाममध्ये धर्म आणि समाजजीवन, धर्म आणि राजकारण, धर्म आणि माणूस यांची फारकत कधीही होऊ शकत नाही. मुसलमान माणूस आणि मुस्लिम समाज यांना इस्लामचं काटेकोर पालन करणं आवश्यक आहे. त्याशिवाय स्वतःचं असं वेगळं अस्तित्व असूच नये अशी व्यवस्था असते. व्यक्तिस्वातंत्र्यात, लोक-

शाहीला इस्लाममध्ये स्थानच नाही. धर्म पालन कसं करायचं तेही धार्मिक आणि राजकीय नेतेच सांगणार, कारण त्या दोघांचेही हितसंबंध गुंतलेले असतात. मुस्लिम समाज जितका जास्त खोल या धार्मिकतेमध्येच गुंतलेला रहातो, तितका या नेते लोकांचं पुढारीपण शाबूत रहातं.

जळगावला रात्रीच्या जाहीर सभेत विरोधकानी गोंधळ माजवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी सांगितले की ज्यांना भाषणं ऐकायची नसतील त्यानी निघून जावं. श्री अकबर रहमानी या स्थानिक पुढाऱ्याने व्यासपीठावर येऊन, माईक हातात घेऊन सांगितले, 'लोकशाहीमध्ये प्रत्येकाला बोलण्याचा हक्क आहे हे आम्हाला माहीत आहे. पण लोकांच्या धार्मिक भावना दुखावण्याचा अधिकार कुणालाही नाही. तो आम्ही खपवून घेणार नाही.' अशी धमकी देऊन ते आपल्या अनुयायाना घेऊन निघून गेले. सभा पुढे चालू झाली. तासभरानंतर सगळ्याची भाषणं संपायच्या वेळी दगडफेकीला सुरुवात झाली. तेव्हा माझ्या गळ्यात अडकवलेला कॅमेरा वाचवायला गेले तर पाठीत एक दगड बसलाच. पोलिसानी सौम्यसा लाठीहल्ला करून जमाव पांगवायला सुरवात केली. गोंधळ बराच माजला होता. पण तेवढ्या गोंधळात एक मुस्लिम तरुण घाईघाईने एक वक्त्या प्रा. मुमताज रहिमतपुरे याच्याजवळ येऊन म्हणाला, 'बहेन, अल्ला आपका साथ दे.' आणि वेगानं तो गर्दीत मिसळून गेला.

## औरंगाबाद–अहमदनगर

दुसऱ्या दिवशी औरंगाबादला निघायचे होते. पण पहाटेच तिथले पोलीस, तिथल्या अॅड. डि. मॅजिस्ट्रेटचा, जिल्हा बंदी हुकूम घेऊन आले. तिथल्या विरोधकानी मोर्चाविरुद्ध प्रचंड दबाव आणला होता. अधिकाऱ्याना मुख्यतः भीती वाटत होती की, या मोर्चाचे निमित्त करून हिंदू-मुस्लिम दंगे सुरू केले जातील याची. मोर्चातील लोकाच्या जीवावर तर विरोधक उठले होतेच. त्यातच ही जातीय दंग्याची भीती. कार्यकर्त्यांनी आपापसात खूप उलट सुलट चर्चा केल्या आणि शेवटी औरंगाबादला न जाण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे जळगावचा मुक्काम एक दिवसाने वाढला. त्या दिवसभरात गावातले दोन चार लोक येऊन भेटून गेले. एक दोघा मुसलमान लोकांनी तर मोर्चाला आपली सहानुभूती दाखवली. त्यांची खतही तीच होती की उघडपणे आम्ही काही करू शकत नाही. एक जण तर म्हणाला 'आमच्या या नेतेमंडळींना शहाणपण कधी येणार कुणास ठाऊक. धर्माच्या नावाखाली ही राजकीय मंडळी तर सोडाच; पण पेशइमाम, मुल्लामौलवी काय सावळा गोंधळ घालतात ते काय आमच्यासारख्या सामान्य माणसाना कळत नाही असं का वाटतं त्यांना? हा 'किताबचा'–कुराणाचा प्रश्न नसून रोजीरोटीचा प्रश्न आहे व आपल्या आयावहिणींना सुखानं जगता यावं याचा प्रश्न आहे हे त्याना कधी कळणार ?

या पुढारी, धर्माच्या ठेकेदाराना हे कळत नाही अशी भाबडी समजूत होती बिचाऱ्याची.

अहमदनगरला जाण्यासाठी पहाटे साडेपाच वाजताच मोर्चा निघाला. कारण औरंगाबाद जिल्हा प्रवेश बंदी असल्यामुळे वळसा घेऊन जायचे होते. नेहमीप्रमाणेच मोर्चा बसच्या पुढे पोलिसाची जीप होती. पाठीमागे पोलिसांची बस होती. मालेगावच्या अगोदर पधरा कि. मीटरवर बस आल्यावर बघता बघता मागच्या पुढच्या पोलीस गाड्यांची संख्या वाढली. आता पुढे दोन जीप्स आणि एक डी. एस. पी. ची गाडी होती तर पाठीमागे पोलिसाच्या सहा बसेस आणि शिवाय दोन जीप्स होत्या हा पोलीस बंदोबस्त–मालेगाव पार करून पुढे येवल्यापर्यंत सांगाती होता. हा एवढा अवास्तव पोलीस बंदोबस्त का असं मी त्यांच्यातल्याच एका पोलीस ऑफिसरला विचारलं तेव्हा ते म्हणाले, 'तुम्ही मंडळी कोल्हापूरहून आलात ना? मी पण कोल्हापूरचाच. तुमच्या कुणाच्या केसाला धक्का लावू देणार नाही आम्ही. मालेगावच्या लोकांनी धमकी दिलेली आहे की तुमची बस जाळून टाकू म्हणून. तेवढ्यासाठी ही जास्तीची खबरदारी. एस. आर. पी. च्या सहा कंपन्या बंदोबस्तासाठी आपल्या बरोबर आहेत, म्हणजे सव्वाशे पोलीस.'

इथेच आता आपल्यापुढे काय वाढून ठेवले असेल याची कल्पना करता येत होती. दुपारी पाऊण–एकच्या सुमारास नगरमध्ये शिरताशिरताच दिल्ली दरवाजाजवळ बसवर बेफाम दगडफेक झाली आणि नगरचा मोर्चा धडपणान पार पडणार नाही हे कळून चुकलं. मुक्कामाला पोचल्यावर स्थानिक स्वागत समितीचे कार्यकर्ते, मोर्चाचे आयोजक आणि पोलीस ऑफिसर्स याच्या आपापसात चर्चा, सल्ला–मसलती चालू झाल्या. गावातून येणाऱ्या बातम्या काळजीत टाकणाऱ्या होत्या. मुक्कामासमोर जमलेला विरोधकाचा जमाव वाढत चालला होता. काळी निशाणं घेतलेली ही मंडळी मोर्चाचे आयोजक स्वागत समितीचे अध्यक्ष यांच्या नावाने मुर्दाबादच्या घोषणा देत होती, 'अल्ला हो अकबर'च्या घोषणा देत होती. शिवाय दगडफेकही थांबून थांबून चाललेलीच होती. विरोधक आणि मोर्चावाले याच्यामध्ये जर बंदूकधारी पोलीस नसते तर त्यावेळी तिथं काहीही घडू शकलं असतं. नव्हे तीच धमकी विरोधक देत होते. विरोधकाचा मुख्य रोख होता तो श्री. मेहरून्निसा दलवाई याच्यावर. त्याच्या जीवावरच ते उठले होते. मोर्चा नगरला येण्याअगोदर दहा पधरा दिवसापासूनच रोज एखाद दोन जाहीर सभा होत होत्या. मशिदीतून दर वेळच्या नमाजाच्या वेळी प्रक्षोभक भाषणं करूण तणाव वाढवण्याचे पद्धतशीर प्रयत्न चालू होते. मोर्चाच्या दिवशी गावातल्या मुसलमानांनी आपली दुकान बंद ठेवली होती.

सकाळपासूनच कलेक्टर कचेरीपुढे विरोधकांचा जमाव वाढत चालला होता. दुपारी चारपर्यंत तिथे ७ ते ९ हजार लोक जमले होते. मुस्लिम स्त्रियाही सात–आठशे जमल्या होत्या धर्मयुद्धात दिली जाणारी 'अल्ला हो अकबर'ची घोषणा सतत दिली जात होती. त्याची एकच मागणी होती की हा तलाक मुक्ती मोर्चा नगरमध्ये निघता कामा नये, जाहीर सभेची तर बातच दूर.

## प्रक्षोभक श्रीरामपूर

नगरचे पोलीस अधिकारी म्हणाले, 'जमाव बेफाम झालेला आहे. रक्तपात होणार हे निश्चित. शिवाय या ज्या सातशे–नऊशे स्त्रिया जमल्या आहेत, त्यामध्ये बुरखा घेतलेल्या बायकाचीच संख्या जास्त आहे. आता बुरख्याच्या आत पुरुष नसतीलच याची काही खात्री नाही. उलट शक्यताच जास्त आहे. आणि हे माहित असूनही आम्ही या बायकांवर लाठीहल्ला किंवा त्याना रेटत मागे परतवण असं करू शकत नाही. हिंदू स्त्रियाचा जमाव अशा पद्धतीनं आम्ही आटोक्यात आणू

शकतो पण मुस्लिम बायकांच्या बाबतीत आम्ही असं काही केलं की त्यातून आणखीनच काही प्रकरणं उद्भवयाची.'

'फिरोज तांबटवर म्हणून तिथले एक पुरोगामी पुढारी आहेत. इतर बाबतीत ते पुरोगामी वगैरे असले तरी याबाबतीत अगदी परंपरावादी आहेत. त्यांचं तर म्हणणं मी इथे असताना, माझ्या गावात हे लोक मोर्चा घेऊन येऊ तरी कसे धजावतात? त्यांनी मुकाट्यानं निघून जावं हे बरं. नाहीतर होईल त्या परिणामाला तयार असावं.'

परिणाम एकच, तो म्हणजे मारामाऱ्या आणि हिंदू–मुस्लिम दंग्याचा संभाव्य धोका. कारण त्याबाबतीतही तणाव वाढवले गेले होतेच. मोर्चाच्या आयोजकांपुढे प्रश्न होता तो म्हणजे हे धोके समोर असताना, जाणूनबुजून मोर्चा काढायचा की माघार घ्यायची? श्रीरामपूर, नाशिकला फोन करून तिथल्या परिस्थितीचा अंदाज घेतला तेव्हा कळलं की तिथली परिस्थितीही नगरसारखीच होती. श्रीरामपूर तर नगरपेक्षाही प्रक्षोभक झालं होतं. तेव्हा संयोजकांनी मोर्चा पुण्याला नेण्याचे ठरवले. निवेदन देण्यासाठी श्री. मेहरून्निसा दलवाई आणि प्रा. मुमताज रहिमतपुरे या दोघी डी. एस. पी. च्या गाडीतूनच कलेक्टर कचेरीकडे गेल्या. पण गावात एवढं प्रक्षोभक वातावरण असतानाही स्वतः साहेब बहादूर संगमनेरी निघून गेले होते!

मोर्चेवाल्यांची बस मुक्कामावरून हलली आणि बसवर दगडांचा बेफाम मारा सुरू झाला. बस पोलीस हेड क्वार्टर्सच्या आवारात पोचेपर्यंत, पावसाच्या सरीवर सरी याव्यात त्याप्रमाणे प्रत्येक वळणावर बसवर दगडांचा वर्षाव होत होता. ॲसिड भरलेल्या बाटल्या बसवर फेकल्या जात होत्या. सुरुवातीच्या एक दोन मुक्कामात बसवर दगडफेक झाल्यामुळे बसच्या सगळ्या खिडक्यांवर लोखंडी जाळ्या लावून घेतल्या होत्या. तरीसुद्धा ड्रायव्हर समोरच्या खिडकीची काच फुटली. आणखीही दोन खिडक्यांच्या काचा फुटल्या. शिवाय चारी बाजूंनी बसचा पत्रा ठिकठिकाणी फाटला होता. एवढी जबरदस्त दगडफेक चालली होती. ॲसिडच्या बाटल्या बसवर फेकल्या जात होत्या. असं असूनही बसचे ड्रायव्हर श्री. सय्यद हे हिंमतीनं, कौशल्यानं, बस व्यवस्थितपणे चालवित होते हे त्यांचं




फार मोठं कौतुक आहे. तशा परिस्थितीत सर्वांच्याच मनावर फार मोठं दडपण आलं होतं. सय्यद यांच्या मनावर तर सर्वात जास्त दडपण होतं, कारण बसमधल्या उतारूंच्या जीवाची जबाबदारी त्यांच्यावर होती. आणि या मानसिक दडपणाबरोबरच, समोरच्या खिडकीची काच फुटल्यामुळे, समोरून भन्नाट वारं आत येत होतं. त्याचा डोळ्यांना त्रास होत होता. फुटलेल्या काचांचे बारीक बारीक तुकडे वाऱ्याबरोबर आत येत होते. अशा परिस्थितीतही त्यांनी हिंमतीनं बस चालवली ही फार कसबाची, कौतुकाची गोष्ट आहे. सय्यद स्वतः मंडळाचे एक कार्यकर्तेही आहेत. आपल्या पत्नी व मुलासमवेत ते या मोर्चामध्ये सामील झाले होते.

मोर्चा नगरमधून निघून गेल्यानंतर तिथल्या पोलिसांनी पन्नास–साठ विरोधकांना पकडलं. शिवाय ॲसिड भरलेल्या, पेट्रोल भरलेल्या बाटल्यांचा मोठा साठा पोलिसांना सापडला. मुख्य म्हणजे नगरच्या स्वागत समितीच्या लोकांवर काय ओढवेल याची मला काळजी वाटत होती. कारण समितीचे अध्यक्ष डॉ. महाले यांच्या दवाखान्याची पाटी ओढून काढून जमाव त्यांच्या घरावरही चालून गेला होताच, त्यांच्या नावानेही मुर्दाबादच्या आरोळ्या ठोकल्या होत्याच. ॲड. रत्नपारखी, ॲड. देशपांडे, श्री. सुरेश गवळी व स्वतः डॉक्टरसाहेब ही मंडळी डावीकडे झुकणारी. फिरोज तांबटकर सुद्धा एरवी या लोकांच्याच ग्रुपमधले पण या बाबतीत मात्र एकदम विरुद्ध टोकाचे, 'आमच्या धर्मात ढवळाढवळ करू नका.' ही वस्तुस्थिती समजून घ्यायला जरा जडच जाते.

## हा पराभव नाही–जमादार

'हा स्वतःचा पराभव आहे असं वाटतं का तुम्हाला?'– मी हुसेन जमादार यांना विचारलं.

'मुळीच नाही. याला मी पराभव म्हणणार नाही, तर यशस्वी माघार म्हणू. गांधींनी चौरीचौऱ्याचा सत्याग्रह का मागं घेतला हे समजून घेतलं म्हणजे मग मी काय म्हणतो ते लक्षात येईल तुमच्या. गांधींची माघार आणि आमची माघार ही एकच आहे. आम्ही जर हट्टानं मोर्चा काढलाच असता तर पोलिसांनी आमचं रक्षण केलं असतं. पण तरी हाणामाऱ्या झाल्याच असत्या. ज्या सर्वसामान्य मुसलमान समाजाच्या शिक्षणासाठी आम्ही हा मोर्चा काढला आहे त्याच सर्वसामान्य मुसलमान समाजातली शंभर–दोनशे माणसं मेली असती. शिवाय हिंदू–मुस्लिम दंगेही पेटले असते. नेमकं तेच आम्हाला नको आहे. म्हणूनच आम्ही औरंगाबादला गेलो नाही. श्रीरामपूर, नाशिकलाही गेलो नाही आणि नगरमधून लौकर बाहेर पडलो. कुराणात काय लिहिलंय, ब्रिटिशांनी केलेले शरियत कायदे, भारत सरकारचे कायदे, घटनेनं दिलेले अधिकार, धर्माभिमान्यांचं राजकारण आणि त्याला बळी जाणारा सर्वसाधारण मुस्लिम माणूस–हे सगळं काय प्रकरण आहे ते आम्हाला त्यांना सांगायचं आहे. त्याला स्वतःचा विचार स्वतःच करायला शिकवायचं आहे. सामाजिक सुधारणा हव्यात म्हणणाऱ्यांना नेहमीच विरोध होतो. तुमच्या फुले, आगरकरांना काय कमी त्रास झाला का? आमचा धर्म जास्त कडवा असल्यामुळे, जास्तच परंपरावादी असल्यामुळे आम्हाला त्रास जास्त होणार, हे आम्हाला माहीतच आहे. त्याला तोंड देण्याची आमची तयारीही आहे. असल्या बारीकसारीक माघारीला पराभव म्हणणं हे चूकच. आमची बाजू न्यायाची असल्यामुळे शेवटी जय आमचाच होणार याची खात्रीच आहे आम्हाला. नरहर

कुरुंदकर म्हणाले होते की, पन्नास वेळा माघार घ्यावी लागली तरी शेवटी विजय हमीद दलवाईंचाच होणार आहे. आम्ही जिथे जिथे जात होतो तिथे आम्हाला विरोध तर झालाच, पण विरोध होऊनसुद्धा किती तरी ठिकाणी गावातल्या एखाददोन तलाक मिळालेल्या मुली, व्यासपीठावर येऊन आपापल्या आयुष्याची परवड सांगत होत्या. लोकांच्या सद्सद्विवेक बुद्धीला आवाहन देत होत्या. हे धारिष्ट्य त्याना कसं आलं असेल त्याचा विचार करायला हवा. आता हेच बघाना, आम्ही जमतेम चाळीस लोक आहोत, त्यापैकी – बायका-मुलंच जास्त. आम्ही मुस्लिम स्त्रियाना न्याय मिळावा म्हणून फक्त सभेत बोलतो, घोषणा देतो, तर आम्हाला विरोध करायला या लोकाना हजारोंच्या सख्येनं रस्त्यावर याव लागत. गुडगिरी करावी लागते. रक्ताचे पाट वाहतील अशा बेफाम धमक्या द्याव्या लागतात. यावरूनच कळतय की कोण कुणाला घाबरतय ते.'

'आता तुमचे विरोधक म्हणणार, आम्ही मोर्चेवाल्याना पळवून लावलं म्हणून.' मेहरुन्निसा दलवाई याना बोलण्यासाठी उद्युक्त करण्यासाठी मी म्हटलं.

'म्हणू देत, त्याना काय म्हणायचं ते.' मेहरुन्निसा दलवाई हात उडवीत म्हणाल्या– 'खरं कोण आहे, न्याय्य बाजू कोणाची आहे हे काळच ठरवणार आहे आम्ही दंगे करू, मारामाऱ्या करू, मोर्चात भाग घेणाऱ्या बायकावर हात टाकू, ही त्याची भाषा. समाजाला उपयोगी पडेल अस काही करू, कुणाची दुःखं दूर करू, अस ते कधीही म्हणत नाहीत. त्यावरून काय ते समजा. खरं म्हणजे इस्लाम धर्माचा आणि स्त्रियावर होणारे अत्याचार बंद व्हावेत अस आम्ही म्हणतो, त्याचा सबंधच काय ? चौदाशे वर्षांपूर्वीच्या अरब समाजाचा विचार केला तर अस दिसतं की पैगबरानी स्त्रीला काही अधिकार दिले. पण पुरुषधार्जिण्या समाजाने ते अधिकार स्त्रीला कधीच दिले नाहीत. स्वतःच्या अधिकाराचा मात्र वाटेल तसा गैरवापर केला. आम्ही न्याय मागतो तर म्हणतात– हे धर्माच्या विरुद्ध आहे. न्याय धर्माच्या विरुद्ध कसा असेल ? पण पुरुषप्रधान समाजाची मिजासखोरी–आणि धार्मिक व राजकीय नेत्याची सत्ताखोरी यापुढे त्याना स्त्रियांवर होणारे अन्याय बघण्याची गरज वाटत नाही त्याच्या घरातल्याच आयाबहिणीवर होणारे अत्याचार त्याना दिसत नाहीत ? आमच्या चळवळीचा फायदा त्यानाही मिळणार आहे हे त्यांना कळत नाही ? पण सत्तेच्या राजकारणापुढे त्यांना इतर काही कळवून घ्यायची इच्छाच नाही. पण हा त्याचा दाडगेपणा किती दिवस चालेल ? फार तर या पिढीपर्यंत. पुढची पिढी आमच्याच विचाराची होणार यात संशय नाही. अमरावतीला आमचे स्वागत तर बॅन्ड लावून, फूलमाळानी सजवलेल्या कमानीतून झालेच, पण मोर्चाला ५ हजार लोक आले होते. ५०० मुस्लिम बायका आल्या होत्या त्यापैकी शभर तलाक मिळालेल्या बायका होत्या. जोरदार सभा झाली. त्यावरूनच कळेल की लोकाना जरा धीर देणारं कोणी असल की लोक आपणहूनच आमच्या बाजूला येतात.'

## आम्ही पुन्हा मोर्चात जाऊ !

प्राध्यापिका मुमताज रहिमतपुरे यांना मी म्हटल, 'तुम्ही लोक आता फक्त तलाक–मुक्ती, पोटगी आणि द्विभार्या प्रतिबधक कायद्याचीच मागणी करता आहात तरी तुम्हाला अशा प्रकारचा प्रतिकार होतो आहे. उद्या जर कदाचित समान नागरी कायदा आलाच तर काय होईल ?'

'काय होईल ? धमकी देतात त्याप्रमाणं रक्तपातच होईल ना ? होऊन जाऊ दे. जे काय व्हायच ते एकदाच होऊनच जाऊ दे. त्याशिवाय आमची ही शेकडो वर्षांची दुर्दशा संपायची नाही. चौदाशे वर्षांपूर्वी लिहिले गेलेले कुराण आणि एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावरचे आपण, यांचो सागड कशी घालायची ?'

मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष, श्री. बाबूमियाँ बँडवाले म्हणाले, 'मुसलमान पुरुष तर स्वत.ला परमेश्वरच समजतो. त्याला कुणाची भीती वाटत नाही की कशाची लाज वाटत नाही.'

नगरला एकदा विरोधक नुसतेच काळे झेंडे दाखवीत होते, 'मुर्दाबाद', 'अल्ला हो अकबर'च्या घोषणाच फक्त देत होते. कोणीतरी म्हणालं, 'अरे, दगडफेक थांबली बरं का.' तेव्हा हुसेन जमादार म्हणाले, हे चागलं लक्षण आहे. लोकशाहीमध्ये विरोध कसा करायचा त्याचीही एक पद्धत असते. ती त्याना कळलेली दिसतेय. आम्हाला तरी हेच पाहिजे आहे, हेच शिकवायच आहे त्याना. मुस्लिम समाजाला लोकशाहीत कस रहावं हे माहीत नाही. हेच आम्हाला त्यांना शिकवायच आहे. आजकालच्या काळात आदर्श समाज रचना म्हणून लोकशाहीला पर्याय नाही. ही गोष्ट मुस्लिमानी जाणून घेतली पाहिजे. धर्माच्या नावाखाली दाडगाईनं वागण यापुढ चालणार नाही. ते आत्मघातक ठरणार आहे.'

'तुम्हा मडळीना सुरुवातीपासूनच फार दडपणं, त्रास सोसावा लागलाय. मोर्चामध्ये जाण्यात धोका आहे हेही तुम्हाला आता कळलच असेल. मग आता यापुढे जर मोर्चा निघाला तर तुम्ही याल का ग ?' मी मोर्चात भाग घेतलेल्या मुलीना विचारल.

एक दोघीच्या डोळ्यात जरा शंका दिसली. पण बाकीच्या सगळ्याजणी म्हणाल्या, 'हो... आम्ही जाणार परत. आम्ही काय घाबरत नाही पुन्हा येऊ तेव्हा आणखी जास्त बायकाना बरोबर घेऊन येऊ'

आयोजकाचं म्हणणं होतं की, या एकाच मोर्चानं आमच काम सपलेलं नाही. सुरू झालय, पुन्हा पुन्हा आम्हाला असे प्रयत्न करायला हवेत, ते आम्ही करणार आहोत.

मी जळगावला पोचले तेव्हाच शाहबानो यानी आपली केस मागे घेतल्याची बातमी आली होती. त्याबद्दल बोलताना आयोजक म्हणाले की, शाहबानो याच्यावर मुल्लामौलवीच प्रचंड दडपण आलेलं असणार ही गोष्ट सूर्यप्रकाशाएवढी स्पष्ट आहे. जी बाई आठ वर्षं केस चालवते ती अशी एकदम कशी माघार घेईल ? शाहबानो यानी केस मागे घेतली, यापेक्षा त्यांना पोटगीचा अधिकार मिळाला ही गोष्ट अत्यत महत्त्वाची आहे.

## आता उठवू सारे रान

तलाक मुक्ती मोर्चाबरोबर निरीक्षक म्हणून मी चार दिवस होते. तेव्हा आपापसात सतत चाललेल्या चर्चांचं हे सार. या चार दिवसात खूप काही बघायला मिळालं. एक प्रकर्षानं लक्षात आलेली गोष्ट म्हणजे, विरोधकाचा द्वेष आणि त्वेष दिङ्मूढ करणारा होता. विरोध झाला तोही योजनाबद्ध, आखीव. दगडफेक करणारी, ॲसिड भर-

लेल्या बाटल्या फेकणारी मंडळी तरुण होती. अमिताभ बच्चन स्टाईलचे केस राखलेली; टाईट पॅन्टस् आणि रंगीबेरंगी रुमाल गळ्याला, कपाळाला बांधलेली. गल्लाभरू हिंदी चित्रपटात शोभतील अशी. धर्माच्या नावाने त्यांना चिथावल्यामुळे, वेगवेगळ्या कारणांनी आलेला त्यांच्या मनातला संताप, वैफल्य, अंगातली रग या मार्गानं अशी बाहेर पडत होती. सर्वसामान्यपणे आजच्या मुस्लिम समाजापुढची मुख्य समस्या अशी आहे की, इस्लामशी निष्ठा दाखवण्याशिवाय त्या समाजापुढे दुसरा कसला कार्यक्रम नाहीच. इस्लामशी निष्ठा नसेल तर त्याला व्यक्ती म्हणून काही अस्तित्वच उरत नाही. आणि एकदा इस्लामशी निष्ठा ठेवली की आधुनिक शिक्षण, वैयक्तिक दृष्टिकोन, सुधारणा इत्यादी गोष्टी आपोआपच दूर रहातात.

याच्या मुळाशी एक नेहमी दिलं जाणारं कारण म्हणजे अल्पसंख्यांकांना वाटणारं भय. ते तर आहेच. पण या भयगंडामुळे आपण आपल्याच पायांवर धोंडा पाडून घ्यायचा की नाही ते त्या समाजानेच ठरवायला हवे.

दुसरे असेही असेल की इस्लामी समाज हा यंत्रयुगातील उत्पादनप्रधान समाज नाही. तो औद्योगिक क्रांतीपासून फार दूर राहिला. त्यामुळे बदल, सुधारणा या गोष्टी त्या समाजाला खपत नाहीत. जो समाज उत्पादक असतो, तो संशोधकवृत्तीचाही असतो. अशा समाजात, सतत नवनवीन येणारी उत्पादनाची साधने, कामाचा वेग, त्यामुळे जीवनमानामध्ये पडत गेलेले फेरबदल, यांच्याशी सतत जुळवून घेत घेत वाटचाल करावी लागते. म्हणून उत्पादक समाजाला नेहमीच सुधारणा, बदल स्वीकारावा लागतो. हा झालेला बदल, मिळत जाणारी भौतिक सुखं याच्यामुळे समाजाच्या मनोवृत्तीतही फरक पडत जातो. व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक न्याय याबद्दलच्या कल्पना प्रगत होतात, मान्यता पावतात. ही सगळी सामाजिक प्रक्रिया, सामाजिक प्रबोधन इस्लामी समाजात घडलेच नाही.

इथे मला अब्दूल गफारखान यांची आठवण येते. काबूलला असताना ते एकदा आमच्या घरी आले होते. त्यावेळेस तिथे कम्युनिस्टांचे राज्य सुरू झाले होते. त्याबद्दलच आम्ही बोलत होतो. तेव्हा ते म्हणाले होते, 'फार पूर्वी आमच्या अफगाणिस्थानात एक प्रगत आणि प्रगल्भ संस्कृती नांदत होती. पुढे मग आम्ही सगळेच मुसलमान झालो, तेव्हा आम्हाला जगातल्या ज्ञानाची दारं बंद झाली आणि आम्ही असे मागासलेलेच राहिलो.'

आजच्या झपाट्यानं पुढं धावणाऱ्या यंत्रयुगामध्ये व्यक्तीला मिळणाऱ्या न्याय, हक्क, अधिकारांबद्दलच्या कल्पना एवढ्या पुढे गेल्या आहेत की, न जन्मलेल्या गर्भाच्या हक्कांबद्दल चर्चा सुरू असताना, मुस्लिम स्त्रीला मात्र स्वतःच्या माणूस म्हणून जगण्याच्या हक्काबद्दल, एवढ्या अटीतटीन, जीवावर उदार होऊन झगडावं लागत आहे ही स्थिती फार केविलवाणी वाटते.

शेवटी प्रश्न असा येतो की मुस्लिम समाज सुधारणेची ही चळवळ व त्याला होणारा हा विरोध यांच्या संबंधात मुस्लिम विचारवंत कोणती भूमिका घेणार आहेत? धर्माचा बागुलबुवा करून मुल्लामौलवी आणि राजकीय नेते, स्वतःची सत्तास्थानं बळकट करण्याचे डाव खेळत आहेत ही गोष्ट उघड आहे. अशा वेळी मुस्लिम विचारवंत स्पष्टपणाने पुरोगामी, सुधारणावादी, निधर्मी भूमिका घेणार आहेत की पुढाऱ्यांच्या दडपणाने म्हणा किंवा समाजातले स्वतःचे स्थान जपण्यासाठी मूग गिळून स्वस्थ बसणार आहेत, आपल्याच सामाजिक प्रतिष्ठेच्या, सुरक्षिततेच्या हस्तिदंती मनोऱ्यात रहाणार आहेत? प्रश्न आहे तो फक्त मुस्लिम स्त्रीला जुबानी तलाक मिळू नये, पोटगी मिळावी किंवा द्विभार्याप्रतिबंधक कायदा लागू करावा, एवढ्यापुरताच नाही तर इस्लामी समाजाची मनोवृत्ती बदलण्याचा आहे, सामाजिक मूल्यांचा आहे, समाज प्रबोधनाचा आहे.

'आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान' या साने गुरुजींच्या गाण्याने एकेकाळी अवघा महाराष्ट्र थरारला होता. त्याच चालीवर तलाक मुक्ती मोर्चातील कार्यकर्ते एक गाणं म्हणतात— मानवतेची मशाल घेऊन पेटवतील हो रान। तलाक मुक्ती मोर्चासाठी लावू पणाला प्राण। आता उठवू सारे रान...

शबनम नावाची सात–आठ वर्षांची एक गोजिरवाणी मुलगी हे गाणं मोठ्या आवेशानं म्हणायची. तिला हे गाणं, हा मोर्चा, ही दगडफेक यांचा खरा अर्थच कळत नव्हता. दगडफेक चालू झाली की डोक्यावर चादर पांघरून ती बसच्या सीटवर खाली वाकून बसायची. एरवी तिला सगळ्याची गमतच वाटायची. ती आपली सारखी दहा महिन्यांच्या मुद्दस्सरशी खेळायची, दंगा करायची. या सगळ्या घटनांचा खरा अर्थ तिला आणखी काही वर्षांनी कळणार आहे. जेव्हा तिचा नवरा तिला जुबानी तलाक देऊ शकणार नाही, तेव्हा.

□



भाग दुसरा

# माझा भाऊ-अनिल

● चंद्रकांत बर्वे ●

१९७९ ची चिकमंगळूरच्या प्रसिद्ध निवडणुकीची वेळ आली. आणि अनिललाही लिखाणाची हुक्की आली. अनिल इंदिराबाईंचे बाजूने लिहिणार हे उघडच होतं... त्यामुळे महाराष्ट्रातल्या कोणत्या मोठ्या पेपरकरिता लिहिणं शक्य नव्हतं. स्वतःचा पेपर नाही ही खंत त्याला काही क्षण वाटली. 'नवाकाळ'च्या खाडिलकरांनी त्याला चिकमंगळूरला पाठविले त्याने काही लेख लिहिले. इंदिरा गांधींच्या नेतृत्वाचे महत्त्व, बाईंची राजकीय समज, पुरोगामी धोरणे... वगैरे लिहून जॉर्ज आणि इतर मंडळी कशी केवळ एका लाटेवर स्वार होऊन वर आली, असे वगैरे वगैरे लिखाण केले. अनिलच्या राजकीय लिखाणाची शैली मात्र सर्वसामान्य वाचकाची दाद मिळवणारीच असे. त्या थाटातच त्याने चिकमंगळूर निवडणुकीचा भरपूर समाचार घेतला. या वेळेपासून अनिलच्या राजकीय विचारसरणीचा प्रवाह कायमचा बदलला. त्याला कम्युनिस्टांपेक्षा इंदिराबाईंची काँग्रेस जवळची वाटू लागली. त्याने कुठे प्रो काँग्रेस असं फारसं लिखाण केलं नाही, पण भाषणातून अथवा वैयक्तिक चर्चेत तो नेहमी काँग्रेसची, नाईलाजाने का होईना, बाजू घ्यायचा. कम्युनिस्टांवरचे त्याचे प्रेम बरेच कमी झाले आणि तो आपले विचार मात्र अतिशय निर्भिडपणे मांडत असे. ऑडियन्सचा विचार न करता आपले विचार परखडपणे मांडणे हे त्याचे वैशिष्टय. औरंगाबादच्या Engineering College ने त्याला एका कार्यक्रमाला बोलावले होते. त्यावेळी जे. पींना जाऊन महिना झाला असेल नसेल, विद्यार्थ्यांनी डायसवर जे. पींची मोठी फोटोफ्रेम ठेवली होती. अनिलला त्या फोटोला हार घालून भाषण करण्याची विनंती केली गेली... अनिलने हार घातला सुरवातीला पाच मिनिटे जे. पीं. च्या गुणाबद्दल थोडेसे बोलला. त्यानंतर त्याने सरळ त्यांच्या विरोधात भाषण केलं. भूदानातील भोंदूगिरी, ओपन जेलचा बोगसपणा, जनता पार्टीतील तत्त्वशून्यतेकडे जे. पींनी कसा कानाडोळा केला... वगैरे... झालं. ऐकणारे स्तंभित झाले. हळूहळू विषय Corruption वर नेला. त्या निमित्ताने त्याने डॉक्टर लोक कशी नाडवणूक करतात... वगैरे बोलून त्याने मेडिकल प्रोफेशनवर तोंडसुख घेतले... श्रोते सगळे Engineering चे होते. त्यांनी त्याला छान दाद दिली. आता दाद मिळाली असतानाच एखाद्या हुषार नेत्याप्रमाणे आपले भाषण संपवावे की नाही ? पण नाही... पुढे त्याने असेच अनेक बदमाश लोक कसे इंजिनियर होताहेत याकडे आपला मोर्चा वळवला. झालं Audience पुन्हा गंभीरपणे वैतागून कुजबूज करू लागला... भाषण संपलं.... श्रोत्यांमध्ये मीही होतो... मला अनिलने केलेलं भाषण आवडलं. पटलं देखील... पण एक प्रश्न पडला. इतरांवर तोंडसुख घेण्याचा अधिकार त्याला आहे का ?

विमानाचा fare मिळाला तरच तो भाषणाला येई. संध्याकाळी उंची हॉटेलात त्याला जेवण लागतं. जेवणाअगोदर उंची दारू Status symbol म्हणून हवी. थोडक्यात म्हणजे तो भाषणातून जे काही बोलला ते बोलण्याचा त्याच्याकडे अधिकार नव्हता. इथे एक मोठी Contradiction माझ्या लक्षात येते. तीन वर्षांपूर्वी त्याला हे सगळं बोलण्याचा अधिकार होता. त्यावेळी त्याला बसभाड्यापुरते जरी पैसे मिळाले असते तरी तो कुठेही आनंदाने गेला असता आणि आपले विचार मांडण्याची संधी त्याने दवडली नसती... पण त्या वेळेस कधीच कोणी त्याला बोलावलं नाही . आणि आता वैयक्तिक आयुष्यातील ध्येयवाद बाजूला ठेऊन व्यावसायिक नाटककार झाल्यानंतर मात्र त्याला ठिकठिकाणची निमंत्रणे येऊ लागली. आता यात अनिलचा तरी दोष काय होता म्हणा ! !

यशस्वी नाटककार म्हणून मान्यता पावलेला असला तरी त्याने कधीही धंद्यासाठी म्हणून नाटक लिहिले नाही. कलात्मक पातळी सांभाळून, जाणीवपूर्वक मेहनत घेऊनच नाटके लिहिली. ह्यात कुठेही दांभिकपणा नाही. एखाद्या घटनेत नाटय आणि विविध पातळीवरील मनुष्यस्वभाव दिसला की तो त्याचे नाटयीकरण करत असे. स्वतःच्या मस्तीत, स्वतःचे समाधान होईल अशा पद्धतीनेच तो नाटक लिहायचा... मुळात त्याला राजकारणात इंटरेस्ट. त्यातून बऱ्याचशा राजकीय व्यक्ती त्याने जवळून पाहिलेल्या. तसंच कोणतीही घटना एखाद्या वेगळ्या अँगलमधून पहाण्यात त्याला इंटरेस्ट... परकाया प्रवेश हे त्याचं वैशिष्टय. त्यामुळे त्याच्या नाटकातील सर्व पात्रे ही मानवी स्वभावाची विविध चित्रणे होत... त्याच्या कोणत्याही नाटकाला ब्हिलन नाही. त्यामुळे स्वभाविकच तो सध्याच्या राज्यकर्त्यांना ठामपणे दोषी ठरवू शकत नव्हता. यातूनच 'आकाश पेलताना' या नाटकाचा विषय पुढे आला. मधुकर तोरडमल आणि अनिलने मिळून हे नाटक लिहावं अशी कल्पना तोरडमलना सुचली. चर्चा झाली. अनिलने काही पाने लिहून काढली. मामांनी ती वाचली. मामा खुष ! ! ते म्हणाले– अनिल हे नाटक फक्त तूच लिहू शकतोस आणि तूच लिही. मी बसवीन. अनिल स्पर्धेत बसविण्यासाठी म्हणून जेव्हा नाटक लिहीत होता तेव्हा ज्या अनिलच्या आवडत्या नाटककाराची त्याच्यावर छाप होती, त्याच नाटककाराने अनिलचा केलेला हा गौरवच म्हणावा लागेल. 'आकाश पेलताना'चे बरेच प्रवेश अनिलने 'ग्लाड' नंतर लगेच लिहिले होते. त्यात दोन व्यक्ती-

मत्त्वांतील संघर्ष अतिशय प्रभावीपणे माडला होता. पण नाटक पूर्णत्वास कसे न्यावे हे काही सुचेना. दरम्यानच्या काळात अनिलने काँग्रेसचे मोठे पुढारी जवळून बघितले. आजच्या सत्ताधाऱ्याविषयी त्यांच्यातील जातीयता, भ्रष्टाचार वगैरेविषयी अनिलने व इतरांनी अनेकदा लिखाण केलेले होतेच. पण एका गोष्टीवर त्याचा विश्वास होता. ती म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात याच मंडळींनी लढा दिलेला आहे. त्याग केलेला आहे. त्या काळात त्यांनी कधीही ब्रिटिशाची चमचेगिरी करून वरिष्ठपद मिळविले नाही. मग एकेकाळी ध्येयवादी असलेला तरुण कालांतराने सत्तापदस्थ झाल्यानंतर भ्रष्ट कसा काय होतो ? या प्रश्नाचे उत्तर लौकर सापडणे कठीणच.

म्हणूनच ते नाटक २–३ वर्षे तसे साईडला पडून राहिले .. मात्र नाटक अपुरे राहिले तरी चालेल. पण घद्यासाठी म्हणून मी ते कसेबसे पूर्ण करणार नाही हा अनिलचा बाणा मात्र कायम राहिला... दरम्यान चर्चा करून करून तोरडमल कटाळून गेले आणि त्यांनी अनिलचा नाद सोडून दिला. पुढे दोन वर्षांनी ते नाटक डॉ. लागूनी केले. 'आकाश पेलताना' मधील त्याचे राजकीय भाष्य अतिशय मार्मिक आणि सडेतोड आहे परंतु त्यातील नाटय अपुरे वाटते.

**'307 डाऊन'**

अनिलच्या घराजवळच्या 'रवींद्र नाटयमंदिर' मध्ये 'आकाश पेलताना' या नाटकाचा दुपारचा प्रयोग होता. अनिल प्रयोगाला Responce कसा आहे हे पहायला थिएटरवर गेला, पण दारू पिऊन. त्या प्रयोगाला कै. यशवंतराव चव्हाण आले होते. नाटकाचे प्रोडयूसर श्री. धूरत यांनी अनिलची अवस्था ओळखली. त्यांनी अनिलला बाजूला नेऊन स्पष्ट शब्दात सांगितले–Y. B. आलेले आहेत. पण तू फार प्यायलेला आहेस. अशा स्थितीत तू इथे थांबू नकोस.

पण अनिलचा 'इगो' दुखावला तो काहीही न ऐकता सरळ पहिल्या लाइनीत Y. B. च्या शेजारी जाऊन बसला. Y. B. ना एकूण परिस्थितीचा अदाज आलेला होताच. तो Y. B. ना म्हणाला...

'यशवंतराव, तुम्ही फार रसिक आहात. तुम्हाला साहित्याची बरीच जाण आहे असं मी ऐकून आहे. मी अनिल बर्वे ! या नाटकाचा लेखक. नाटक जर तुम्हाला आवडलं तर माझ्या घरी चहाला या... मी इथून जवळच रहातो !' असं म्हणून अनिल घरी निघून आला.

नाटकाचा पहिला अंक झाल्यावर, Y B. चा आणि कलाकारांचा परिचय... वगैरे झाल्यावर, Y. B. नी प्रोडयूसर धूरतना म्हटले की, अनिल बर्वेंच्या घरी निरोप पाठवा– मी चहाला येतोय म्हणून.

अनिलला निरोप मिळताच त्याची एकदम उतरली. Y.B. घरी चहाला आले आणि दोन तास गप्पा झाल्या. Y.B. ची रसिकता, साहित्याचा अभ्यास आणि राजकारणाचा व्यासंग अनिलला जवळून पाहायला मिळाला. अनिल त्यांच्यावर एकदम खूष ! आपण एका मोठ्या व्यक्तीशी उर्मटपणे बोललो याची त्याला मनातून जाणीवही झाली असावी. स्वतःचा गिल्ट कमी करण्यासाठी असेल कदाचित्... पण पुढे काही कथा लिहून झाल्यावर अनिलने यशवंतरावांची अपॉइंटमेंट घेऊन, त्यांच्या घरी जाऊन त्यांना आपले लिखाण वाचून दाखविले.

१९७७ साली जनता सरकार राज्यावर आल्यानंतर एक वर्षात त्याच्यात हाणामारीला सुरुवात झाली होती. भारताला कधी नव्हे तो दोन उपपंतप्रधान लाभले. झाल ! अनिलला विषय मिळाला. अनिलने त्याच्यावर एक झकास comedy लिहून काढली '307 डाऊन'. अनिलने त्यात गंभीरपणे राजकीय भाष्य न करता मस्तपैकी टिंगलखोरी केलेली आहे. या नाटकाच्या लिखाणात त्याच्या लेखनशैलीचा अगदी वेगळा पैलू दिसतो...पण झालं. अनिलचा स्वभाव पुन्हा आडवा आला. दोनतीन प्रवेश म्हणावे तसे जमत नाहीयेत म्हणून नाटक पडून राहिले ..पुढे थोडयाच दिवसात जनता सरकार गडगडले. त्यामुळे स्वाभाविकच नाटकाची टॉपिकॅलिटी गेली हे नाटक यापुढे कधीतरी स्टेजवर येईलही. पण जनता सरकारचे दोन उपपंतप्रधान असताना जर हे नाटक रसिकांना पाहायला मिळाले असते तर त्याचा मजा काही औरच आला असता. असो !

राजकीय लिखाण करणे अनिलला सहज जमले. कारण मुळात तो पत्रकार, शिवाय स्वतःचा अनुभव आणि इतरांचे अनुभव जवळून पाहिलेला. परंतु जो परकाया प्रवेश करू शकतो तो अस्सल लेखक होय आणि अनिलच्याबाबत ही बाब त्याच्या 'पुत्रकामेष्टी' या नाटकातून सिद्ध होते

एक दिवस मी पेपरमध्ये होनोलूलूची एक छोटी बातमी वाचली. अमेरिकेतील एका दापत्यास मूल होत नव्हते म्हणून त्यांनी एका वेश्येशी मुलाला जन्म देण्याचे कॉन्ट्रॅक्ट केले. मात्र मूल झाल्यावर वेश्येने ते मूल सोडायला नकार दिला. प्रकरण न्यायालयात गेले. न्यायालयाने वेश्येच्या बाजूने निकाल दिला. बातमी मला स्पर्शुन गेली. त्या घटनेतल्या तिन्ही व्यक्तींबद्दल सहानुभूती वाटली. दोन दिवसांनी अनिलचा मुंबईहून फोन आला–

'चंद्या तू सध्या पेपर वाचतोयस का ?'

मी होय म्हटलं

मी ओळखल की अनिलचाही त्या बातमीच्या संदर्भातच फोन असणार. मी लगेच ती बातमी त्याला सांगितली... अनिल त्या घटनेने फारच भारावून गेला होता. त्या घटनेवर अनिलने सविस्तर बोलायला सुरुवात केली एकदा आपले विचार कोणाशी तरी शेअर करायचे ठरल्यावर, ट्रंककॉलचे बील किती वाढतेय याचा विचार करणाऱ्यातला अनिल नव्हता. त्या बातमीने त्याला 'पुत्रकामेष्टी' नाटकाचे बीज मिळाले. आकाश पेलताना बाजूला पडले. 'डोंगर म्हातारा झाला' चे नाटक करण्याचे पूर्वीच साईडिंगला पडलेले होते. पुत्रकामेष्टीसाठी कायदा, मानसशास्त्र यांचं वाचन आणि मित्राशी चर्चा सुरू झाल्या. नाटक पूर्ण झाले. पुत्रकामेष्टी ! अनिलला स्वतःला दोन हेल्दी मुलं आहेत. परंतु निपुत्रिकाचे प्रॉब्लेम्स आणि मनोअवस्था त्याने फार चांगल्या तऱ्हेनं मांडले.

नाटकाशिवाय इतर लिखाणही त्याच्या मूडनुसार चालायचं, यात एक महत्त्वाचं म्हणजे त्याने कधीही चाकोरीबद्ध विषय निवडले नाहीत अनिलने निवडलेल्या विषयांची रेंज फार मोठी आहे. इतके विविध विषय क्वचितच कोणी लेखकाने हाताळले असतील.

चासनाला खाणीतील अपघातावर त्याने 'अकरा कोटी गॅलन पाणी' ही कादंबरी लिहिली होती. अर्थात अनिल कोणतेही लिखाण करायला तो त्या ठिकाणी स्वतः जाऊन माहिती गोळा करायचा.

स्वत: अनुभव घ्यायचा. त्याने चासनालाला मुक्काम केला. काही इतर कोळशाच्या खाणीदेखील तो पाहून आला. अनिलच्या लिखाणाचा incubation period हा मोठा असायचा. खूप पाहून विचार करून एखादा विषय त्याच्या डोक्यात खूप काळ घोळत असायचा. त्यासाठी कित्येकदा तो रात्री अपरात्री विचार करत असायचा. तोंडात तबाखू ठेऊन आणि येरझारा घालत त्याचं डोकं काम करीत असायचं. त्यावेळेस तो अजून दारूच्या आहारी गेलेला नव्हता... मात्र त्याला दारू आवडायला लागलेली होती. मात्र एकदा लिहायला सुरुवात केली की सर्व लिखाण तीनचार बैठकीत एकटाकी तो पूर्ण करीत असे. रीराइटिंग हा प्रकार क्वचितच चाले. पाने वाढविणे किंवा त्यासाठी पाणी घालणे हा प्रकार त्याला ठाऊक नव्हता. त्यामुळे अनिलची सर्व पुस्तके १०० पानाच्या आतबाहेरच आहेत. मात्र त्यात कुठेही स्कीप ओव्हर करायला जागा नाही.

अशीच अेक कादबरी स्टडफार्म. रेसच्या घोड्याना ते म्हातारे झाल्यानतर कधी टाग्याला जुपत नाहीत. सरळ गोळी घालून ठार करतात. ही बाब बऱ्याचजणाना माहीत असते. अनिलने मात्र अनुषंगिक अभ्यास करून ही कादंबरी लिहिली. ही कादंबरी फारच छान उतरली आहे, पण म्हणावी तशी ती वाचकापर्यंत पोहोचलेली नाही...का? कोण जाणे! 'अनिल बर्वे' या बॅनरला पूर्णपणे न्याय देणारी ही त्याची शेवटची कादंबरी...त्यापुढेही त्यानं बरच लिखाण केलं. पण त्यातील कस उतरायला लागला नवीन विषयाचा शोध आणि नवीन विचार करण हे चालू होतच....त्यातूनच पुढे कादबरी आली 'युद्धविराम' (अनिलच्या पुस्तकाची नाव फार छान असतात. आठवून पहा.)

एका गावात निर्माण होणारा माल दूरवरचं अतर कापून दुसऱ्या गावात विकून आणि त्या बदल्यात तेथे उगवणारी गोष्ट पहिल्या गावी आणणं याला आपण व्यापार म्हणतो आणि हा व्यवसाय करणारे व्यापारी! परंतु फाळणी झाली. दोन गावे दोन राष्ट्रात विभागली गेली. त्यामुळे कालपर्यंत पारपारिक व्यवसाय करणारी व्यापारी मडळी आज स्मगलर ठरली. अनिलला विषय मिळाला. त्याने आपल्या बीएसएफ मधील मित्राशी सपर्क साधला. भारत-पाक हद्दीतील छावणीत मुक्काम केला. भारतीय आणि काही पाकिस्तानी सैनिकाशी परिचय झाला. दोन शत्रू राष्ट्रातील सैनिक ह्यूमन लेवलवर मात्र, एकमेकाचे साधे सरळ मित्र असू शकतात हे त्याने पाहिलं, सध्या शातता असल्याने सर्व कसं ऑलवेल आहे अनिलला प्रश्न पडला आता एकमेकाच्या खिशात हात घालून बिडी घेणारे हे दोन मित्र, उद्या दिल्ली आणि कराचीत वितुष्ट आल तर एकमेकाला गोळघा घालून ठार करतील काय? खरं म्हणजे हा प्रश्नच नव्हे. उत्तर अगदी सरळ आहे. होय! क्षणाचाही किलब न करता एकजण आपली बंदूक दुसऱ्याच्या छाताडात रिकामी करू शकतो. इथे मानवी समाजातील एक मोठी विसंगती दिसून येते. काही वर्षापूर्वी अनिलला अशा प्रश्नानी फारसे भेडसावले नाही. कारण या सर्व विसगती दूर करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे कम्युनिझम हे उत्तर त्याच्या भाबडेपणाला मनोमन पटलेलं होत त्यामुळेच व्हिएटनाम युद्ध सपल्यावर आपल्या रणांगणमध्ये त्याने 'लाल क्राती चिरायू होवो.' चा घोष लावला होता; पण चीन–व्हिएटनाम युद्धामुळे त्याला कळलं की, कम्युनिझम म्हणजे आपण समजतो तितकी साधी सरळ गोष्ट नव्हे. कम्युनिझम म्हणजे युद्धविराम नव्हे. त्याने आपली लेखणी या विषयावर चालवायच निश्चित केलं. डोक्यातील चक्रे फिरू लागली. सैन्यातील लोकाशी दारू पीत गप्पा केल्या. कच्छच्या रणात उंटावरून भटकला. तिथल्या खेडूताशी गप्पा मारल्या. फाळणीवर पुन्हा वाचन केले आणि युद्धविराम कादबरीला सुरुवात झाली. ही कादबरी फार वरच्या पातळीवर जाईल अशी माझी अपेक्षा होती; पण म्हणावी तशी अजून त्याच्या लिखाणाची बैठक जमेना. सुचेनासं झाल्यावर त्याचा दारूचा पेग मोठा व्हायला लागला. पान कमी लिहून झाली; पण दारू जास्त पिऊन झाली. कादबरी पूर्ण झाली. चागली झाली; परतु जी उची गाठणे अपेक्षित होतं ते झाल नाही.

मात्र दरम्यान अनिलचे पिणे बरेच वाढले. तो न पिणाऱ्यातला कधीच नव्हता; पण पूर्वी तो गंमत म्हणून प्यायचा, आता हळूहळू तो गरज समजून पिऊ लागला.

नवीन विषयाच्या शोधात तो नेहमीच असायचा. त्यातून त्याने पक्षांच्या अभयारण्यावर 'होरपळ' ही लघु कादबरी लिहिली. विषय चागला. लिखाणाचा प्रयत्न स्तुत्य; परंतु त्याच्यावर अनिल बर्वे या बॅनरची मुद्रा काही तो ठीक उमटवू शकला नाही. अनिलची सर्वात सामान्य दर्जाची कादबरी हीच म्हणावी लागेल.

साधारण ८२ सालापासून त्याची पत्रकारिता बरीच खाली आली. राजकीय आणि इतर क्षेत्रात भाष्य करण्यायोग्य अनेक घटना घडल्या; पण अनिलने त्यावर कधी लिखाण केलं नाही. तो चर्चा मात्र भरपूर करायचा.

## विसंगती

अनिलच्या वागणुकीत ज्या विसंगती येऊ लागल्या त्यातील एक महत्त्वाचे कारण म्हणजे त्याला आलेले Political frustration. उजव्या पक्षाना तो पूर्वीपासूनच शिव्या देत आलेला आणि तथाकथित डाव्यामध्ये सुदोपसुदी असतेच. 'दलित पँथर' ज्यांना एकेकाळी अनिल क्रातिकारक समजायचा, त्याचाही जातीयवाद एव्हाना स्पष्ट झालेला होता. त्यामुळे अनिल कोणत्याच राजकीय पक्षाशी बाधिलकी मानायला तयार नव्हता. अनिलसारख्याला चुकीची असली तरी हरकत नाही; पण राजकीय बाधिलकी ही गरज असते. त्यातल्यात्यात त्याला इंदिरा काँग्रेसचं उडदामाजी बरी वाटायची. ८० च्या निवडणुकीत त्याने आय काँग्रेसचा प्रचार केला. झाल! डाव्यांनी अनिलला वाळीत टाकले. अपवाद फक्त 'श्री. डागे' ते अनिलची टॅलेन्ट आणि 'मूर्खपणा' या दोन्ही गोष्टी चागल्या प्रकारे ओळखून होते. अनिलला राजकीय नैराश्य आल्याने त्याची पत्रकारिता बरीच कमी झाली आणि इतर जे काही लिहिलं त्यातही फारसा दम नव्हता. त्याने 'रसरंग' मध्ये 'सिंहासन' या सिनेमा निमित्ताने एक लेख लिहिला. त्यात त्याने डॉ. जब्बार पटेल वगैरेंवर विनाकारण अत्यत चीप लिखाण केले. हा लेख म्हणजे अनिलच्या वाईट लिखाणाचे एक चांगले उदाहरण म्हणावे लागेल. त्यात त्याने कुठेही चागले तात्त्विक विवेचन न करता फालतू वैयक्तिक दोषारोप ठेवले.

अनिलचा अभ्यासपूर्ण वैज्ञानिक दृष्टिकोन कधीच नव्हता. मात्र मार्क्सवादाच्या वाचनातून त्याला भौतिकवादी दृष्टिकोन समजला

होता; पण हळूहळू हाही विचार अनिलच्या कृतीतून जाऊ लागला आणि त्याच्या पुढल्या थोड्याबहुत लिखाणातून फक्त वैचारिक अनागोंदी दिसून येते. 'सुखसागरबाबा' चे एक प्रकरण मध्ये गाजले. बहुतेक पुरोगामी वा समाजवादी लोकांनी त्याविरुद्ध रान उठवले. अनिलने मात्र लोकसत्तातील लेखातून या बाबावर मानसोपचार करावेत व त्याला मोठा करण्यात त्याचे भक्तगण दोषी आहेत, तो निर्दोष आहे वगैरे वगैरे विचार मांडले. त्याच लेखातून त्याने आम्ही सोशल वर्क करू वगैरे बाता केल्या. अर्थात पुढे काम कधीच केलं नाही हे काही वेगळ सांगायला नकोच. आता तो दारूच इतकी आवडीने प्यायचा की त्याला स्वत:चे लिखाण करायलाही वेळ मिळायचा नाही, तर तो 'सामाजिक कार्य' कोठून करणार ? मात्र तो हे सत्यही स्वीकारायला तयार नव्हता.

स्वत:च्या दारू पिण्याला तो नित्यनेमाने वेगवेगळे कारण व नाव देऊ लागला त्याला कोणी व्यसनी किंवा दारूड्या म्हटलेलं चालायचं नाही तो स्वत:ला सोशल ड्रिंकर म्हणून संबोधू लागला.

दारूचे व्यसन लागल्याने पैशाची कायम गरज असायचीच. त्यामुळे कोणीही संपादक-वगैरे अनिलकडे आला तर अनिल लगेच त्याच्याकडून पैसे घेऊन त्याला एखाद्या दिवाळी अंकासाठी लेख प्रॉमिस करायचा पैसे हातात आले की लिखाण कमी पण लिखाणासाठी मद्यपान बरेच करायचा. दिवाळी जवळ आली की दिवाळी अंकाची घाई. मग अनिलचे लिखाणही घाईत सुरू रहायचे. त्याचे दिवाळी अंकातील लिखाण, एकीकडे अनिलचे लिखाण चालू आहे, दुसरीकडे छपाई चालू आहे, याच पद्धतीने व्हायचे.

मद्यपानामुळे अनिलच्या व्यक्तिमत्त्वाचे शेवटच्या दोनतीन वर्षात total transformation झालेले दिसून येते. 'अल्कोहोलिक अनिल' हे एक वेगळच रूप त्याने धारण केल अनिलच्या मूळ स्वभावातील सुप्त दुर्गुण या अल्कोहोलिक अनिलमध्ये पूर्णपणे उफाळून आले– 'आज मराठीतील सर्वश्रेष्ठ लेखक मी ! ... मी एकटा राहाणार ! कोणी मला पैसे दिले म्हणजे उपकार होत नाहीत, ते लगेच परत केले पाहिजेतच असे नाही ! मद्यपानामुळे माझा तोटा न होता फायदाच झालेला आहे. घरातील बाकी सर्व मूर्ख आहेत' ..वगैरे वगैरे

## ससेहोलपट

त्याला मद्यपानापासून परावृत्त करण्याचा अनेकानी अनेक पद्धतीने प्रयत्न केला; पण व्यर्थ. प्रेरणाचे किती हाल झाले हे कोणत्याही दारूड्याच्या बायकोला विचारले तर कळू शकेल. अनिलची दारू सुटावी म्हणून त्याला AA–Alcoholics Anonymous च्या मिटिंगला प्रेरणा घेऊन जायची...पण फायदा काही झाला नाही. कारण तो स्वत.ला दारूपासून मुक्त करू इच्छित नव्हता. दारूच्या त्वरित मिळणाऱ्या आनंदापाई कालांतराने, आपल्याला फार त्रास होईल ही गोष्ट तो मानायलाच तयार नव्हता. उलट त्याने स्वत.चेच दारू आपणास कशी आवश्यक आहे, असे brain washing केले होते. अनिलची दृष्टी शुद्ध वैज्ञानिक दृष्टी नव्हती. त्यामुळे डॉक्टरानी केलेले त्याचे मनोविश्लेषण तो मानायला तयार नव्हता. बरे तो धड दैववादीही नव्हता. नाही तर AA च्या मिटिंग्जचा त्याच्यावर चांगला परिणाम झाला असता. तो वैचारिक भ्रमनिरास झालेला असाच कुठे तरी लोंबकळत होता. मात्र लिखाणाचं तंत्र अवगत आहे, नाव मिळालेलं आहे या जोरावर स्वत:च्या प्रत्येक कृतीला वैचारिक अधिष्ठान असल्याचा आभास निर्माण करणारे तो भाषण ठोकायचा. नाही तर लिखाण करायचा. त्यातूनच त्याने 'बेवडा बावडी' हे सोबतच्या दिवाळी अंकासाठी आत्मकथन लिहिले. तो त्याच्या इतर लेखनात जितक्या तटस्थपणे विविध कॅरेक्टर्सच्या मनाचा वेध घेत असे तसा तो स्वत:चा घेऊ शकत नव्हता. त्याने आपल्या लिखाणात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे स्वत:च्या प्रत्येक कृतीचे समर्थन केलेले आहे. त्याने स्वत.च्या वेश्यागमनाचा अनुभवाचं कथन केलं. झालं ! साधारणत: हे धाडस कमी लेखक करतात त्यातून त्याने आपल्याबद्दलची वाचकाची विश्वासार्हता वाढवली आणि मग त्यात त्याने इतर ५–७ खोट्या गोष्टी कोंबून टाकल्या, आणि प्राजळ आत्मकथनाचा आभास निर्माण करणारे आत्मसमर्थनपर लिखाण त्याने केलं. ओघानेच मद्यपानाचेही समर्थन त्यात आलेच.

पण आपला समाज काही बाबतीत फार हुषार आहे. थोडीशी दारु पिणाऱ्याला समाज 'सोशल स्टेटस' देतो पण अती करणाऱ्याला बरोबर हुट आऊट करतो. अनिलच्या या लेखावरही बऱ्याच वाचकानी टीका केली. परंतु तो एव्हाना इतराना मूर्ख समजू लागल्याने त्याला याचं काही फार वाटलं नाही. एक मात्र खरं. अनिल उर्मटपणे वागायचा पण लाचारपणे कधीही नाही. याला कुणी प्रतिष्ठित व्यक्तीही तो अपवाद करायचा नाही.

महाराष्ट्रातील बऱ्याच मोठ्या पुढाऱ्यांशी अनिलचा या ना त्या निमित्ताने परिचय होता पण अनिलने 'दोस्ती' अशी कोणाशी कधी केली नाही. एक म्हणजे त्याला कुणाकडून काम वगैरे करून घ्यायची कधी गरज भासली नाही आणि दुसरं म्हणजे स्वत:पेक्षा दुसऱ्याला जास्त महत्त्व देण त्याला जमत नसे. सामान्य जन मोठ्या माणसाशी फार आदबीने वागतात, याची रिॲक्शन म्हणून की काय, कोण जाणे, पण कोणत्याही मोठ्या व्यक्तीशी अनिल कधी फारसा आदबीने बोलायचा नाही किंबहुना तो जरा अगाउपणेच बोलायचा. अनिलला तोंडावर झापणारी एकच व्यक्ती भेटली. ती म्हणजे श्री. अ. डांगे...अनिल त्यांना आवर्जुन भेटायला जायचा. गप्पा मारता मारता अनिलने स्वत.ची जरा जास्त अक्कल चालवली की डांगे त्याला तत्क्षणी तुला काही कळत नाही वगैरे त्याच्या मिष्कील पद्धतीने सांगत.

भारताच्या राजकारणात एकूणच ७४ ते ८० च्या दरम्यानचा काळात अनेक राजकीय प्रवाहांना वाव मिळाला. या काळात बऱ्याच घडामोडी घडल्याने अनेक राजकीय पुढारी व पक्ष या काळात एकमेकांचे शत्रू व मित्र बनले होते. अनेक शहाण्याची वैचारिक दिवाळखोरी स्पष्ट झाली. या दरम्यान अनिलच्या राजकीय विचारसरणीचीही अशीच ससेहोलपट झाली होती. त्याच्या एक गोष्ट लक्षात आली की 'डांगे' याच व्यक्तीची राजकीय मतप्रणाली कधीही बदलली नाही. त्यामुळे तो 'डांगेना' देव मानायचाच बाकी राहिला. बाकी प्रत्येक ठिकाणी 'डी' काय म्हणतात याचाच तो विचार करायचा...डांगे देखील अनिलसाठी बराच वेळ द्यायचे. तो वेडेवाकडे काही बोलला की त्याला त्वरीत वाजवायचे; पण त्याच्या

ललित लिखाणावर मात्र डागे नेहमीच खूष असत.

अनिलचे शेवटचे उत्कृष्ट लिखाण म्हणजे Whose Life is this any way! या मूळ इंग्रजी कादबरीच्या कल्पनेवरील आधारित नाटक 'मी मालक या देहाचा!' यात Mercy killing चा विषय त्याने हाताळला आहे. हा गंभीर विषय अनिलने अतिशय अभ्यासपूर्वक मेहनत घेऊन हाताळला. अपघातात विकलांग झालेला एक कलाकार आत्महत्येच्या विचारात आहे आणि त्याचा डॉक्टर मित्र त्याला जगवण्याचा प्रयत्न करतो आहे. जीवन म्हणजे एकूण आहे तरी काय? जगायचे कशासाठी? वगैरे तात्त्विक चिंतन अतिशय प्रभावी संवादातून उभे राहते. हे नाटक 'नाट्यसंपदा'ने स्टेज केले. स्टेजकरिता काही कॉंप्रमाइझेस करूनही हे नाटक व्यावसायिकदृष्ट्या अपयशी ठरले. मात्र या नाटकाच्या लेखनावर लेखकाची मुद्रा स्पष्टपणे उमटलेली आहे.

अनिलच्या व्यक्तिमत्त्वातील एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे तो जे काही लिहू शकत होता ते तो जगू शकत नव्हता. अनिलच्या शेवटच्या दोन वर्षांत याचा चांगला प्रत्यय आला. अनिल भरपूर प्यायचा. त्याच्यावरून घरात वादावादी व भाडणे नेहमीच चालायची. 'मी मालक या देहाचा' मध्ये डॉ. विक्रम कपूर या पात्राच्या तोंडी लेखकाची जीवनाची ओढ आणि अनुषंगिक भाष्य आहे. हेच भाष्य मी त्याला प्रत्यक्ष ऐकवलं असता, तो चुकीचा असा वाटेल तो युक्तिवाद करायचा.

प्रथम स्वतः व्यसनी आहोत हेच मान्य करायला तो तयार नव्हता... पुढे पुढे आपल्याला दारूची आवड आहे व आपण मनसोक्त पितो हे मान्य करायचा पण दारूमुळे आपले काहीही नुकसान झालेले नाही, आपल्या डॉक्टराना फारसे कळत नाही, डॉक्टर लोक स्वतःदेखील दारू पितात....वगैरे वगैरे बोलायचा. अशात त्याला दोनदा हॉस्पिटलमध्ये अॅडमिट केले. त्यामुळे पुढे दारू ही प्रकृतीस अपायकारक नाही हा युक्तिवाद करता येत नव्हता. कारण त्याची प्रकृती फारच ढासळली होती हे अगदी स्पष्ट झालेले होते. मग त्याने अंतिम युक्तिवाद केला. दारू न पिता जगण्यापेक्षा मला दारू पिऊन मेलेल आवडेल. एखादा हुशार माणूस जेव्हा बुद्धचा या युक्तिवादाचा आधार घेऊ लागतो तेव्हा...

अनिलची मुळातली तब्येत चांगली होती. त्यामुळे तुरुंगबाजआजारपण वगैरेतून खराब झालेली तब्येत महिन्या दोन महिन्यात भरून निघत असे. त्याच्या शरीराला व्यायामाची जरी नाही तरी कष्टाची भरपूर सवय होती. त्यामुळे आपण हेल्दी असताना वाटेल तेवढं खाल्लं–प्यायलो तरी आपल्याला काहीही होणार नाही, असा त्याला ओव्हर कॉन्फिडन्स असायचा. अनिलच्या व्यसनाचे मूळ शोधायला एक गोष्ट लक्षात येते. संघवाल्या मंडळीच्या दृष्टीने साधारणतः दारू, सिगारेट या गोष्टी निषिद्ध असतात. असे विचार साधारणतः कम्युनिस्टाचे नसतात याला कारण म्हणजे (माझ्या अंदाजानुसार) कम्युनिस्टांचा संबंध कष्टकऱ्यांशी जास्त येतो की, ज्याच्यात दारू ही गोष्ट कॉमन आहे आणि प्रत्यक्ष काम न करणाऱ्या कम्युनिस्टांच्यातदेखील पूर्वापार चालत आलेल्या रूढीना तडा देण म्हणून इतर सामान्य मध्यमवर्गीयांना वर्ज्य असलेल्या गोष्टी ते आवर्जून करतात. उदा. संघवाले सिगारेट पीत नाहीत आणि कोणी प्यायलीच तर ती चोरून वगैरे पितात आणि आपले आईवडील वा इतर वरिष्ठ यांच्यादेखत तर ते कधीच पिणार नाहीत. याची रिअॅक्शन म्हणून की काय अनिलला सिगारेटची आवड नसतानाही तो तरुणपणी एखाद दुसरी सिगारेट जी ओढायचा, ती आमच्या वाड्याच्या समोरील कट्ट्यावर बसून सर्वांच्यादेखत ओढायचा. त्यामुळे पोरगं हाताबाहेर गेलंय हे घरच्याना पूर्वीच कळलं होतं. सिगारेट हा प्रकार त्याला कधी फारसा आवडला नाही त्यामुळे तो सिगारेट क्वचितच पीत असे. दारू मात्र त्याला आवडायची; परंतु साधारणतः ७८ सालापर्यंत तो रणांगणचे संपादन, अथवा इतर राजकीय व स्वतःचे ललित लिखाण यात फार बिझी असायचा. त्यामुळे त्याला दारू प्यायला सवड मिळायची नाही. त्या काळात आपल्या सोसायटीमध्ये 'अनिल बर्वे' ही इमेज त्याला तयार करायची होती. स्वतःचे घर घ्यायचे होते वगैरे. त्यामुळे अनिलच्या व्यक्तिमत्त्वात 'अल्कोहोलिक अनिल' हे जे दुसरे रूप होते ते सुप्तावस्थेत होते. 'ग्लाड' आणि 'कोठी'च्या यशानंतर त्याला पैसा; प्रसिद्धी मिळाली. तो फ्लॅटमध्ये राहायला गेला. त्याला सिमेन्स इंडिया या मल्टिनॅशनल कंपनीत मासिक काढायचे काम मिळाले. मानधन अर्थात भरपूर. त्यापुढे त्याचा लिखाणाचा स्पीड कमी आणि प्यायचा स्पीड वाढत गेला. तरीपण तो जे प्यायचा ते पिणे या सदरातच मोडणारे होते. म्हणजे प्यावं, प्यायल्याने मजा येते वगैरे; पण पुढे म्हणजे साधारणतः ८२ सालापासून पिणे ही त्याची गरजच होऊन बसली. त्यामुळे कोणीही चर्चेला किंवा पार्टीला बोलावले तर तो अवश्य जायचा. आणि गप्पा मारता मारता भरपूर प्यायचा. कोणा समव्यवसायिकाचा जर फोन आला की मला आपल्याशी...याविषयी बोलायचे आहे वगैरे ..तर अनिल त्याला अपॉइंटमेन्ट देतानाच येताना बाटली घेऊन या असं सांगायचा.

## कसोटीचा काळ

आता दारू ही प्रकृतीला अपायकारक आहे आणि शिवाय मद्यपानात वेळ गेल्यामुळे आपले लिखाण कमी होतंय हे न समजण्याइतका अनिल काही भाबडा नव्हता. पण दारू हा प्रकार त्याला इतका आवडायचा की, तो या मुद्द्याकडे डोळसपणे कानाडोळा करायचा.

८२ साली त्याला कावीळ झाली. १५ दिवस हॉस्पिटलमध्ये ठेवावं लागलं. तेव्हा त्याला दारूच्या दुष्परिणामाचे गांभीर्य प्रथमच जाणवले. तेव्हा आपली अत्यंत आवडती अशी दारू केवळ नाइलाजास्तव त्याने सोडायची ठरविले; पण ही गोष्ट इतकी सोपी असणार नव्हती. एकूणच त्याच्या क्रिएटिविटीला दारू ही अपायकारक असली तरी गेल्या दोन वर्षांत लिहिताना दारू घ्यायची सवय त्याला झाली होती. त्यामुळे लिखाण आणि मद्यपान याच्यातील एक खोटं असोसिएशन मनात तयार झालेलं होतं. शिवाय त्याच्या शरीराला आणि मनाला दारूची सवय झालेली असल्याने दारू सोडल्यावर काही महिने अस्वस्थ वाटणे स्वाभाविकच होते. अल्कोहोलिक अनिलला नॉर्मल अनिल या जुन्या ट्रॅकवर आणणं ही एक मोठी प्रक्रिया होती. यासाठी ६ महिने ते १ वर्ष हा जो ट्रान्झिशन पिरिअड होता हा खरा त्याचा कसोटीचा काळ होता. हा जर काळ अनिलने ओलांडला असता तर अनिल आयुष्यात आणखी बरंच काही करू शकला असता.

पण असे होणे नव्हते.

तीन महिने अनिलने दारूला स्पर्शही केला नाही. अंग थरथरायचं लिहिणं काही जमेना. मन [शात नसल्याने काही उच्च कलात्मक सुचण शक्यच नव्हतं. या सगळ्या गोष्टी त्याला असह्य झाल्या. मी दारू सोडल्यामुळेच मला काही सुचेनासं झालंय अस त्याच्या मनाने घेतलं. आता ही गोष्ट तात्पुरती खरी होती; पण ती कायमचीच की काय, अशी शका त्याला चाटून गेली. दोन दिवसात शकेचं खात्रीत रूपातर झालं.

त्यावेळचा खरा प्रश्न असा होता की, सहा महिने असाच त्रास घेऊन नॉर्मल अनिल या ट्रॅकवर यायचे की त्वरित दारू पिऊन अल्कोहोलिक अनिल या ट्रॅकवर जायचे व त्वरित तात्पुरता आनद घेऊन संपायचे? त्वरित मिळणाऱ्या आनंदाला मानवी मन नेहमीच चटावलेले असते. त्यात अनिलजवळ पेशन्स हा प्रकार कमी. त्याने ठरविले की, दारू न पिता, लिखाण न करता नुसते जगण्यापेक्षा दारू पिऊन, लिखाण करून मेलेल चागलं.

## बदललेलं वातावरण

झालं...अनिलने लिहिण्यास स्फूर्ती मिळावी या Pretext खाली हळूहळू १, २, ३, ४ पेग घ्यायला सुरवात केली. तात्पुरते बरे वाटले. तात्पुरते बरे लिखाणही झाले; परंतु थोडेच दिवसात तो पुन: अल्कोहोलिक अनिल या ट्रॅकवर जाऊन पोहोचला. नंतर आपल्या मनाची टोचणी कमी व्हावी म्हणून दारू आपल्याला आवश्यक आहे अशी त्याने स्वत:ची समजूत करून घेतली. त्याने स्वत:चेच ब्रेन वॉशिंग करून घेतल. घरच्याशी, सगळ्याशीच यावरून त्याच भाडण व्हायचं; पण त्याचा खरा त्रास झाला तो प्रेरणाला. साधारणत: ८३ सालापासून तर त्याने सकाळी उठल्यापासून दारू प्यायला सुरूवात केली. मुलांना शिकवणे, त्याच्यावर संस्कार करणे ही बाब तर दूरच राहिली.

एकूणच अनिलचे घर हे सोशल असल्याने त्यांच्याकडे जो कोणी येईल त्याचे आदरातिथ्य व्हायचेच. त्यात आलेल्या पाहुण्याची लायकी ही गोष्ट फारशी विचारात घेतली जायची नाही. (हा दोष मात्र अनिलपेक्षा प्रेरणाकडे जास्त जातो.) अनिल प्रेरणा जेव्हा जेकब सर्कलला राहायचे तेव्हा कोणीही सोकॉल्ड ओळखीचा त्याच्याकडे मुक्काम टाकायचा. पुढे दादरच्या फ्लॅटमध्ये आल्यावर जरा परिस्थिती सुधारली. पण पुरती सुधारली नाही. आता अनिल पुरता अल्कोहोलिक झाल्यामुळे काही टपरी दारुडे अनिलबरोबर दारू प्यायला म्हणून घरी बसू लागले... अनिलबरोबर त्यांचही जेवण सुटू लागलं. जेवण झाल्यावर दारू पीत झोपून जायचं. फक्त एवढच करायचं की, अनिलने हाकलून देऊ नये म्हणून त्याच्याविरुद्ध काहीही न बोलता, त्याची जमेल तशी स्तुती चालू ठेवायची. कुणाला तरी शिव्या घालायची सणक. आलीच तर दुसऱ्या एखाद्या लेखकाला शिव्या घालायच्या. त्या काळात घरात जे वातावरण होतं ते अगदी एकच प्यालाची आठवण करून देणार होत. येणारे हे पाहुणे केवळ दारूसाठी येतात (हां, कधीकधी तेही बाटली घेऊन यायचे. फक्त पैसे अनिलकडून घेऊन जायचे) हे अगदी स्पष्ट होत.

मी अनिलला म्हणायचो देखील की, या लोकाना लाथ मारून त्यांना हाकललं पाहिजे. पण मग अनिल त्याच्या पद्धतीने आज त्याच्याकडे पैसे नाहीयेत म्हणून तू ही भाषा करतो आहेस.. वगैरे वगैरे पाल्हाळ लेक्चर मला द्यायचा.

एक वर्षापूर्वीपर्यंत अनिल चागल्या प्रतिष्ठित लोकांबरोबर बसून चांगली प्रतिष्ठित दारू प्यायचा. या प्रतिष्ठितांची यादी पानभर होईल. पण आता जेव्हा तो चहाऐवजी देखील दारू पिऊ लागला तेव्हा त्याचा ऑडियन्सही बदलला. अनिल मेल्यानंतर गेल्या वर्षभरात चुकूनही त्यापैकी कोणी अनिलच्या घरी फिरकले नाहीत.

नवऱ्याची दारू सुटावी म्हणून जे करता येणं शक्य असते ते सर्व प्रेरणाने केले. दारूच्या बाटल्या लपवून ठेवणे, त्यातली निम्मी दारू ओतून त्यात पाणी भरणे, घर सोडून पुण्याला सासूकडे जाऊन रहाणे... वगैरे. परंतु अनिल काही बदलणाऱ्यातला नव्हता. अल्कोहोलिक्स ॲनॉनिमसच्या मिटिंग्जना ती अनिलला घेऊन जायची. पण त्याचाही उपयोग झाला नाही. AA च्या मिटिंगचा योग्य परिणाम व्हायचा असेल तर माणूस जरा भावडा असायला हवा असं मला वाटतं. पण अनिलचं तस नव्हत. बरे! त्याचा ईश्वरावर किंवा धर्मावरही विश्वास नव्हता. त्यामुळे आध्यात्मिक पद्धतीच्या आवाहनाचा त्याच्यावर काहीही परिणाम व्हायचा नाही. AA च्या मिटिंग्जमध्येही अनिलने दारूचे महत्त्व पटवून देणारं भाषण देऊन एकदा तमाशा केला होता. पुढे प्रेरणाने AA च्या मिटिंग्जचा नाद सोडून दिला.

मी कधी कधी रात्री औरंगाबादहून फोन करायचो. रिंग बराच वेळ वाजायची... रिसिव्हर उचलल्यावरही मोठा पॉज जायचा... जड आवाजात अनिल हॅलो म्हणायचा. त्याच्या नुसत्या हॅलोवरून तो भरपूर प्यायलाय हे कळून यायच... मी त्याला म्हणायचो की तू भरपूर प्यायला आहेस, परंतु तो मी आता भरपूर लिखाण करून एक पेग घेतलाय म्हणायचा. फोनवरुन त्याच्याशी वाद घालण्यात काही अर्थ नसायचा; पण एकूणच तो आता ढासळायला लागलाय हे लक्षात येऊ लागलं होतं.

अल्कोहोलिक अनिल हा पाच वर्षापूर्वीच्या अनिलपेक्षा पूर्ण विरुद्ध वागायचा, बोलायचा. पूर्वी तो प्रेरणाची खूप स्तुती करायचा. (ओव्हर स्तुती करायचा) आता तो तिला शिवीगाळ करायचा. पूर्वी मुलाकडे त्याच विशेष लक्ष असायच. पण आता मुलांचा विचार करायला त्याला वेळ नसायचा. पूर्वी तो आपले विचार माडायचे या हेतूने लिखाण करायचा व गरज म्हणून पैसे घ्यायचा. आता तो पैशासाठी म्हणून लिखाण करायचा आणि मग लिहिता लिहिता काही विचार माडायचा. एक मात्र खरं! हाथी मरा भी तो नऊ लाखका. त्याच्या पडत्या काळातील लिखाणातसुद्धा स्पार्क दिसायचा. कारण तो लिहिताना बऱ्यापैकी डीवलास व्हायचा. (इथे डीसेल्फ म्हणूया हव तर)... परंतु एकूणच त्याच्या वागण्यामुळे घरातले वातावरण बिघडून गेल होत. त्याच्या व्यक्तिमत्त्वाची रिग्रेशनला सुरुवात झालेली होती. अतिमद्यपानामुळे दिवस–रात्र हे भान त्याचं निघून गेल होतं. तो कधीही उठायचा, कधीही प्यायचा, कधीही लिहिल, कधीही झोपेल. मूड आला तर कधीही कोणाला फोन करेल नी गप्पा मारेल. रात्री तासतास गुलामअली ऐकत बसेल, त्यात आपण आपल्या घरातील इतराची झोपमोड करतोय हा विचार तो करायचा नाही... हे अती झाल की प्रेरणा चिडायची. मग तो कधी कधी आपला इतरांना त्रास होऊ नये या हेतूने वरती terrace वरती तासतास येरझारा घालत विचार करत फिरायचा.

तो विचार भरपूर करायचा. mystic विचार ऐकवले की तो खूष असायचा. त्याच वैज्ञानिक अथवा Parapsychological views

वरील वाचन नव्हत. परंतु तो श्री. लक्ष्मण लोंढ सारख्या मित्रांशी अशा विषयांवर गप्पातून माहिती मिळवत असे. भव्यदिव्य कल्पना-विलासाचे त्याला मनोमन फार आकर्षण असायच. अशा विचाराच्या तंद्रीत असला म्हणजे तो वागताना बराच नम्र असायचा. परतु ही उच्च विचाराची तद्री फार काळ टिकायची नाही.

तो नॉर्मल प्लेनवर आला की त्याचा अहंपणा पुनः जागृत व्हायचा. बरेचदा पेपरातली एखादी बातमी वाचून त्याचा mood off व्हायचा. विशेषतः समाजवादी आणि साम्यवादी नेत्यावर तो चिडून असायचा. पण चिडून त्याने कधी लेखणी हातात घेतली नाही. तो नुसता घरातल्या घगत चरफडत शिवीगाळ करायचा. मात्र इंदिरा गाधीवर तो बेहद्द खूष असायचा. बाईंच्या प्रत्येक गोष्टीच तो समर्थन करायचा, कोणी कॉंग्रेसवालाही करणार नाही इतक ! तो त्याच्या भाषणातून गमतीने एक गोष्ट म्हणायचा !

'आपल्या देशाच दुर्दैव हे की बाईंच नेतृत्व आमच्याला फार उशीरा मिळाल. स्वातंत्र्यापूर्वीच जर आपण इंदिराजींचं नेतृत्व स्वीकारलं असतं तर ब्रिटिश भारताची फाळणी करू शकले नसते. उलट बाईने उपस्थित केलेल्या एखाद्या मुद्द्यावरुन इंग्लंडची मात्र फाळणी झाली असती.'

या मुद्द्यावर श्रोत्याची दादही त्याला चागली मिळायची.

अनिल सर्व प्रकारच्या ऑडियन्सपुढे भाषण करू शकायचा. एखादं साहित्य मडळ, कॉलेजच गॅदरिंग, निवडणूक सभा किंवा शेतकरी सघटनेचा कार्यक्रम. तो आपल्या समोरील श्रोत्याना पकडून ठेवेल अस भाषण करायचा. त्याला भाषणासाठी बऱ्याच ठिकाणाहून निमंत्रणे यायची. भाषणानंतर मद्यपानही ओघाने आलेच. पण पुढे पुढे जसजसे मद्यपान वाढू लागले तसतसे तो भाषण कमी वेळ द्यायचा. पण मद्यपान अधिक वेळ करायचा.

अनिल मद्यपान का करायचा ?

त्याचा प्रॉब्लेम काय ?

यावर बरेचजण बरेच अंदाज बांधू शकतात. पण त्यातल्या कोणत्याही अदाजाला 'उत्तर' ही संज्ञा लागू होणार नाही. माझ्या मते याचं उत्तर फक्त त्याच्या Genetic Configuration मध्ये सापडू शकेल.

कोणी योगी होणार की भोगी ? हे ठरविण्याचा अधिकार समाजाला नाही. कारण जीन्सनी ते जन्मापूर्वीच ठरविलेलं असतं. फक्त त्याच्या योगीपणाची किंवा भोगीपणाची पातळी समाजात ठरते

अनिलच्या बाबतीत प्रतिभा आणि अतिरेकी मनस्वी स्वभाव या दोन गोष्टी त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या अविभाज्य घटक आहेत. या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत त्यामुळेच तो एक लेखक झाला आणि अती मद्यपानात वहात गेला.

अनिलच्या प्रॉब्लेमला आपण उत्तर देऊ शकत नाही. आपण फार तर त्याचा प्रॉब्लेम समजून घेऊ शकतो.

हा ! एक मात्र आहे. लेखक म्हणून मान्यता मिळालेल्या दादरच्या फ्लॅटमधल्या अनिलपेक्षा मान्यवर लेखक होण्याचा प्रयत्न करणारा, जेकब सर्कलमध्ये राहणारा अनिल हा अधिक अॅक्सेप्टेबल वाटतो आणि हा असाच अॅक्सेप्टेबल वाटणाऱ्या अनिलला जेव्हा समाज अॅक्सेप्ट करतो तेव्हा तो एस्टॅब्लिश्ड होतो. एस्टॅब्लिश्ड झाला की त्याचा क्लास बदलतो. या सगळ्या ओघाओघाने होणाऱ्या गोष्टी आहेत. अनिलच्या बाबतीत या ओघाचा वेग मोठा होता इतकच ! त्यानी चांगलं लेखन लहान वयात केल. यशही लवकर मिळालं. व्यसनी प्रवृत्ती ही जीन्सची देणगी होतीच. पिणं वाढत गेलं. डॉक्टर्स, नातेवाईक, मित्र, सर्वांनी आपापल्या पद्धतीने 'दारू' ही कशी वाईट हे सागायचा प्रयत्न केला. अर्थात या सर्वांना अनिलने मूर्खात काढले ही गोष्ट वेगळी.

मे ८४ मध्ये पुनः एकदा हॉस्पिटलमध्ये रहावे लागले. मनातून अनिलला पटलं की आपलं काही तरी चुकतंय. पण स्वतःची चूक कबूल करणाऱ्यातला तो नव्हता. पुढे त्याने दारू सोडली पण मी ही दारू तात्पुरती सोडत आहे असं सागून (हो ! कायमची सोडतोय असं सांगितलं तर ते शहाणे ठरतील. तसं नको व्हायला, कारण बाकीचे सर्व मूर्ख आहेत). तब्येत हळूहळू सुधारली. डॉक्टरानी नियमित काही चालणे वा इतर कामे करा; परंतु झेपणार नाहीत असे कष्ट करू नका, अस स्पष्ट सांगितलेले होते...नोव्हेंबरमध्ये तब्येत चागली होती ..सिनेमाच्या लिखाणासाठी लोणावळ्याला गेला ..समोर लोहगड दिसला. किल्ल्याचं आकर्षण लहानपणापासून होतच. स्वत.बद्दल ओव्हर कॉन्फिडन्स ही काही नवी गोष्ट नव्हती. ...डॉक्टराचा सल्ला विसरून तो लोहगड चढला...चढून गेल्यावर धाप लागली...उतरला...टॅक्सीने पुण्याच्या घरी आला...दरम्यान ताप आला ..घरी आल्यावर सगळ्याना उत्साहात सागितलं. मी लोहगड चढून आलोय मला दारूडचा ठरविणाऱ्यापैकी कितीजण लोहगड चढतात ते मला पाहायचंय ..वगैरे. .पण ताप वाढत गेला. मुंबईला नेलं ..के इ. एम. मध्ये ठेवला. त्याच्या आजाराला take off point मिळाला होता...काही दिवस तो कोमात होता... प्रकृतीची चिन्हे काही ठीक दिसेनात...अनिलला स्वत.लाही आता आता काय होणार याची चाहूल लागली होतीच...शिरीषजवळ त्याने कधी नव्हे तो स्वतःहून सागितले, 'मी गेले बरेच दिवस उतमात केला हं' शिरीष म्हणाला, 'Forget it'...आता यातनं जर वाचलो तर दारू मी सध्या सोडलेली आहेच, आता यापुढे मी फक्त लिखाणावर कॉन्सन्ट्रेट करीन ! पण It was too late ! विधीचा लिखान अटल है रे भाई ! ६ डिसें. ८४ ला दुपारी ११–१५ वा. गेली ३६॥ वर्षे सतत चालू असलेली त्याच्या हृदयाची टिकटिक बद पडली. नाटकाचा abrupt end झाल्यासारखं !

बरचसं लिखाण अर्धवट लिहून झालेलं आहे एक नाटक अनिलने कॅसेटमध्ये आपल्या आवाजात रेकॉर्ड केलेल आहे तेही अपूर्णच आहे. सध्या तरी त्यातल्या कशाला पूर्णरूप यायची चिन्हे नाहीत !

अनिलचे शेवटचे पूर्ण नाटक 'मी मालक या देहाचा.' या नाटकाचा अनिलच्या जीवनाशी Philosophical level वर निश्चित काही सबध आहे !

शिल्पकार अभिजित डेथबेडवर आहे. तो खोदत असलेल्या आदिशक्तीचं शिल्प अपूर्ण आहे, याची त्याला खंत आहे.


रोझी एक कलासक्त मुलगी. तिला अभिजित आपल्या सेक्रेटरी-बरोबर ताजमहाल बघायला पाठवतो. ती ताजमहाल न पहाता आदिशक्तीच शिल्प पाहून येते !

आल्यावर अभिजित तिला विचारतो, अग तुला ते अर्धवट खोदलेल शिल्प पाहून काय मिळालं ?

रोझी म्हणते, खूप काही ! ताजमहाल पाहिला असता तर तो पाहून सरला असता. पण अर्धवट खोदलेलं शिल्प पाहिले आणि बघतच राहिले हे शिल्प कसे पूर्ण झाले असते हा विचार करता करता माझ्यातला कलावंत जागा झाला. दिवसभर पहात बसले. वेळ कसा गेला कळलंच नाही !

आता अनिललही जाऊन वर्ष झालंच की !

☐



म. सा. प. ची शारदीय व्याख्यानमाला

# वाङ्मयीन नियतकालिकांच्या कार्याची वेधक उजळणी

पांडुरंग गायकवाड

शुद्ध वाङ्मयीन स्वरूपाच्या नियतकालिकाची वाण आज मराठी साहित्यविश्वाला चागलीच भासत आहे. 'सत्यकथा' नतर 'अनुष्टुभ' 'अभिरुची' वगळता नाव घेण्याजोगे वाङ्मयीन नियतकालिक नाही. 'अनुष्टुभ' ही आता द्वैमासिक काढावे लागत आहे. 'सत्यकथा'च्या अस्तानंतर वाङ्मयीन नियतकालिकाचा प्रश्न व त्याचे गाभीर्य लक्षात आले. आणि या विषयाला चर्चेचे स्वरूप आले. त्यातच यंदाचे साहित्य समेलनाध्यक्ष शकर पाटील यांनी आपल्या नांदेड साहित्यसमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात वाङ्मयीन नियतकालिकांच्या आवश्यकतेचा उल्लेख केला.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र साहित्य परिषदेने काशिनाथ रघुनाथ आजगावकर उर्फ मित्र याच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित केलेल्या शारदीय व्याख्यानमालेसाठी 'वाङ्मयीन नियतकालिकांचे कार्य' हा विषय निवडून औचित्यपूर्ण प्रतिसाद दिला आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

या शारदीय व्याख्यानमालेमध्ये दिनांक १८ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबरपर्यंत माधवराव पटवर्धन सभागृहात दहा व्याख्याने झाली. त्याचे प्रास्ताविक करताना महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष श्री. राजेंद्र बनहट्टी यांनी वाङ्मयीन नियतकालिकांच्या विचाराला चालना मिळावी, काळाच्या पडद्याआड लुप्त झालेल्या वाङ्मयीन नियतकालिकाच्या मराठी वाङ्मयसृष्टीतील कार्याची उजळणी व्हावी या दृष्टीने हा विषय निवडला असल्याचे सांगितले.

## विविध ज्ञान विस्तार

व्याख्यानमालेचे पहिले पुष्प प्रसिद्ध समीक्षक श्री. गो. म. कुलकर्णी यानी 'विविध ज्ञान विस्तार' या नियतकालिकासबधी गुफले.

'विविध ज्ञान विस्तार' हे नियतकालिक १८६७ साली सुरू झाले. त्याचा पहिला अक जुलैला निघाला, त्याचे चालक व सपादक होते रा. घो. गुजीकर.

या नियतकालिकाचा जन्मही थोडासा अपघातीच म्हणावा लागेल. १९४८ साली एलफिन्स्टन कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी स्टुडटस् लिटररी अँड सायन्टिफिक असोसिएशन स्थापन केली. त्यात दर आठवड्याला नवज्ञानविषयक चर्चा होई. असोसिएशनच्या पहिल्या सभेचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी होते. त्यामध्ये न्या. रानडे, किर्तने ही मडळी होती. त्यानी सामान्य लोकाना उपयोगी असे 'मराठी ज्ञान प्रसारक' काढले. या लोकाशी गुजीकराचे सबध होते.

१८५७ साली मुबई विद्यापीठाची स्थापना झाली. पण १८६७ ला मुबई विद्यापिठात मराठी भाषा शिकविणे बद करण्याची घटना घडली. निषेधाची लाट उसळली. आणि तीव्र बोच, पोटतिडीक यातून विविध ज्ञान विस्तार या नियतकालिकाचा जन्म झाला. गुजीकर हे विष्णूशास्त्री चिपळूणकराच्या स्वदेशाभिमानाइतकेच स्वभाषाभिमानी होते. मात्र या काळात महाराष्ट्रातील विद्वान मडळी इग्रजी भाषेची समर्थक होती. त्यांच्या वर 'हे मोठ्या पगाराचे मजूर आहेत.' अशी टीका गुजीकर करीत.

या नियतकालिकाचा पहिला अंक 'विद्यालय' या नावाने निघाला. आता सरकारने मराठी शिकवणे बद केले तर आता तेच मराठीचे विद्यापीठ असा अर्थ होता आणि यासाठी अशी अनेक मराठी नियतकालिके हवीत असा गुजीकराचा दृष्टिकोन होता.

गुजीकरानी जुलै १८६७ च्या पहिल्या अकात उद्देश सांगताना तीन शब्द टाकले होते. सत्कालक्षेपार्थ म्हणजे गप्पाटप्पाऐवजी चांगल्या ज्ञानासाठी, रजनासाठी काळ घालविण्याचे एक 'साधन; विश्रातीस्तव आणि कल्याणार्थ म्हणजे उपयुक्त ज्ञान देणारे माध्यम. त्या काळी ज्ञानाने माणसे चागली बनतात. वाङ्मय म्हणजे सदुपदेश करणारे कथात्मक लेखन होय असा दृष्टिकोन होता. गुजीकराचा महिलांचा वेळ सदुपयोगी दृष्टीने व्हावा याबद्दल कळवला होता. त्यातून व्यावहारिक मद्यात्मक भाषा यायला हवी. असा गुजीकराचा आग्रह होता.

## नामवंत लेखक

'विविध ज्ञान विस्तार' या नावातच बरेच काही समजणारे आहे विविध प्रकारचे ज्ञान समाजाला देणारे असे नियतकालिक. त्यावेळी-दर्पण, ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, इद्रप्रकाश अशी नावे होती. या काळापासूनच 'ज्ञानाने मुक्ती' हा पारंपारिक अर्थ बदलला. गेला. ज्ञान हे भौतिक प्रगतीचे एक साधन आहे. ते सामर्थ्यवान आहे, असा नवा दृष्टिकोन देण्यात या नियतकालिकाचा महत्त्वाचा वाटा आहे,

मात्र काळानुसार विविध ज्ञानविस्तार

महाराष्ट्र साहित्य परिषदेची शारदीय व्याख्यानमाला १८ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर असे दहा दिवस पार पडली. या वर्षीच्या व्याख्यानमालेचा विषय होता 'वाङ्मयीन नियतकालिकांचे कार्य'. विविध ज्ञान विस्तार, काव्यरत्नावली, करमणूक, मनोरंजन, रंगभूमी, रत्नाकर, यशवंत, प्रतिभा, सत्यकथा आणि अभिरूची या दहा नियतकालिकांनी मराठी वाङ्मयीन क्षेत्रात कोणती कामगिरी केली त्याचा या व्याख्यानमालेत विस्तृत आढावा नामवंत व्यक्तीं-कडून घेतला गेला.

या व्याख्यानमालेतील पहिल्या पाच व्याख्यानांचा वृत्तांत येथे दिला आहे. पुढील अंकात उरलेल्या पाच व्याख्यानांचा वृत्तांत प्रसिद्ध होईल.

---

मध्येही बदल होत गेलेला स्पष्ट दिसतो. सुमारे ७० वर्षे (१८६७ ते १९३७) चाल-लेले हे एकमेव मराठी नियतकालिक आहे. त्याला अपवाद फक्त 'पुणे पाठशाळा पत्रक' हे आहे. ते विविध ज्ञान विस्तारच्या अगोदर-पासून निघत होते व त्यानंतरही ते चालू होते. मात्र एकंदर विविध ज्ञानविस्तारची फक्त ६८ वर्षे नोंद सापडते. मध्ये दोन वर्षे खंड पडला असावा.

गुंजीकरानी ७ वर्षे संपादन पाहिले परंतु आपले नाव त्यानी संपादक म्हणून कधीच टाकले नाही. तर प्रकाशक म्हणून टाकले. हाच कित्ता इतर संपादकानी गिरवला. त्यामध्ये वामन दाजी ओक, 'काव्येतिहास-संग्रहां'चे संपादक जनार्दन पंडित यांसारख्या मंडळींचा समावेश होता.

त्याकाळी विविध ज्ञान विस्तारमध्ये लेखन येणे फार प्रतिष्ठेचे मानले जाई. या नियतकालिकातून अनेक नामवंत लेखकाचे लेखन प्रसिद्ध झाले. १९१३ ते १९२५ ही बारा वर्षे महाराष्ट्र साहित्य पत्रिका विविध ज्ञान विस्तारचा एक भाग किंवा पुरवणी म्हणून जोडून येई १९२८ पासून महाराष्ट्र साहित्य पत्रिका वेगळी काढण्यास सुरुवात केली. विविध ज्ञान विस्तारने एक वाङ्मयीन कार्य या दृष्टीने भूमिका पार पाडल्याचे आढळते.

या नियतकालिकाचा लेखकवर्गही नवा व वेगळा विचार देणारा होता न्या. रानडेंचे सहकारी नीळकंठ जनार्दन किर्तने याची 'मराठा इतिहास' लेखमाला, श्रीपाद कृष्ण कोल्हटकराच्या 'सुदाम्याचे पोहे'मधील पहिले १२ लेख व 'मूकनायक' हे नाटक, न. चिं. केळकरांचे 'सुभाषित व विनोद', वा. म. जोशींनी माधव ज्युलियनांच्या छंदाचे केलेले विश्लेषण, हरिभाऊ आपटे इत्यादींचे लेखन प्रसिद्ध झाले.

ठगाची जबानी, मोचनगड ही गुंजीकराची कादंबरी, अमात्याची आज्ञापत्रे, धौम–महाबळेश्वरचे प्रवासवर्णन, वासुदेव कानिटकराची 'समूह लहरी' व 'कृष्णकुमारी' ही खंडकाव्ये, न. र. फाटकाचे रामदासावरील लेख, सदाशिव खंडो आळतेकराचे रामदासाची करुणाष्टके आदि साहित्य प्रकाशित झाले. त्याचप्रमाणे मोरोपंताच्या कवितेवरील वाद, विष्णूशास्त्री चिपळूणकरांचा कल मुक्तेश्वराकडे कसा जास्त आहे यासारखे वादही विविध ज्ञान विस्तारमधून प्रसिद्ध झाले.

वासुदेव गोविंद आपटे, पांडुरंग काणे, वि. रा. शिंदे, चिंतामणी वैद्य, वासुदेवशास्त्री अभ्यंकर इत्यादींचे लेखन प्रसिद्ध झाले. काशीबाई कानिटकर याचेही अधूनमधून लेखन प्रसिद्ध झाले. 'विविध ज्ञान विस्तार'मधून बंगाली व कन्नड भाषा, संस्कृत नाटकांचाही परिचय करून दिला जात असे.

## काव्यरत्नावली

व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफले शकुंतला आठवले यानी. 'काव्यरत्नावली' या काव्य-विषयक दबदबा निर्माण करणाऱ्या नियत-कालिकाची माहिती त्यांनी सांगितली. ती अशी :

'काव्यरत्नावली' हे नियतकलिक आधुनिक, समकालीन काव्याचो छपाई आणि काव्याला सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या उद्देशाने नारायण नरसिंह उर्फ नानासाहेब फडणीस यांनी सुरू केले. याचा पहिला अंक जून १८८७ मध्ये निघाला.

फडणीसानी शिळा प्रेसची कला शिकून प्रेस टाकली. 'प्रबोधचंद्रिका' नावाचे साप्ताहिक काढले. त्यातून खानदेशातील मुले पुण्या–मुबईला पाठवा, त्याना शिक्षण द्या...असा प्रचार ते करीत.

१८८७ मध्ये त्यानी मराठी काव्याला वाहिलेले असे नियतकालिक काढण्याचा विचार मांडला. मित्रांनी होकार भरला आणि त्याकाळच्या जळगावमधून पुण्या-मुंबईची नियतकालिक जन्मस्थानाची मक्ते-दारी मोडून 'काव्यरत्नावली'चा जन्म झाला. याची जाहिरात प्रथम 'विविध ज्ञान विस्तार'मधून झाली.

नियतकालिकासाठी एक काव्य परीक्षण मंडळ नेमले त्यात वामन दाजी ओक, वासुदेवशास्त्री खरे, विनायक, कानिटकर ही मंडळी होती अशा नाणावलेल्या मंडळी-कडे लोक कविता पाठवीत. ही मंडळी पुण्या–मुंबईला राहूनही परीक्षणाचे काम करीत असत. नानासाहेब फडणीसाचे शिक्षक के. स. रिसबूडही यात लेखन करीत.

खरे पाहता तो काळ काव्याला प्रतिकूल होता. पण त्यातही काव्यरत्नावलीने आपले वाचकाची अभिरूची वाढवण्याचे काम सुरूच ठेवले होते त्या वेळी 'काव्यातून आविष्कार' असा दृष्टिकोन मानणारे कवी

होते फडणीस स्वत: मितभाषी होते. ते 'चित्रोक्तीवक्ता' या टोपण नावाने लेखन करीत. त्यांनी आपले नाव प्रकाशक म्हणूनच नियतकालिकावर टाकले मात्र ते त्या काळचा ५०० रु. वार्षिक तोटा सहन करून नियतकालिक चालवीत ते प्रेसच्या जोरावरच चाले. त्यामुळे मानधन ते कोणालाही देऊ शकले नाहीत.

त्यांनी काव्येतिहासासाठी उपयुक्त म्हणून कवीची जीवनचरित्रे मागवली. चौदा कवींची आत्मवृत्ते व त्रेचाळीस कवींची जीवनचरित्रे काव्यरत्नावलीतून प्रसिद्ध झाली. यातून रेव्हरंड टिळकांनी कविसंमेलनाची कल्पना मांडली व पहिले कविसमेलन १९०७ साली संपन्न झाले. याच समेलनात त्र्यंबक बापूजी ठोंबरे याना 'बालकवी' हे नाव मिळाले.

काव्यरत्नावलीने आपली कारकीर्द एक संपादकीय राखली तिने एकूण १०,०५४ पृष्ठे काव्य दिले. ६५० पानाचे गद्य व ६५० कवीचे काव्य प्रसिद्ध केले. अर्थात कवितेचे मूल्यमापन वाचकानीच करावे असा फडणीसाचा हेतू असे. त्यामुळे दर्जेदार काव्यावरोबर सामान्य दर्जाचे काव्यही यातून प्रसिद्ध झाले.

'काव्यरत्नावली' ९ व्या व १० व्या वर्षी डळमळली. पुन्हा उभी राहिली. २८ वर्षानंतर ३॥ वर्षे स्थगित राहिली व वयाच्या ४२ व्या वर्षी अस्तंगत झाली. ऑक्टोबर १९३७ ला बद झाली.

काव्यरत्नावलीतून के. स. रिसबूडाचे 'भामिनी विलास' या सस्कृत काव्याचे भाषांतर, तसेच भाडारे, मणी यानी इंग्रजीची देखणी भाषातरे दिली. जागा उरली तर कविता असा दृष्टिकोन त्याकाळी होता. तर पाश्चात्य राष्ट्रात कवी हा उदात्त, मार्गदर्शक असा विचार मांडला जात होता. या पार्श्वभूमीवर कानिटकरांसारख्या स्वतंत्र कविता करणाऱ्याचा एक गट होता. रत्नावली सुरू झाल्यानतर तीन वर्षांनतर केशवसुतांनी रत्नावलीला कविता दिल्या. तर रत्नावलीच्या ९ व्या वर्षानंतर तांबे, बालकवी, रेंदाळकर, टिळक यांचा फौजफाटा आला. काव्यरत्नावलीच्या आयुष्यातील हा वसंत काल. ताम्बाची 'विधवेचं स्वप्न' ही पहिली कविता प्रसिद्ध झाली. ही स्वच्छंदवादी, आत्मपूजन करणारी कविता अवतरली. यात भाषा मात्र सामान्य जनाची होती. केशवसुत 'स्फूर्ती' लिहू लागले. विनायकाचे 'प्रेमालेख' ही पत्रोपत्री कविता प्रसिद्ध झाली. हे एक कथाकाव्य होते. तसेच वासुदेवशास्त्री खरे याचे पहिले कथाकाव्यही यातून प्रसिद्ध झाले. पुढे ऐतिहासिक खडकाव्येही आली. श्री. ना. मुजुमदार उर्फ कवी नारायणसुत याचे विदग्ध महाकाव्य ठरावे असे खडकाव्य 'सुभद्राविवाह काव्य' या नावाने प्रसिद्ध झाले. त्याचे लिखाण अतिशय नेटके असे. तर मायकेल मधूसूदन यांच्या 'मेघनादवध' या बगाली काव्याचे माधवानुजांनी केलेले भाषातरही रत्नावलीतून प्रसिद्ध झाले.

## कवितेचा नवा प्रवाह

यातून रेंदाळकराचे 'मोहिनी' हे खंडकाव्य, पा. गो. शास्त्रीचे अलकारशास्त्राचे वर्णन, देसाईंचे योगवसिष्ठांचे भाषातर तसेच केशवसुताच्या मृत्यूनतर अगोदरच प्रसिद्ध झालेले 'निवडक केशवसुत' पुन्हा छापले. पुढे गोविंदाग्रजांचे समाजाला फटकारे मारणारे 'स्मशानातील गाणे' प्रसिद्ध झाले.

रत्नावलीचा १९३१ ते १९३५ हा काळ अखेरचा. बालकवी, गोविंदाग्रज, रेंदाळकर, लोढे, कानिटकर ही पिढी गेली नतर कवी सुमत यानी १०१ कविताची मालिका दिली. ताम्बांचे 'महाप्रस्थान' या १५ कविताचे प्रकाशन व माधव ज्युलियन याच्या कविताचा काही काळ आधार मिळाला. रविकिरण मडळाप्रमाणे अनेक काव्यमंडळे होती. कवी आपल्या काव्यमंडळाचे नाव लिहून कविता करीत. पुण्या–मुंबईच्या मासिकाकडे बोरकर, काणेकर, कात, गोविंद, सावरकर वळले. मात्र काव्यरत्नावलीकडे ते वळले नाहीत.

काव्यरत्नावलीने काव्यक्षेत्रात एक नवा प्रवाह निर्माण केला. काव्यभक्ती व कवित्वाचा अभिमान हा स्वच्छदवादाचा विशेष. तर अभिजातवाद (स्वत: फडणीसाचा) आणि स्वच्छदवाद असे दोन्ही प्रवाह एकत्र येत. त्यावर सामाजिक जाणिवाचा प्रभाव असे. रत्नावलीने पोवाडे, लावण्या, गाणी इत्यादी सर्व काव्यप्रकार दिले. सोज्वळ, उदात्त आणि उच्च काव्य दिले. जीवननिष्ठ जीवनसापेक्ष काव्य दिले. त्यावरोबर मध्यम दर्जाचेही काव्य दिले. वर्डस्वर्थ, टनिसन याचा परिणाम म्हणून धार्मिक काव्यही दिले.

काव्यरत्नावलीतील सुमारे १/३ कवींनी टोपणनावे घेतली होती.

फडणीसानी भीष्माचार्यांचे व्रत घेऊन जुन्या वळणाने राहूनही नव्या कवींना प्रोत्साहन दिले.

## करमणूक

तिसरे पुष्प डॉ. भालचंद्र फडके यांनी हरिभाऊ आपटयाच्या 'करमणूक' वर गुफले

'करमणूक' ची सुरुवात १९८० साली झाली. त्या अगोदर कानिटकर दापत्याचे 'मनोरंजन' होते. त्यात 'प्रेक्षक' या टोपण नावाने कथा, टीका इत्यादी लेखन हरिभाऊ करीतच होते. पुढे निबधचद्रिका आणि मनोरंजन एक झाले. त्यातही हरिभाऊनी लेखन केले. रानडे, गोखले, चिपळूणकर, टिळक याचा परिणाम दाखवणारी १९ व्या शतकाची ती अखेर होती. त्या काळात सामाजिक व राजकीय प्रबोधनाचे सूत्र नियतकालिकांनी स्वीकारलेले होते.

या पार्श्वभूमीवर हरिभाऊनी 'करमणूक' चा नमुना अक काढला. त्यामध्ये 'मनोरंजनाबरोबर ज्ञान' हे उद्दिष्ट माडले कारण मनोरजनातून ज्ञान प्रभावीपणे पोहोचते. 'केसरी–सुधारक हे जागृतीचे जसे काम करताहेत तसे 'करमणूक' ही मातेच्या वात्सल्याने करेल?' असा स्पष्ट उद्देश नमुना अकाच्या सपादकीयात दिला आहे.

वाङ्मयीन साप्ताहिकाचा दृष्टिकोन ठेवून हरिभाऊनी कथा, कादबरीवर विशेष भर दिला आणि या वाङमय प्रकाराची पायाभरणी केली. स्फुट गोष्ट, क्रमश: कादबरी असे प्रयोग त्यानी केले. वाचक गोष्ट हप्त्याहप्त्याने वाचत. 'करमणूक' ने वसत, दिवाळी असे खास अक काढण्याचे उपक्रम केले. चित्र, डायऱ्या वर्गणीदाराना वाटल्या.

## पहिली लघुकथा स्पर्धा

करमणूक १८९० ते १९९५ व १८९५ ते १९०५ या काळात बहरलेली होती. नंतर १९१३ ते १११७ पर्यंत उतरती कळा लागली. अनेक कंपन्यांची मदत घेऊन हे

नियतकालिक चालविले. कर्जाचा बोजा उत्त-लावा लागला. प्रथमतः हरिभाऊना संपादक म्हणून ३० रु. व नतर ५० रु. पगार मिळे. त्यानी सेवाव्रताने हे कार्य केले.

'करमणुकी' चे कार्य म्हणजे सुख-दु खाच्या चार गोष्टी सांगणे असे हरिभाऊनी लिहिले. त्यानी अखेर कौटुंबिक भावनाचे चित्रण केले परपरागत कौटुंबिक वातावरण त्याना पसंत नव्हते त्यातील अहंकार, किडके-पण, स्त्रीचा स्त्रीने केलेला छळ असे विषय त्यानी सवेदन कुशलतेने हाताळले. असा तत्कालीन सामाजिक इतिहासच करमणूकने दिला. प्लेग, दुष्काळ याचीही तिने दखल घेतली. तत्कालीन मध्यमवर्गीय जीवन, राजकीय ताणतणाव इत्यादी तपशील करमणुकीत सापडतात.

कथेच्या आजच्या अवस्थेची पायाभरणी स्फुट गोष्टीने केली. योगायोग, आनदपर्य-वसानी अखेर ही कथारचनेची आजची परं-परा तेव्हापासून चालत आली. सपूर्ण जीव-नाच्या प्रवाहाचे वर्णन कथेत करता येत नसे, कोठेतरी अखेर करावीच लागते. वाचकाचे कुतुहल पूर्ण होईपर्यंत कथा लिहावी लागते. अद्भूत रम्य घटनाकडून पुढे कथा वास्तवा-कडे वळविण्याचे कार्य हरिभाऊनी केले. करमणूकने मराठी कथा लोकप्रिय केली विकासाकडे नेली. कथेतील निवेदन व सवाद याच्या प्रमाणाबाबत वेगवेगळे प्रयोग हरि-भाऊनी केले.

तसेच कादबरीही लोकप्रिय करण्याचा मान करमणूकचाच आहे. १८९५ नतर हरिभाऊ ऐतिहासिक कथा व कादंबऱ्याकडे वळले. त्या त्यानी लोकप्रिय केल्या.

आणखी एक महत्त्वाचा विशेष म्हणजे 'करमणूक' ने पहिली लघुकथा स्पर्धा, जाहीर केली. पुढे ही जाणीव विकसित होत गेली. अखेर किंवा पूर्ण न झालेलीही गोष्ट ठरू शकते या स्थितीपर्यंतचा पाया करमणूकने घातला. पुढे १९११ मध्ये दुसरी लघुकथा स्पर्धा घेतली व त्यात वेगवेगळ्या दृष्टीच्या कथाना पारितोषिके दिली. यात 'मोत्याचा हार' या रोमँटिक कथेला, पहिल्या कथा-स्पर्धेत, 'पांडुरंगा तुझी इच्छा' या कथेला दुसऱ्या तर तिसऱ्या स्पर्धेत एका भुताटकीच्या कथेला पारितोषिक मिळाले. यात एका विज्ञान कथेलाही बक्षिस मिळाले.

स्त्रीची परिवशता बाहेर यावी यासाठी महिलाची वेगळी कथास्पर्धा घेतली. कथेची क्षेत्रे वाढविण्याच्या कामी करमणुकीचा बराचसा वाटा आहे.

मात्र डॉ. फडके हरिभाऊच्या कथा-कादं-बऱ्यांमधील पात्रे, त्यांचे स्वभाव, ताणतणाव यावर बराच भर देत होते. अगदी कथा-कादबरी रसग्रहण वाटण्याइतपत.

## मनोरंजन

चौथे पुष्प ज्याच्या स्मृतिदिनानिमित्त ही शास्त्रीय व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली त्या का.र.मित्र याच्या 'मनोरजन' वर प्रा. म. न. अदवत यानी गुफले.

१८९० अगोदर कानिटकर दापत्याचे 'मनोरजन' होते. त्यात हरिभाऊनी लेखन केले होते; परंतु काशिनाथ रघुनाथ मित्रानी १८९५ ला काढलेल्या 'मनोरजनात' हरि-भाऊनी नाव पसत नसल्यामुळे लेखन दिले नाही.

मित्रानी वर्षाला आठ अक असे धोरण ठेवले होते. पहिल्या अकात बगाली कथा व कादबरीचा अनुवाद प्रसिद्ध केला. पहिल्या १-२ वर्षाच्या विकट परिस्थितीनंतर मनो-रंजनचे गठ्ठे घेऊन गावोगाव फिरत व वर्गणीदार गोळा करीत असत.

लोकप्रियतेनतर पुढे निव्वळ गोष्टी न देता प्रबोधनाचे धोरण ठेवले गेले. कादबरी-बरोबर रजन-प्रधानता तसेच राजकीय, सामाजिक लेखही प्रसिद्ध होऊ लागले. सर्व-सामान्य लोकांना आकलन व्हावे यासाठी सोपी भाषा वापरली. महिलाबाबत मित्रांच्या व्यक्तिमत्वानुरूप उदात्त दृष्टिकोन राखला गेला. १९१८ पर्यंत अशा प्रकारचे अक निघाले. त्यानतर मात्र वेगवेगळ्या विषया-वर लिखाण प्रसिद्ध होऊ लागले. त्यात काव्य, चरित्रे, चुटके याचा समावेश होऊ लागला. तर १९३० नंतर जागतिक राजकारण-सामाजिक दृष्टिकोन, जपानबाबत लेख प्रसिद्ध झाले.

मनोरजनने १९०९ साली मराठीतील पहिला दिवाळी अंक काढला. या अकात महिलाबद्दल लेख, वि सि. गुर्जरांचे प्रहसन तसेच व्यक्तिगत लेख इ. याचा समावेश होता दुसरा दिवाळी अंक १९१० साली काढण्यात आला.

मनोरजनने या काळात खास अकाची प्रथा सुरू केली. १९१८ साली त्यानी ३५० पृष्ठाचा खास अक काढला होता. तसेच व्यक्तिपर अक काढण्याची प्रथाही मनो-रजनाचीच. १९१६ साली आगरकर विशे-षाक हा आगरकराच्या पुण्यतिथीनिमित्ताने काढला. १९१८ मध्ये कर्वे विशेषाक काढला. या कर्वे विशेषाकातील जाहिरातीचे पैसे महर्षि कर्वे याच्याकडे जमा केले जात. पुढे १९१९ मध्ये हरिभाऊ आपटे विशेषाक काढून हरिभाऊंचे कर्तृत्व, वाङ्मयाचा विकास याबद्दल माहिती देण्यात आली.

अशाप्रकारे सर्वांगीण स्वरुप देणारे मनो-रंजन १९२० पर्यंत का. र. मित्राच्या व्यक्तिमत्त्वाने भारलेले होते. २० जून १९२० ला मित्राचा अंत झाला. तेथून फेब्रुवारी १९३५ ला 'मनोरंजन' अचानक बंद झाले. मित्राच्या अतानतरही १५ वर्षे मनोरजनने तोच दर्जा राखून ठेवला होता.

## मराठी कथेची सुरुवात

मनोरंजनाचे 'सचित्र मासिक' हे स्वरुप विशेष वाटणारे होते अकाचा चालू कादवरी, संपूर्ण गोष्ट, प्रवास वर्णन, स्थलवर्णन, दोन ते तीन कविता, प्रासगिक विषयामध्ये ताज्या घडामोडीवरील भाष्य, बोधकथा, नाटक, एकाकिका, विनोदी कथा असा ठरीव साचा असे. मित्रानी 'महाराष्ट्र महिला' हे महिलांसाठी स्वतःच्या पत्नीच्या नावाने मासिक काढले होते. ते जेमतेम २ वर्षेच टिकले.

मनोरंजनने मराठी कथेला नवे स्थान मिळवून दिले. कथेला वेगळे वळण दिले. मात्र कथेची सुरुवात स्फुट गोष्टीच्या पावला-वर पाऊल टाकूनच झाली. त्यातही मित्राच्या कथा नवे वळण घेणाऱ्या होत्या. मानसिक विश्लेषणात्मक कथेचाही समावेश त्यात आहे. या कथेला वा. ल. कुळकर्णींनी 'लघुकथेची अग्रदूती' म्हणून गौरविलेले आहे.

मनोरंजनने विषय विविधता, पुष्कळ चित्रे असे उपक्रम केले.

१९१० नतर काही स्त्रिया अनुवादित कथा देऊ लागल्या. काशिबाई कानिटकर वगळता सर्व स्त्रियांनी टोपणनावे घेतली होती.

मनोरंजनने प्रवासवर्णनेही दिली. सुमारे १५० प्रवासवर्णने मनोरंजनमधून प्रसिद्ध झाली. हा वाङ्मयातील एक टप्पाच आहे. मनोरंजनने लालित्याबरोबर सामाजिक जाणिवही जोपासली.

मराठी कथेची सुरुवात करमणुकने केली. हरिभाऊंची स्फुटगोष्ट पुढे 'मनोरंजन'मध्ये संपूर्ण गोष्ट बनली. मराठी कथेच्या विकासाचा दुसरा टप्पा मनोरंजन होय. श्रीपादकृष्ण कोल्हटकर, वि. सि. गुर्जर यांचा १९२० नंतरचा काळ. गुर्जरांच्यावर प्रभातकुमार मुखर्जींचा फार मोठा परिणाम होता. या बंगाली लेखकाचे रहस्य–तणाव–कलाटणी हे तंत्र गुर्जरांनी वापरून मराठी कथेला वेगळे वळण दिले. उपदेश, बोध हा स्फुट गोष्टीचा उद्देश जाऊन ती संपूर्ण गोष्ट बनली. कृ. के. गोखलेंच्या रंजनकथाही याच टप्प्यातल्या होत. गुर्जरांनी जशी कथेची बाजू पेलली तशी काव्याची बाजू रेंदाळकरांनी सांभाळली. रेंदाळकरांनी ऐतिहासिक कथाही लिहिल्या.

पुढे दिवाकर कृष्णांच्या कथांनी कथेला आणखी उंची दिली. त्याही याच काळात 'मनोरंजन'मध्ये आल्या. गुर्जर रहस्य, घटना यांवर अवलंबून राहात. पण दिवाकर कथेत मनाचा वेध घेत, भावनांना हात घालीत. हे एक नवे वळण होते. दिवाकरांनी 'मनोरंजन'मधून मराठी कथेला अंतर्मुख केले. मात्र पुढे ही कथा चालू राहिली नाही.

नंतर वेगवेगळ्या कथालेखिका मनोरंजनसाठी पुढे आल्या. त्यातून स्त्रीजिवनाची व्यथा पुढे आली. त्यामुळे मराठी कथेच्या विकासात 'मनोरंजन'चा टप्पा महत्त्वाचा मानला जातो.

'मनोरंजन'ने ४० वर्षात सुमारे ८७० कथा दिल्या. तसेच काव्यालाही स्वतंत्र स्थान दिले. जुन्या व नव्या अशा कवींना सामावून घेतले. अगदी केशवसुतांपासून ते कवी अनिलांपर्यंतच्या कविंनी त्यात हजेरी लावली आहे. 'बी' कवींची 'चाका' कविता मनोरंजनमध्ये आलेली आहे. तर लक्ष्मीबाई, रेव्हरंड टिळक, विनायक इत्यादी अनेक महत्वाच्या कवींच्या उत्कृष्ट कविता मनोरंजनमधून प्रसिद्ध झाल्य.

वामन मल्हारांची 'रागिणी' कादंबरी आणि आळतेकरांच्या 'मुक्तबंध' आणि 'शांताराम' या कादंबऱ्या मनोरंजनमधून प्रसिद्ध झाल्या. कादंबरी क्षेत्रात एक नवा बदल घडवून जागृत, सुधारणावादी स्त्रीचे दर्शन देणाऱ्या या सुधारक दृष्टीच्या कादंबऱ्या आहेत. रा. ग. गडकरींची, आणि रॉय किणीकराची एकांकिका यातूनच प्रसिद्ध झाल्या.

मनोरंजनने विनोदी लेखनाबाबत एक दृष्टी दिली. किमान एक तरी विनोदी कथा, चुटका दर अंकात असायला हवा असे धोरण मनोरंजनने आखले होते. असाच दृष्टीकोन नाटकांबाबतही ठेवला होता. विनोदी लेखनामध्ये का. न. पटवर्धन, श्रीपादकृष्ण कोल्हटकर, रा. ग. गडकरी यांचे प्रामुख्याने लेखन आले.

मनोरंजनमधून दिवाकरांच्या नाट्यछटाही प्रसिद्ध झाल्या.

## अभिरुची

पाचवे पुष्प श्री. ग. ना. जोगळेकर यांनी 'अभिरुची' या नियतकालिकाबद्दल गुंफले.

पुरुषोत्तम आत्माराम चित्रे व त्यांच्या पत्नी या दोघांनी 'अभिरुचि' हे वाङ्मयीन

डार्विनचे वेगळेपण हे की त्याने माणसाला 'माणूस' केले. मनुष्यात 'ईश्वरी' अंश आहे, तसेच कोणा एकाच्या पापामुळे मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, या दोन्ही धार्मिक असत्यांच्या मगरमिठीतून त्याने माणूस मुक्त केला.

पण भारतीय समाजाला ही मगरमिठी अजून पूर्ण सोडवता आलेली नाही. माणसातील जाती-पोटजाती थेट परमेश्वराने निर्माण केल्या आहेत अशी आपली श्रद्धा आहे.

म्हणूनच डार्विन चरित्राचा अभ्यास आज उपयुक्त ठरेल.

**चार्ल्स डार्विन**

**व्यक्ती, क्रांती आणि उत्क्रांती**

**लेखक : भा. रा. बापट**

डेमी आकार, पृष्ठे : १८२
भरपूर आकृत्या व साधार
विवेचनासह प्रकाशित झालेली
पहिली आवृत्ती.

**किंमत : रुपये बत्तीस**

शाळा कॉलेजच्या ग्रंथपालांनी
त्वरित मागणी करावी.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ३०.

स्वरूपाचे धोरण ठेवून १९४१ मध्ये नियतकालीक काढले. या काळात वाङ्मयशोभा, सत्यकथा, हंस ही नियतकालिकेही होतीच; पण तरीही अभिरुचीने अनेक नव्या आणि वेगळ्या क्षेत्रातील लोकांना लिहितं केले.

ना. गो. कालेलकर हे फ्रेंच व स्पॅनिशचे भाषांतर करीत, दा. बा. आठवले हे संस्कृत पंडित...असे बडोद्याचे मित्र-लेखक वर्ग यांच्या आधाराने 'अभिरूची'ने वाटचाल सुरू केली. अभिरूची'ने जाहिराती न स्वीकारण्याचे धोरण अवलंबिलेले होते. वर्गणीदार-वाचक हेच मुख्य आधार मानलेले होते.

इरावती कर्वे या 'क' या टोपणनावाने अभिरुचीत लिहित. त्यांच्यासारख्या अनेक समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ व्यक्तींना लिहिते करण्याचा मान अभिरुचीला आहे. कदाचित हे लोक मराठीकडे वळलेही नसते.

'अभिरुची'ने आजच्या अनेक मान्यवर लेखक कवींना घडवलेले आहे. त्यांचे पहिले-वहिले लेखन त्यात प्रसिद्ध झाले आहे.

पु. ल. देशपांडे हे मराठी साहित्याला 'अभिरुची'ने दिले. अभिरुचीच्या पहिल्या अंकात पु. लं. चं पहिलं लेखन प्रसिद्ध झाले. एका चित्रपटाचे ते परीक्षण होते. त्यात त्यांनी भरपूर टीका केलेली होती. पुढे त्यांनी चर्जेदार विनोदी लेख व व्यक्तिचित्रे लिहिली, अनेकांचे फिरकी घेणारे लेखन केले. तर नंतर राजाभाऊ व अरुण पाडे याबरोबर 'पुरुषराज अरुण पाडे' या विचित्र नावाखाली सामूहिक लेखन केले.

अभिरुचीतूनच लिटररी एन्सायक्लोपिडिया कोशातील मराठी साहित्याबाबतच्या रा. श्री. जोगांच्या लेखाबाबतचा वाद झाला. त्यात पु. लं. नी महाराष्ट्र साहित्य परिषदेलाही धारेवर धरले. कवी यशवंतांच्या कवितेवरही पु. लं. नी अभिरूचीत टीका लिहिली. त्यांनी ६ वर्षेपर्यंतच (१९४७) अभिरूचीत लिहिले.

'अभिरूची' १० वर्षे चालले. परंतु काही वेळा ३-४ महिने अंक खंडीत होई. एकूण १०० च अंक जेमतेम निघाले. पहिल्या २-३ वर्षात उत्साही वातावरण होते. पण ५-६ वर्षानंतर ओढाताण सुरू झाली. वाचकांना प्रलोभने दाखवण्याचाही प्रयत्न झाला.

१९४० पर्यंत लघुनिबंध सांकेतिक स्वरूपाचा असे. अभिरुचीने त्याला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला. अभिरुचीने आपले स्वरूप फक्त वाङ्मयीन ठेवले. तिने नवकथा दिली. नवकथा स्पर्धेत व्यंकटेश माडगूळकर व गंगाधर गाडगीळ यांना पारितोषिक मिळाले व दोन बिनीचे नवकथाकार पडद्यावर आले. अरविंद गोखले, मंगेश पाडगावकर शरच्चंद्र मुक्तिबोध, विंदा करंदीकर, रणजित देसाई, सूर्यकांत खांडेकर, रमेश तेंडुलकर, शांता शेळके, श. वा. चिरमुलेंच्या कविता आदि मान्यवरांचे साहित्य अभिरुचीतून प्रसिद्ध झाले. '१९२० ते १९५०' या मुंबई काव्यसमेलन संग्रहातील मर्ढेकरांपासून इतर बहुतेक कवी 'अभिरुची' ने दिलेले आहेत.

काही सामान्य दर्जाचेही साहित्य अभिरुचीतून प्रसिद्ध झाले.

या नियतकालिकांत कथा, काव्य, लघुनिबंध, समीक्षा याला प्राधान्य असे. प्रत्येक अंकाची सुरुवात कवितेने होत असे. कधी ७-८ तर कधी १०-१२ कविता छापत. हा साचा नंतर अनेकांनी उचलला. सर्व नवकाव्य 'अभिरूची' व नंतर 'सत्यकथे'तून आले. अभिरुचीतील मर्ढेकरांची 'पिंपात मेले उंदीर...' ही कविता गाजली.

'अभिरुची' महायुद्ध काळात निघूनही एखाद दुसरा लेखच महायुद्धावर आला. यात सामाजिक वा राजकीय लेखनाला चालना दिली नाही. अपवाद म्हणून १९४८ च्या गांधीवधानंतर महाराष्ट्रात जातीय दंगल झाली. त्याबद्दल 'असे का झाले?' व 'पुढे काय?' अशा नावाने अभिरुचीने लेखन दिले. त्यात इरावती कर्व्यांसारख्या प्रमुख विचारवंतांचा समावेश होता.

'अभिरुची'च्या संपादकीयात 'निषाद व शमा' हा वाद महत्त्वाचा असे. तो ताज्या घडामोडींवर प्रतिक्रिया म्हणून येई. यामधून साहित्य संमेलने, व्यवसाय बंधू यांवरही टीका होई 'किर्लोस्कर' मासिकाच्या धोरणाचे चांगले स्वागत अभिरूचीने केले आहे. १०० वा 'सह्याद्री'चा अंक निघाला तेव्हा त्यावर भयंकर टीका अभिरुचीतून झाली. सह्याद्री हे केळकरांचे संस्थान आहे. तेथे भालदार-चोपदार कसे आहेत इ. परखड टीका झाली अभिरूचीचा ग्रंथ व वाङ्मय प्रसारासाठी पुस्तकांच्या किंमती कमी होण्याबाबत आग्रह असे.

अभिरूचीतून 'मते व मतभेद' हे सदर वाचकांच्या पत्रव्यवहारासाठी चालवले जाई. हे मुक्त व्यासपीठ असे. त्यावर संपादक काहीही हस्तक्षेप करीत नसत. प्रत्येक अंकात ७-८ वाचकांची पत्रे येत. त्यात काही साहित्यिकही आपली हजेरी लावीत. असेच पहिल्या वर्षाच्या शेवटच्या अंकात ना. सी. फडक्यांचे चिं. वि. जोशी यांच्या कथेवर सतप्त पत्र आलेले होते. काही वेळा वाङ्मय चौर्याचे उदाहरण सामान्य वाचकाने याच सदरामधून दाखवून दिले.

अभिरुचीचे दिवाळी अंकाचे मुखपृष्ठ साधे, अनाकर्षक असे दिवाळी अंकातील नटयांच्या चित्रांच्या प्रसिद्धीवर अभिरुचीने भरपूर टीका केली होती.

अभिरूचीचा दर्जा अखेरपर्यंत उच्च राहिला त्यातून चांगल्या इंग्रजी वाङ्मयाचा अनुवाद दिला जात असे.

अखेर १० वर्षानंतर १९५३ साली अभिरूचीने 'गडकरी विशेषांक' व १९६६ मध्ये 'अश्लीलता विशेषांक' असे फक्त दोन विशेषांक काढले. शुद्ध वाङ्मयीन स्वरूपाच्या नियतकालिकाचा टिकाव लागत नाही. असेच एक अल्पजिवी नियतकालिक म्हणजे 'अभिरूची!' (अपूर्ण)

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा
मला निसटलंच पाहिजे!
अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

'पॅरिसच्या लोकांना ब्रिजिट बार्दो म्हणजे केवळ एक स्त्री वाटत नाही. त्यांना ती तत्त्वज्ञानातील प्रवृत्ती वाटते. सौंदर्यशास्त्रातील एक अशी समस्या की जिचा सखोल अभ्यास व्हायला हवा. किंवा जिला जीवन काही वेळा दुःखी आणि बऱ्याच वेळा व्यर्थ आहे असं वाटतं अशा बंडखोर शक्तीचं ती प्रतीक आहे असं त्यांना वाटतं.' –ब्रिजिट बार्दोविषयी एक मत.

# सिनेसृष्टीत नवं युग सुरू करणारी लावण्यवती ब्रिजिट बार्दो

रघुपती भट्ट

तिच्याबद्दल काय लिहिता येईल ?

तिच्याबद्दल एवढं लिहिलं गेलंय की त्याची गणती करता येणार नाही. एक जमाना असा होता की फ्रेंच वृत्तपत्रांना तिच्याशिवाय विषय नव्हता. तशी ती फार असामान्य म्हणता येणार नाही. तिच्याकडे उच्च अभिनय आहे असं चुकूनही कोण म्हणणार नाही. अर्थात तिने नेहमीच प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. पण अभिनयाच्या बाबतीत तिच्यापेक्षा कितीतरी सरस अभिनेत्र्या आहेत.

ती असामान्य रूपवती देखील नाही. रूपवती ती आहे पण तिच्यापेक्षा रूपाने सरस असणाऱ्या आहेत.

पण तरीसुद्धा तिच्या नावाभोवती जे वलय आहे ते दुसऱ्या कोणत्याही अभिनेत्रीभोवती नाही. मोठमोठ्या लेखकांनी तिची स्तुती गायली आहे. अनेक कवींनी तिच्यावर खंडकाव्ये रचली आहेत. तिच्यासाठीं अनेकांनी आपले जीवन बरबाद केले आहे. द गाल, विन्स्टन चर्चिल यासारख्यांना ती मोह पाडून गेली आहे.

थोडक्यात सांगायचं झालं तर विसाव्या शतकात तिच्याइतकी चर्चा कोणावर झालेली नाही. एका वेगळ्या अर्थानं तिला युगप्रवर्तक म्हणता येईल.

या युगप्रवर्तक स्त्रीचा जन्म १९३४ साली फ्रान्समध्ये झाला. तिचा बाप एक उद्योजक होता. आणि आई एक असफल नटी. आपल्या मुलीचं नाव त्यांनी ब्रिजिट ठेवलं.

ब्रिजिटच्या लहानपणात काही विशेष महत्त्वाचं घडलं नाही. पुन्हा ही मुलगी सगळ्या जगात गाजेल असं वाटण्यासारखंही काही नव्हतं. तिच्या वडिलांनी तिला एका महागड्या शाळेत ठेवलं होतं. तिथं तिला नृत्याची गोडी लागली. आपल्या मुलीनं चार चौघींसारखं शिकावं असं तिच्या वडिलांना वाटत होतं; पण आईला मात्र वाटे जे आपल्याला जमलं नाही ते पोरीनं जमवावं.

त्यामुळेच तिच्या आईने तिला नृत्याचे विशेष शिक्षण मिळण्याची सोय केली. ब्रिजिटला सकाळी शाळा करायला लागायची आणि नृत्यशिक्षण दुपारी. शाळेत शामळू दिसणारी ब्रिजिट नृत्याच्या तालावर नाचू लागली की तिच्यात पूर्णपणे बदल होत असे. एक नवी ब्रिजिट मग तिच्यात फुलायची.

ब्रिजिटने तारुण्यात प्रवेश केला त्या सुमारासच तिच्या आईने तयार कपड्यांचे एक दुकान उघडले. आपल्या कपड्यांच्या जाहिरातीसाठी एक फॅशन शो ठेवला. यामध्ये ब्रिजिटने मॉडेलिंग केले. ब्रिजिटच्या आकर्षक व्यक्तिमत्त्वाने इतर फॅशन शोवाल्यांचे ब्रिजिटकडे लक्ष वेधले आणि ब्रिजिटला ऑफर्स येऊ लागल्या.

एका प्रसिद्ध फॅशन मासिकाने ब्रिजिटला आपल्या मुखपृष्ठावर आणण्याचे ठरवले. ब्रिजिटचे आईवडील थोडेसे नाराज होते. कारण आईच्या दुकानात फॅशन शो करणं वेगळं आणि मासिकात फोटो आणणं वेगळं. कारण ब्रिजिट एक शाळेला जाणारी मुलगी होती. मग त्यावर उपाय शोधण्यात आला. ब्रिजिटचं पूर्ण नाव न देता फक्त तिची आद्याक्षरे वापरायचं ठरलं.

आणि बी. बी. ची वैभवशाली कारकीर्द चालू झाली. बी. बी. म्हणजे ब्रिजिट बार्दो हे कळायला अजून थोडा उशीर होता. 'एले' या सुप्रसिद्ध मासिकाच्या मुखपृष्ठावर बी. बी. चे चित्र झळकले.

या चित्रामुळे अनेक प्रसिद्ध निर्मात्यांचे लक्ष बी. बी. कडे वळले. यामध्ये सुरवात केली ती एका मार्क अॅलीग्रे नावाच्या निर्मात्याने. त्याने तावडतोबला व्हॅदीमला सांगितले, 'ही कोण बीबी आहे ताबडतोब तिला माझ्याकडे घेऊन ये.'

व्हॅदीम हा कथालेखक वगैरे होता. त्याने बीबी म्हणजे कोण हे झटकन शोधून काढले. पण त्याच्या लक्षात आले की ब्रिजिट शाळेला जाणारी मुलगी असल्याने तिच्या आईवडि-

लांशी युक्तीने संपर्क साधला पाहिजे.

ॲलीग्रे आणि व्हॅदिम प्रथम एक पत्र पाठवून बार्दो कुटुंबियांना भेटले. पहिल्या भेटीतच ते सगळे प्रभावित झाले. बार्दोने स्क्रीन टेस्टसाठी कबुली दिली. ब्रिजिटच्या सिनेजीवनाची ही नांदी होती. त्यानंतर व्हॅदिमच्या आणि तिच्या सतत भेटी होऊ लागल्या. ती त्याच्या प्रेमात पडली. तिच्या आईवडिलांना हे प्रेम मंजूर नसल्याने तिने एक आत्महत्येचा प्रयत्नही केला.

१९५२ मध्ये ब्रिजिटला पहिला चित्रपट मिळाला. या पाठीमागे व्हॅदिमचे प्रयत्न होते. व्हॅदिमने ब्रिजिटची जोरदार जाहिरात चालवली होती. ब्रिजिटच्या आत्महत्येच्या प्रयत्नानंतर तिच्या आईवडिलांचा विरोध संपला होता. त्यामुळे व्हॅदिमच्या इच्छेआड कोणी आले नाही.

अनुभव आणि शिक्षण यांची कमतरता असताना देखील ब्रिजिटने 'ले ट्राउ नॉर्मन्ड्' ( Le Trou Normand ) मध्ये कॅमेऱ्यासमोर वाक्ये म्हटली तिच्या या पहिल्या चित्रपटाचे म्हणावे तसे स्वागत झाले नाही. पण समीक्षकांना ब्रिजिटचे काम आवडले. त्यामुळे ब्रिजिटला ताबडतोब दुसरा चित्रपटही मिळाला.

त्यानंतर ब्रिजिट व्हॅदिमबरोबर विवाहबद्ध झाली. ब्रिजिटच्या वडिलांनी त्यांना एक फ्लॅट घेऊन दिला. व्हॅदिमचा आणि ब्रिजिटचा संसार सुरू झाला. दोघांचे स्वभाव भिन्न होते. पण अपघातातून ते एकत्र आले होते. व्हॅदिमचे ब्रिजिटवर प्रेम होते पण ते प्रेम पिग्मॅलियनमधल्या प्रोफेसरसारखे होते. ब्रिजिटमधील ताकद त्याने ओळखली होती आणि ती जगासमोर आणण्याचा त्याचा प्रयत्न होता. आपल्या बायकोकडे त्याने नेहमीच लेखक, दिग्दर्शक वगैरे चष्म्यातून किंवा व्यावसायिक नजरेने पाहिले असा त्याच्यावर आरोप केला जातो. पण एक लक्षात ठेवले पाहिजे की व्हॅदिमच्या या नजरेमुळेच ब्रिजिट बार्दो एवढी यशस्वी झाली.

लग्नानंतर ब्रिजिटने काही फ्रेंच चित्रपट पूर्ण केले. त्यामध्ये 'ॲक्ट आफ लव्ह' नावाचा एक चित्रपट होता. यावेळी प्रसिद्ध अमेरिकन नट कर्क डग्लस याच्याशी तिची मुलाखत झाली. त्यामुळे कॅनिस चित्रपट महोत्सवाला जाण्याची संधी तिला मिळाली. अर्थात व्हॅदिमही तिच्याबरोबर होताच.



¤

ब्रिजिट बार्दो-
आदर्श सौंदर्य

¤

व्हॅदिमने पत्रकारांना ब्रिजिटचे असे काही फोटो दाखवले की, पत्रकारांना ब्रिजिटला पाहण्याची उत्सुकता लागून राहिली. ( यातील काही फोटो फक्त नवऱ्यालाच घेता येतील असे होते. यावरून व्हॅदीमवरच्या आरोपातील तथ्य दिसून येईल. ) अमेरिकन नेव्हीने या सगळ्या कॅनिसमधील कलाकारांना आपल्या एका बोटीत बोलवले होते. पण पत्रकारांना आकर्षण होते ते ब्रिजिटचे. त्यांनी ब्रिजिट ब्रिजिट असा पुकारा करून तिचे भरपूर फोटो घेतले. कर्क डग्लस जेव्हा ब्रिजिटजवळ उभा राहिला तेव्हाच त्यांनी त्याचा फोटो घेतला.

दुसऱ्या दिवशी जगातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांनी कॅनिस महोत्सवातील सर्वात मोठे आकर्षण म्हणून ब्रिजिटचा फोटो छापला.

## 'ब्रिजिट बार्दो' युग सुरू झाले !

ब्रिजिटला त्यानंतर काही इटालियन चित्रपटात कामे मिळाली. त्यासाठी ती रोमला आली. व्हॅदिम 'बार्दो इमेज' तयार करण्याचे काम करीतच होता. रोममध्ये ब्रिजिट बद्दलच्या कथा नेहमी फैलावत असत. त्याचे मूळ व्हॅदिमकडेच जाई.

'फ्युचर्स व्हेडेटिस' Futures vedettes नावाचा एक चित्रपट मार्क ॲलीग्रे आणि व्हॅदिमच्या डोक्यात आला. कथा व्हॅदिमची. कथेचे संवाद वगैरे त्याने ब्रिजिटला समोर ठेवूनच लिहिले होते. यामध्ये ब्रिजिटला काही अतिशय सेक्सी सिन्स होते. व्हॅदीम किती धंदेवाईक मनुष्य होता याचा हा नमुना होता.

एका ब्रिटिश निर्मात्याने ब्रिजिटला आपल्या एका चित्रपटासाठी करारबद्ध केले.

ब्रिजिटची ख्याती लंडनपर्यंत पोचली होती. आल्याबरोबर तिला पत्रकारांनी अनेक प्रश्न विचारले. तिची प्रतिक्रिया तशी मूकच होती. पण प्रत्येकाने आपल्या परीने त्यात तिखट-मीठ घातले.

'डॉक्टर ॲट सी' असा तो चित्रपट होता. सगळी सेटवरची माणसे ब्रिजिटच्या मागे मागे असायची. 'सुपरसेक्सी' असा जो तिचा लौकिक व्हॅदिमने पसरवला होता, त्याजोगे ती काय करते का ते पाहण्यासाठी. या चित्रपटात तिने काही निःसंकोच दृश्ये दिली. हा चित्रपट जेव्हा प्रदर्शित झाला तेव्हा समीक्षकांनी फक्त ब्रिजिटची स्तुती केली. तिला नवनवी विशेषणे मिळाली. जागोजाग बार्दो पोस्टर्स झळकली. ३४–२०–३४ या तिच्या मोजमापाना स्टँडर्ड मानले जाऊ लागले. तिची केशरचना, ओठ पुढे काढण्याची पद्धत याचे अनुकरण होऊ लागले. जगभरच्या नियतकालिकात तिचे फोटो झळकले.

'डॉक्टर ॲट सी'ने ब्रिजिटला आंतरराष्ट्रीय कलावती बनवले.

## 'बार्दो' पंथ

त्यानतर ब्रिजिटने काही फ्रेंच चित्रपट दिले. त्या सगळधातून ब्रिजिट कथा निर्माण झाल्या. ब्रिजिटने सगळ्या पोजमध्ये दृश्ये दिली. ब्रिजिटच्या धीटपणाने जग थक्क झाले. ब्रिजिटकथा पसरवण्यात व्हॅदिमचा मोठा हिस्सा आहे. या कथामुळे ब्रिजिटचे चित्रपट पाहायला जास्तच गर्दी व्हायची. ब्रिजिटने एकापाठोपाठ एक चित्रपट पुरे केले. काम करण्याचा तिचा सपाटा मोठा होता.

'नीती' वाले ब्रिजिटच्या या तडाख्याने हैराण झाले. ब्रिजिट लाटेपुढे कोणाचा टिकाव लागणार नाही हे त्याच्या लक्षात येऊ लागले होते. 'निर्लज्ज, अनैतिक, आक्रमक' वगैरे शेलकी विशेषणे लावल्याने ब्रिजिटला अधिकच महत्त्व येऊ लागले.

ब्रिजिट बार्दो ज्या चित्रपटात असेल त्या चित्रपटात कामे करायला मोठेमोठे नट घाबरू लागले. कारण किती उच्च अभिनय असला तरी ब्रिजिटची शरीरसंपदा त्याना अक्षरशः सपवून टाकायची. उदा. फ्रेंक सिनात्राचे आहे. प्रचड मोबदला देऊ केला असतानासुद्धा त्याने ब्रिजिटबरोबर काम करण्याचे टाळले.

व्हॅदिमबरोबरचा तिचा विवाह १९५७ मध्ये संपुष्टात आला. दोघेही त्यात सारख्या प्रमाणात दोषी होते असं म्हटल तर चुकीचे होणार नाही. अर्थात व्हॅदिमचे आणि तिचे संबंध त्यानतरसुद्धा चांगलेच राहिले.

तिला कोणी तरी विचारले 'तुम्ही नवऱ्यापासून फारकत का घेतली?'

'साधं कारण आहे.' ती उत्तरली, 'माझं दुसऱ्यावर प्रेम बसलं.'

प्रसिद्ध फ्रेंच नट चार्लस् बॉये याच्याबरोबर काम करण्याचा योग ब्रिजिटला 'युने पॅरिसिएने' या चित्रपटात आला. प्रेमिकाची भूमिका करण्यात बॉये नावाजलेला होता. पण आता त्याचं खूप वय झालं होतं. ब्रिजिटसारख्या मुसमुसलेल्या युवतीबरोबर काम करणं त्याला कठीण गेल. पण त्यानं ब्रिजिटचं खूप कौतुक केल. 'ती चैतन्यमयी आहे. तिच्या वागण्यात आणि बोलण्यात रसरशीतपणा आहे पण अश्लीलता नाही.' तो म्हणाला. आणि ब्रिजिटचं कौतुक करताना त्यानं मत व्यक्त केलं की योग्य दिग्दर्शक भेटल्यास ब्रिजिट एक उत्तम अभिनेत्री बनू शकेल.

चार्लस् बॉयेन असं म्हणणं म्हणजे शाबासकीच.

ब्रिजिट चित्रपटामागून चित्रपट पूर्ण करीत होती. प्रचंड पैसा मिळवत होती. तिच्याबद्दल चर्चा, दंतकथा यावर मासिकाना भरपूर पाने लिहायला मिळत होती. पण ब्रिजिट मात्र एकाकी राहात होती. एक किल्ल्यासारखे प्रचंड तटबंदी असलेले घर तिने घेतले होते. तिच्या प्रेमप्रकरणाच्या चर्चा चालूच होत्या. सार्त्रची प्रेयसी सिमॉन डी बिर्वा (Simone de Beauvoir) हिने ब्रिजिटवर एक काव्य लिहू घातले होते. ब्रिजिट म्हणजे 'स्त्री'चा एक उत्कृष्ट आविष्कार आहे असं तिचं मत होतं. प्रेममयी स्त्रीचा!

व्हॅदिमचं मात्र मत होतं की ब्रिजिटचं कोणावर प्रेम असणं शक्यच नाही. ती फक्त स्वतःवर प्रेम करते याचा तो वारंवार पुनरुच्चार करी. रोनाल्ड पेन नावाच्या एका लेखकाला ते पटले. तो जेव्हा ब्रिजिटच्या घरी गेला तेव्हा ती एका मोठ्या आरशासमोर ड्रेसिंग गाऊनमध्ये बसली होती. 'तो एक अनुभव होता.' पेन लिहितो, 'स्वतःमध्ये गुंगून जाण्याच्या तिच्या पद्धतीने मी थक्क होऊन गेलो. माझ्याकडे शब्दच नव्हते. मी तिला काही विचारले नाही. फक्त तिच्या त्या जगप्रसिद्ध सौंदर्याकडे आणि आविष्काराकडे पाहातच राहिलो.'

तिचे चित्रपट यशस्वी होत याबद्दल एक समीक्षक म्हणतो 'तुम्हाला यशस्वी चित्रपट काढायचा असेल तर कोणतीही एक कथा उचला. ब्रिजिटला करारबद्ध करा. खालील गोष्टी त्यात घुसडा. बीबी शॉवरबेदिंग करते आहे. बीबीचे बेडरूम सीनस्, बीबी कॅमेऱ्याकडे येताना आणि कॅमेऱ्यापुढून खुणावत, ओठ पुढे काढून, उन्मादक अवस्थेत जातानाचा सीन (हा पाहिजेच.) 'अंगे भिजली जलधारांनी' असलं तर उत्तमच. नसलं तरी हरकत नाही. एवढं झालं की नोटा मोजण्याचा सराव करावा.'

'बार्दो'चा एक पथ निर्माण झाला. 'बार्दो'सारख वागणं याला इंग्रजी भाषेत एक नवा शब्द आला. 'बार्दोलॅट्री'!

'अ वुमन लाइक तॅतान' नावाच्या एका चित्रपटावेळी अमेरिकन पत्रकार ब्रिजिटची मुलाखत घेण्यासाठी आले होते. त्यांनी ब्रिजिटला खूप गळ घातली. 'बार्दोलॅट्री'-विषयी अमेरिकन लोकाना उत्सुकता होती. त्या लक्षावधी चाहत्यांच्या वतीने ते आले होते. पण बार्दोने त्यांना दाद दिली नाही. त्यात प्रसिद्ध स्तंभलेखिका हेड्डा हॉपरपण होती. तिच्या नावाचाही ब्रिजिटवर काही परिणाम झाला नाही. कोट्यावधी वाचक जिच्या लिखाणावर तुटून पडत ती 'हेड्डा हॉपर कोण?' या ब्रिजिटच्या प्रतिक्रियेने अतिशय संतप्त झाली असेल यात वाद नाही.

पत्रकार तिचा विलक्षण पिच्छा पुरवत पण ब्रिजिट काही त्यांना दाद लागू देत नसे.

'ट्रिटिग्नंट' या नटाबरोबरच्या ब्रिजिटच्या रोमान्सच्या कथा प्रचलित असतानाच 'सॅचा डिस्टेल' या गिटारवादकाची ब्रिजिटच्या जीवनात एंट्री झाली. सॅचामध्ये ब्रिजिटच्या दृष्टीने अनेक समान गोष्टी होत्या. सॅचा आणि ब्रिजिट याच्या वारंवार गाठीभेटी होऊ लागल्या. विशेष म्हणजे सतत

जन्म : २८ सप्टेंबर १९३४. पॅरिसमध्ये.

पहिला चित्रपट

Le Trou Normand

( The Norman Hall ) १९५२

गाजलेले चित्रपट

1) Doctor At Sea. १९५५
2) Et Dieu Crea la Femme
( And Woman Was Created ) १९५६
3) Une Parisienne. १९५७
4) Bebette S' En Va-t-En Guesse
( Babette Goes to War ). १९५९
रशियन सन्मान
5) Vie Privee ( Private Life ) १९६१
6) Dear Brigitte (१९६५)
7) Viva Maria ! (१९६५)
8) Shalako (१९६८)
9) Don Juan 1973

आणि इतर अनेक यशस्वी चित्रपट

ब्रिजिटच्या मागावर असणाऱ्या पत्रकारांना याचा लवकर पत्ता लागला नाही. जेव्हा पत्ता लागला तेव्हा दोघांनीही दडी मारली होती. त्यांचे ठिकाण पत्रकारानी शोधून काढले. ब्रिजिटचे किल्लेवजा घर. तटबंदी-बाहेर उभे राहून पत्रकारांनी सॅचाच्या गिटारचे मधूर सूर ऐकले.

दुसऱ्या दिवशी मथळे झळकले. 'सॅचा डिस्टेल, अर्थात फ्रेंच फ्रॅंक सिनात्रा !' 'आणि सॅचा डिस्टेल नव्हे–श्रीयुत बार्दो.'

अमेरिकन सयोजकानी ही संधी पकडली. सॅचा आणि ब्रिजिट यांच्या सबधाचा फायदा न घेतील तर ते धदेवाले कसले ? एका प्रसिद्ध कलावृंदात त्याला बोलवणे आले.

ब्रिजिटचा निरोप घेऊन तो न्यूयार्कला गेला त्याचा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी त्याची ओळख करून देण्यात आली. जगातील सर्वात जास्त हेवा करण्यासारखा मनुष्य ! सॅचा डिस्टेल अर्थात ब्रिजिट बार्दोचा प्रियकर. त्याच्या कार्यक्रमांना गर्दी व्हायची ती ब्रिजिटशी असलेल्या संबधामुळेच.

सॅचाने ब्रिजिटला गिटार वादन शिकवले. ब्रिजिटमध्ये एक नवा बदल त्याने घडवून आणला असे म्हटले जाऊ लागले.

त्यावर्षी ब्रिजिटने व्हेनिस चित्रपट महोत्सवात तिच्या एका चित्रपटाच्या प्रसिद्धीसाठी जायचे ठरवले. विशेष म्हणजे ब्रिजिट येणार आहे म्हटल्यावर प्रसिद्ध तारका जिना लोलो ब्रिजिडा हिने आपली भेट रद्द केली. ब्रिजिटची प्रसिद्धी किती अपरंपार होती याचे हे उदाहरण.

सॅचाचे आणि तिचे संबंध चालू होतेच. सॅचाला त्याचा फायदा मिळाला. पत्रकार त्याला नेहमी काहीही विचारत. एकदा ब्रिजिटबद्दल तो म्हणाला, 'पडद्यावरील ब्रिजिटमध्ये आणि खऱ्या ब्रिजिटमध्ये फार अतर आहे. ती एक साधी सरळ मुलगी आहे' ब्रिजिटबद्दलच्या लोककल्पना ज्या व्हॅदिमने पसरवल्या होत्या त्या तो खोडायला निघाला होता.

१९५९ साल उजाडले. ब्रिजिटला एक नवा चित्रपट मिळाला. निर्मात्याला एक हिरो फक्त हवा होता. रोझॅनो ब्रॅझी ? स्पष्ट शब्दात नकार तो काय म्हणाला ?

'ब्रिजिट बार्दोच्या नव्या चित्रपटात काम करण्याची संधी मला देण्यात आलीय. पण मला व्यावसायिक आत्महत्या करायची नाहीय. तिच्या चित्रपटातील नायक तिच्याकडे पहाण्यात वेळ घालवतात.'

आणि प्रेक्षकही तेच करतात !

प्रसिद्ध नट आणि लेखक डेव्हिड निव्हेन यालाही ब्रॅझीसारखेच वाटले.

ब्रिजिटने स्वतःच हिरो शोधायचे ठरवले आणि तिने जॅकस शॅरीयरची निवड केली. जॅकस हा लष्करी कुटुबातील माणूस होता. दोन भाऊ आणि बाप ही लष्करात असल्याने त्याने आपला सिनेमा नाटकाचा धंदा स्वीकारला होता.

अतिशय भिडस्त स्वभावाचा शॅरीयर ब्रिजिट बार्दोपुढे काही बोलू शकला नाही. ब्रिजिटबरोबर त्याने काम केलेच पण ब्रिजिटबरोबर त्याचे मैत्रीचे सबधही प्रस्थापित झाले.

या सुमारास ब्रिजिटच्या मनात आई होण्याची इच्छा निर्माण झाली होती. त्यामुळे त्या चित्रपटात ( बॅबेट, स–एन् व्हा–त–एन् ग्वेरे) थोडक्यात 'बॅबेट' मध्ये आपण सेक्सी दृश्ये देणार नाही असे तिने जाहीर करून टाकले.

अर्थात निर्मात्याने त्याचाही प्रसिद्धीसाठी उपयोग करून घेतला. जाहिरात अशी–

'पहा, ब्रिजिट बार्दोचा पहिला सोज्वळ चित्रपट !'

अर्थात लोकात खळबळ उडाली. ब्रिजिट आणि सोज्वळ ? अब्रह्मण्यम् ! एकाने इशारा दिला 'जर तसे असेल तर ब्रिजिटला अतिशय तळमळीने काम करावे लागेल.'

आणि खरोखरच ब्रिजिटने अत्यत तळमळीने काम केले. महायुद्धात शौर्याची कामगिरी बजावलेल्या एका फ्रेंच ललनेची ती भूमिका होती. हा ब्रिजिटचा एक उत्कृष्ट चित्रपट मानण्यात येतो. विशेषतः मास्कोत याचे विलक्षण कौतुक झाले. प्रिमियरसाठी ब्रिजिट मास्कोत हजर राहिली होती आणि सेक्सी चित्रपटांना आणि दृश्यांना कडकडून विरोध करणाऱ्या रशियनानी विसाव्या शतकातील 'सेक्सची देवता' मानल्या गेलेल्या ब्रिजिटचे मनमुराद कौतुक केले.

ब्रिजिटच्या खाजगी आयुष्यातही त्या फ्रेंच ललनेप्रमाणे एक युद्ध जुंपले होतेच. ब्रिजिटला आता जीवनाचा जोडीदार निवडायचा होता.

आणि पहिली पायरी म्हणून तिने सॅचा डिस्टेलची हकालपट्टी केली. ब्रिजिटच्या संबंधाचा फायदा घेऊन त्याने खूप पैसा, कीर्ती मिळवली. आता ब्रिजिटला तो नको होता.

एका नोटीशीने सॅचा डिस्टेलला कळव-

ण्यात आले की इथून पुढे त्याने ब्रिजिट बार्दोची भेट घेण्याचा मुळीच प्रयत्न करूनये.

## शॅरीएर अध्याय

जॅकस शॅरीयरशी तिला लग्न करायचं होतं पण अडचणी बऱ्याच होत्या. शॅरीयर कुटुंब लष्करी बाण्याच होतं. घराघरातून जिचे फोटो आहेत अशी ब्रिजिट त्यांना सून म्हणून मंजूर नव्हती.

पण ब्रिजिट विरुद्ध आईवडील असा प्रसंग निर्माण झाल्यावर जॅकस ब्रिजिटकडेच झुकला. कोणाचही न ऐकता त्याने ब्रिजिटशी लग्न करण्याचा निर्धार केला.

लग्नाच्या ठिकाणी इतकी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती की खुद्द नवऱ्या मुलाला आत शिरता आले नाही. पोलिसानी त्याचे काही न ऐकता धक्के मारून हाकलून काढले. पुन्हा तो कसातरी आत आला.

१९ जूनला ब्रिजिटचा हा दुसरा विवाह संपन्न झाला. 'मी जगातील सर्वात सुखी माणूस आहे. जिची कामना कोटयावधी करतात ती आज माझी झालीय.' अशा शब्दात त्याने प्रतिक्रिया व्यक्त केली.

मधुचंद्र संपतो आहे एवढयात शॅरीयरला सैन्यातून बोलावणे आले. या वेळेपावेतो ब्रिजिट माँ बननेवाली थी.

शॅरीयर सैन्यात प्रायव्हेट म्हणून भरती झाला. बराकीत गेल्यावर त्याला प्रत्येक सैनिकाजवळ ब्रिजिटचे अर्धनग्न अवस्थेतील फोटो, पोस्टर्स पाहायला मिळाले. सगळयांच्या तोंडी ब्रिजिटचे नाव. त्यांना जेव्हा समजले की नवा प्रायव्हेट ब्रिजिटचा नवरा आहे तेव्हा त्यांनी त्याला घेरले. मग शॅरीयरला नको नको त्या प्रश्नाना तोंड द्यायची पाळी आली. ते सगळे घाणेरडे विनोद ऐकून शॅरीयर पार खचून गेला. त्याला नर्व्हस ब्रेकडाऊन झाला. अर्थात सैनिकांनी त्याला शेळपटांच्या यादीत बसवला.

इकडे 'ब्रिजिट'ची अवस्थाही कठीण झाली होती. तिच्या नाजूक अवस्थेत तिला 'शॅरिए'चा आधार हवा होता. डॉक्टरानी सैन्याच्या अधिकाऱ्यांना पत्र लिहून शॅरीएला बोलवून घेतले. पण दोघाचेही मानसिक संतुलन बिघडलेले असल्यामुळे त्यांच्यात भांडणे होऊ लागली. ती परत गेल्यावर इतर सैनिकानी त्याला पुन्हा छेडले. पुन्हा नर्व्हस ब्रेकडाऊन !

शॅरीए ब्रिजिटला भेटण्यासाठी रजा घेऊन यायचा. असाच एकदा तो आला असताना त्याने स्टुडिओत आपल्या चित्रपटाचे काम पूर्ण केले आणि ब्रिजिटसमवेत एका फॅशन-हाऊसमध्ये गेला. हे पत्रकारांनी पाहिले आणि त्यानी सगळया फ्रान्समध्ये गदारोळ उठवला इतर सैनिकही नाराज झाले. प्रायव्हेट शॅरीएला बायको आहे आणि आम्हाला नाहीत असा सवाल त्यानी करायला सुरवात केली. लोकांच्या तक्रारीवरून एका सदस्याने फ्रान्सच्या लोकसभेत आवाज उठवला. ब्रिजिट बार्दोचा नवरा म्हणून एका सैनिकाला सेवेत सवलत मिळते इतराना का मिळू नये ?

शॅरीएच्या लष्करी खानदानाची बदनामी झाली. जनतेच्या गदारोळामुळे अखेर जॅकस शॅरीएला सैन्यातून काढून टाकावे लागले.

बिचारा जॅकस ! आपण सर्वसुखी आहोत असं मानणाऱ्या त्याला सर्व आपत्तीना एकाच वेळी तोंड द्याव लागलं.

ब्रिजिटला असह्य अडचणींना तोंड देत अखेर मातृत्व प्राप्त झाले. ब्रिजिटला मुलगा झाला ही बातमी सर्व फ्रेंच वृत्तपत्रानी अग्रक्रम देऊन छापली. अनेक महत्त्वाच्या बातम्यांपेक्षा ही बातमी फ्रान्सला महत्त्वाची वाटली. ब्रिजिटचे अभिनंदन करणाऱ्या तारा, मुलाला ड्रेस, खेळणी, पुष्पगुच्छ इतके आले की फ्रान्सच्या टपालखात्याने एक खास बार्दो सर्व्हिस सुरू केली.

पण काही दिवसात ब्रिजिट पुन्हा व्यवसायाकडे वळली. मुलाचे कोडकौतुक तिने भरपूर केले होते आता सिनेमा. नव्या सिनेमाचे नाव होते 'ला व्हेरिटि'. याचा हिरो शॅरीए असणार असे सगळयाना वाटले होते. पण ब्रिजिटने त्याचे नाव बाजूला सारले. मग वेगवेगळया हिरोंच्या टेस्टस् झाल्या यात ब्रिजिटबरोबर लव्ह सीन्स असायचे. न कंटाळता ब्रिजिट त्यात काम करायची.

एक प्रवाह होता की ब्रिजिटला ते आवडते. शॅरीए इतका नाराज झाला की त्याने आत्महत्येचाही एक प्रयोग करून पाहिला. शॅरीएच्या स्थितीच्या कथा वृत्तपत्रात प्रसिद्ध होत असताना लोकमतही प्रक्षुब्ध होऊ लागले.

व्हेटिकनने तिचे एक मोठे पोस्टर करून वर 'सैतानाचे प्रतीक' म्हणून लिहिले. पण लोक प्रवचने ऐकायचे सोडून ते पोस्टर बघायला गर्दी करू लागले तेव्हा ते काढून टाकावे लागले.

जॅकसची अवस्था कठीण झाली. अगोदर हळव्या मनाचा असणारा तो आता अक्षरशः उध्वस्त झाला. त्याचा बाप अक्षरशः खवळला. माझ्या पोरान काय वाईट केलंय म्हणून ती त्याच्या जीवनाशी असा खेळ खेळतेय ? तो म्हणाला.

ब्रिजिटवर अनेक लेख प्रसिद्ध होऊ लागले. '*या शतकातील सगळयात मोठी चेटकीण*' असं एका लेखाच शिर्षक होतं. जॅकसचं उदाहरण देऊन 'पुरुषाच्या भावनाशी खेळ खेळणारी' आणि एकूण वृत्तपत्रांचा सूर भयानक होता. काल ज्यानी कौतुक केले त्याच्या डोळयात आज खून उतरला होता.

त्यामुळे ब्रिजिटने एक आत्महत्येचाही प्रयत्न केला वेळीच तिची चिठ्ठी मिळाल्यामुळे डॉक्टर्स धावले. शॅरीए, ब्रिजिट एक नटी आणि ब्रिजिट एक स्त्री याच्यातील कलह टोकाला पोचला होता.

डॉक्टर्स ब्रिजिटला वाचवण्याच्या प्रयत्नात असताना रेडिओ टीव्ही आणि वृत्तपत्रे यामधून ब्रिजिट समर्थक आणि विरोधक हमरीतुमरीवर आले.

ब्रिजिट त्यातून वाचली. पण शॅरीए अध्याय संपला. शॅरीएने पुन्हा सैन्यात जाण्याचा प्रयत्न केला पण जमले नाही.

ब्रिजिट आणि ते विभक्त झाले.

ब्रिजिटची अनेक रूपे आहेत याचा प्रत्यय फ्रेंच लोकांना आलेला आहे. ब्रिजिट भावनावश आहे. स्वकेंद्रित आहे पण प्रसंगी ती अतिशय धैर्याने वागू शकते.

एकदा एका दहशतवादी संघटनेने तिच्याकडे खंडणी मागितली. आकडा होता ३७०० पौंड. आतापर्यंत या संघटनेने अनेक मोठया व्यक्तीकडून खंडणी वसूल केली होती.

पण ब्रिजिटने एक पैसाही देण्याचे नाकारले. तिचे उत्तर फ्रान्सच्या एका प्रसिद्ध वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले.'

'मला हे चालणार नाही. कारण नाझी देशात राहाण्याची मला इच्छा नाही.

आपल्या उत्तराबरोबर खंडणी देणाऱ्या

बड्यांची तिने निर्भत्सना केली आणि दहशतवादाला फ्रेंच जनतेने कधीच प्रतिसाद देऊ नये असे आवाहनही केले.

फ्रेंच सरकारने तिच्या सुरक्षेची व्यवस्था केली. धमक्या येत राहिल्या. तिच्या मुलाला पळवून नेले जाईल अशी सूचनाही आली. पण ब्रिजिट बधली नाही. तिने छोट्या निकोलसला स्वित्झर्लंडमध्ये ठेवले. शेवटी दहशतवाद्यानीच ब्रिजिटपुढे माघार घेतली.

तिच्या घराची आठ फुटी तटबंदी म्युनिसिपालिटीने पाडायचे ठरवले तेव्हाही ती खवळून उठली स्थानिक अधिकारी म्हणत होते त्या तटबंदीमुळे त्या भागाचे नैसर्गिक सौंदर्य बिघडते. ब्रिजिटने आन्द्रे मॉर्लो याना पत्र लिहिले. मॉर्लो हे फ्रान्सच्या वनसंस्कृती विभागाचे मंत्री होते. पत्रात तिने लिहिले—

'नैसर्गिक सौंदर्याचे तुम्ही रक्षण करत असाल तर माझे सरक्षण करणे हेसुद्धा तुमचे कर्तव्य ठरते.

## डियर ब्रिजिट

त्यानतर तिने 'अॅलन डेलन' बरोबर एक चित्रपट पूर्ण केला. त्यात तिला 'मजा आला कारण डेलन हा पुरुष ब्रिजिट बार्दो होता. पण दोघाचे एवढे सतुलन जमले नाही. त्यानंतर इटालियन नट मार्सिलो मॅस्ट्रीओनीबरोबर एक चित्रपट केला. मार्सिलो म्हणाला 'ब्रिजिटमध्ये दोन व्यक्तिमत्वे आहेत आणि दोन्ही एकमेकीना भीत असतात.'

षॅरीए प्रकरणात तिची लोकप्रियता कमी झाली होती पण ओ. ए. एस. या दहशतवादी संघटनेविरुद्ध तिने जो धीट झगडा दिला त्यामुळे पुन्हा एकदा ब्रिजिट फ्रेंचाना प्रिय झाली.

आणि त्याशिवाय तिने आपण निवृत्त होणार आहोत अशी घोषणा केल्यामुळे पुन्हा एकदा तिच्याविषयीच्या चर्चांना ऊत झाला. प्रसिद्धी यंत्रणेद्वारा राबवण्यात आलेली तो एक पद्धतशीर योजना होती हा भाग वेगळा. एकदरीत ती सतत प्रसिद्धीच्या झोतात रहात होती.

निवृत्तीच्या घोषणेवेळीच जिया गोदाईने नव्या ब्रिजिट चित्रपटाची घोषणा केली. आल्बर्टो मोराव्हियाच्या 'इल डिप्रेझो' या कादंबरीवर निघणाऱ्या या चित्रपटाला सोफिया लॉरेनचा नवरा 'कार्लो पांटी' याची मदत होती.

लोकांनी प्रथम त्यावर विश्वास ठेवला नाही एक तर ब्रिजिटची निवृत्तीची घोषणा आणि दुसरे म्हणजे गोदाई महाशय हे घोषणाबाज म्हणून प्रसिद्ध होते. पण 'ले मेप्रिस' पूर्ण झाला. आणि आश्चर्य म्हणजे तो एक चागला चित्रपट होता.

ब्रिजिटचे संबंध आता बॉब झॅगुरी याच्याशी वाढले होते, स्वत:ला मोटारीचा व्यापारी म्हणवून घेणारा बॉब हुशार होता. बॉबबरोबर तिने दक्षिण अमेरिकेची एक चक्कर मारली.

अगदी गुप्तता बाळगूनसुद्धा रिओ डि जानेरोला ब्रिजिटच्या आगमनाची वार्ता कळली होती. तिच्यासाठी ध्वज उभारण्यात आले आणि रस्त्यावरून मऊ मऊ कार्पेटस् अंथरण्यात आली होती. आणि 'ब्रिजिट' 'ब्रिजिट' चा आरडा ओरडा करत लोकांची प्रचंड गर्दी एवढी बेताल होती की पोलिसाचे काही चालेना. शेवटी त्याना ब्राझिलियन लष्कर बोलवावे लागले. ब्राझीलमध्ये ब्रिजिट म्हणजे प्रचंड आनंदाची पर्वणीच त्याना वाटली. खुद्द राष्ट्राध्यक्षाची बायको ब्रिजिटला पहाण्यासाठी ताटकळत बसली होती.

लोकाच्या प्रेमाने ब्रिजिट भारावून गेली. 'ब्राझीलमध्ये मला जेवढा आनंद झाला तेवढा कोठेही झाला नव्हता.' या शब्दात तिने ब्राझीलियन लोकाचे आभार मानले.

ब्रिजिटला हॉलीवूडच्या एका कॉमेडीमध्ये काम करण्याची ऑफर आली. यात तिला तिचीच भूमिका करायची होती, चित्रपटाचे नाव होते 'डियर ब्रिजिट'

ब्रिजिटने ती भूमिका करण्याचे मान्य केले पण हॉलीवूडला येण्याचे मात्र नाकारले. हॉलीवूड तिच्या नकाराने थक्क झाले. जगभरचे सिनेमाचे लोक हॉलीवूडला येण्याची इच्छा करतात पण फक्त भाग्यवंतांनाच हॉलीवूडचे आमंत्रण मिळते आणि ब्रिजिटने ते नाकारले होते.

शेवटी पॅरीसमध्येच त्याचे चित्रण ठरले. एक चाहता तिला पत्रे लिहितो आणि अखेर तिला भेटतो असे कथानक होते. ब्रिजेटला इंग्रजी बोलताना त्रास झाला.

'डियर ब्रिजिट' फार चांगले होते अशातला भाग नाही पण ब्रिजिटचा तो एक मोठा विजय होता. पर्वताने महमदाकडे जाण्यासारखे ते होते. हॉलीवूडला ब्रिजिटने फ्रान्सकडे आणले होते.

'व्हिवा मारिया' नावाचा एक चित्रपट ब्रिजिट ३० वर्षाची झाल्यावर तिच्याकडे आला कथा दोन मारियावर होती. दुसरी मारिया जीया मोरां ही अत्यंत समर्थ अभिनेत्री होती. या दोन्ही मारिया क्रान्तीकारक असतात. हॉलीवूडचा देखणा नट जॉर्ज हॅमिल्टन हाही त्यात होता.

ब्रिजिटने या चित्रपटात अगदी कसून काम केले आणि जिया मोरांपेक्षा तिने त्यात बाजी मारली 'व्हिवा मारिया' ब्रिजिटचा चित्रपट ठरला.

या चित्रपटाच्या प्रसिद्धीसाठी ब्रिजिटने अमेरिकेला जावे असे ठरले ब्रिजिटचा त्याला विरोध होता; पण सर्वांनीच जोर धरल्यावर ब्रिजिटने जायचे ठरवले.

अमेरिकन्स तिची अगदी उत्सुकतेनें वाट पहात होते. 'ब्रिजिट'बद्दल त्याचे औत्सुक्य अगदी शिगेला जाऊन पोचले होते.

'ब्रिजिट अमेरिका शोधते' या मथळ्याखाली तिचं स्वागत झालं. अमेरिकन टीव्हीनं बीटल्सपेक्षा तिला अग्रक्रम दिला. जगप्रसिद्ध बीटल्स आणि ब्रिजिट एकाच वेळी तेथे आले होते; पण ब्रिजिटनं त्यांच्यावर मात केली प्रचड गर्दी, धक्काबुक्की, ट्रॅफिक जाम आणि रस्ता भरून पोलीस हे ब्रिजिटला नेहमीचंच होतं. ब्रिजिटवर वृत्तपत्रांनी भरपूर लिहिले. तिच्या मुलाखतीदेखील चांगल्या झाल्या आणि त्यामुळे 'व्हिवा मारिया'ची अगदी जोरदार प्रसिद्धी झाली.

आणि सगळयात महत्वाचे म्हणजे अमेरिकन पत्रकाराच्या प्रश्न विचारण्याच्या पद्धतीमुळे ब्रिजिट किती हुशार आहे, किती तर्कशुद्ध विचार करते याची आणि ब्रिजिट व्यक्तिमत्वाची अमेरिकेला ओळख झाली.

१९६६ च्या सुमारास गुथर सॅक्सची ब्रिजिटच्या जीवनात एंट्री झाली. या वेळेपावेतो बॉब झॅगुरीची सद्दी संपली होती. केवळ नावालाच तो ब्रिजिटबरोबर असायचा. बॉब राहील असं वाटलं होतं; पण दुर्दैवानं फार काळ तो टिकू शकला नाही. गुथर तसा ब्रिजिटला योग्य मनुष्य होता. शिवाय पूर्वायुष्यामध्येसुद्धा ब्रिजिटप्रमाणेच त्याच्या आयुष्यामध्ये घडले होते. एवढ्या गोष्टी

जमल्या तर ब्रिजिटला पुरेसे होते. गुथरची 'प्लेबॉय' इमेज होती. सिनेटर एडवर्ड केनेडीबरोबर त्याचे मित्रत्वाचे संबंध होते.

ब्रिजिट आणि गुथर यांचा अध्याय आता सुरू झाला. गुथर अतिशय श्रीमंत होता आणि त्याची राहाण्याची पद्धत ब्रिजिटला पटणारी होती. बॉबला कळून चुकले की आता आपले स्थान संपले.

'गुंथर'चे नाव ब्रिजिटशी जोडले जात असतानाच गुथरच्या मुलाखती प्रसिद्ध होऊ लागल्या. त्यातून लोकानी अदाज केला की गुथर लवकरच श्री. बार्दो होण्याची शक्यता आहे.

'लास व्हेगास'मध्ये गुथर आणि ब्रिजिट विवाहबद्ध झाले. गुथरचा मित्र एडवर्ड केनेडी याने बरीच व्यवस्था केली होती. गुथर हा जर्मन असल्याने बातमी अशी आली.

'पंचवीस वर्षाच्या इतिहासात जर्मनीचा फ्रान्सवर दुसरा ऐतिहासिक विजय.'

पण ब्रिजिटच्या नशिबी अजून संसारसौख्य नव्हते. पहिला बहर ओसरल्यावर त्याच्या लक्षात आले की आपण एकमेकाना योग्य नाही आहोत. ब्रिजिट सिनेमात गुतली आणि गुथर परत आपल्या उद्योगाला लागला. गुथरला राग येण्यासारखे तिने काही केले की गुंथर सरळ परदेश दौऱ्यावर निघून जायचा. तिला समजावून सागायच्या भानगडीत पडायचा नाही. ब्रिजिटला शूटिंगसाठी वेगवेगळया देशात जायला लागायचे. त्यावेळी तो काही बरोबर नसायचा. तो स्वतः अतिशय श्रीमंत असल्याने त्याचे स्वतःचे एक बडे वर्तुळ असायचे. 'ब्रिजिटचा नवरा' एवढीच त्याची ओळख नव्हती आणि आतापर्यंत स्वैर राहिलेल्या ब्रिजिटला नवऱ्याची बडदास्त ठेवणे जमत नव्हते.

परिणामी भांडणे, ताटातूट, पुनर्मिलन वगैरे प्रकार चालू झाले. ब्रिजिट एकाकी पडत गेली आणि तिचे तिसरे लग्नही मोडणार असा रागरंग दिसू लागला.

## निवृत्तीनंतर

युआॅन लाईड नावाच्या एका तरुण ब्रिटिश दिग्दर्शकाच्या डोक्यात एक कल्पना आली. 'शालाको' नावाचे एक टेक्सास स्क्रिप्ट त्याच्याकडे होते. हेन्री फोंडा आणि एक ऑस्ट्रेलियन नटी असं त्याच्या डोक्यात सुत्र होत. पण अचानक त्यानं इरादा बदलला त्यानं 'सीन कॉनरी'ला गाठलं. सीन जेम्स बाँड म्हणून विश्वविख्याती पावला होता.

पण त्याला बाँडपटापेक्षा वेगळा चित्रपट हवा होता. त्यामुळे त्याने रुकार दिला पण ती ऑस्ट्रेलियन नटी त्याला मंजूर नव्हती. अचानक त्याला ब्रिजिट बार्दोची आठवण झाली. एवढी मोठी अभिनेत्री म्हटल्यावर आपली कथा विलक्षण चालेल अस त्याला वाटलं. ब्रिजिटला वेळ आहे अस कळल्यावर त्यानं सीन कॉनरीला फोन लावला. पहाटेचे ३ वाजले होते.

'असा यावेळी का फोन केलास?' त्रस्त सुरात सीन कॉनरी म्हणाला.

'मी फक्त दोन शब्द सागणार आहे. ब्रिजिट बार्दो.' 'मार डाला' सीन कॉनरी म्हणाला आणि त्याने फोन खाली ठेवला.

ब्रिजिटला शॅलाकोची कथा आवडली. सीन कॉनरीची आणि तिची मुलाखत झाली. सीनचे आणि तिचे इतके छान सूत्र जमले की चित्रपटात त्यांची जोडी एकदम हिट्ट होणार अशी युआॅन लॉईडसह सर्वांची खात्री झाली.

'शॅलाको'ची प्रसिद्धी चालू झाली आणि पुन्हा एकदा युरोपात ब्रिजिट वारे वाहू लागले. टीव्हीवर ब्रिजिटचे काही कार्यक्रम झाले.

ब्रिजिटच्या आवाजात एक रेकॉर्डही निघाली होती. या रेकॉर्डचा संगीतकार आणि ब्रिजिट याच्याबद्दल वावड्या उडू लागल्या तेव्हा गुथर सॅक्सने आपला प्रभाव वापरून त्या रेकॉर्डस् जप्त केल्या.

'शॅलाको'चे शुटिंग चालू झाले तेव्हा ब्रिजिटला ठिकठिकाणी शुटिंगसाठी जावे लागले. गुथर अधूनमधून यायचा. ब्रिजिटला त्याची गरज होती. पण तो थाबत नसे. त्यामुळे ब्रिजिटची मन शाती बिघडली.

'शॅलाको' एकदाचे पूर्ण झाले. समीक्षकानी तिच्या 'इग्लिश'ची टर उडवली; पण प्रेक्षकाना मात्र तिचे काम आवडले. ब्रिजिटच्या उत्कृष्ट चित्रपटात त्याची गणना होते. ब्रिजिटने मात्र सगळे श्रेय सीन कॉनरीला दिले, 'तो सीन कॉनरीचा चित्रपट आहे.' ती म्हणाली. 'त्यानं सगळ ओझ आपल्या खाद्यावर वाहिलं आहे.'

धदेवाईकदृष्ट्या यशस्वी होत असतानाच गुथरबरोबरचा तिचा विवाह सपुष्टात आला. दोघानीही विवाह टिकविण्याची धडपड सोडून दिली. १९६९ मध्ये तिला रीतसर घटस्फोट मिळाला.

त्यानंतर ब्रिजिट पूर्णपणे सिनेमात गुतली. अनेक चित्रपट तिने पूर्ण केले. पण आता मात्र तिचे वय वाढत असल्याचे दिसू लागले होते. व्हॅदीमने तिच्यासाठी काही कथा लिहिल्या पण तरीसुद्धा तो ब्रिजिटला फारशी मदत करू शकला नाही. नव्या दमाच्या तरुण नटचा आणि लोकाची बदलत चाललेली रूची या गोष्टीशी जमवून घेणे तिला कठीण वाटू लागले.

तिचा चाहता वर्ग अजूनही कायम होता. पण तोही तिच्याबरोबरच वयाने वाढत होता. अशावेळी ब्रिजिटने निवृत्तीची घोषणा केली तेव्हा अनेकांच्या समिश्र प्रतिक्रिया प्रसिद्ध झाल्या. अर्थात अजूनही ब्रिजिट जगातील टॉपच्या ताऱ्यामध्ये होतीच.

तिने चाळीशी पार पाडली होती. सेक्सी चित्रपटाचा तिला आता कटाळा येऊ लागला होता. आपण साधं आयुष्य जगावं असं तिला वाटू लागलं होतं.

अशावेळी 'मिरोस्लेव ब्रोझेक' या मूर्तीकाराशी तिची भेट झाली. 'तिनं माझ्या डोळ्यात पाहून शब्दापलिकडचे सागितले' मिरोस्लेव म्हणाला आणि आम्ही प्रेमात पडलो.

प्रत्येक खेपेला असेच घडत आले होते पण या खेपेला ब्रिजिट बदलली होती. आता पूर्वीसारखे घडू नये अस तिला वाटत होतं.

फ्रान्स सरकारने तिला प्रसिद्धी विभागाकडे घेतले तेव्हा ब्रिजिटला चित्रपटात रूची राहिली नव्हती. फ्रान्सकडे पर्यटकाचे लक्ष वेधावे म्हणून ब्रिजिटकडून फ्रान्स सरकारने पर्यटनस्थळाचे वर्णन करून घेतले. ही टेलीफिल्म ब्रिजिटने अतिशय चागली पेश केली. त्यामुळे सरकार दफ्तर आणि मायबाप प्रेक्षक खूष झाले. त्यानतर ब्रिजिटने अनेक जाहिरातपटात काम केले.

आज ब्रिजिटने वयाची पन्नाशी ओलांडलेली आहे. पूर्वीसारखी ती दिसत नसली तरी तिचे शरीर अजूनही पूर्वीसारखेच उत्साही आहे. आता तिचा जास्त वेळ समाजकार्याकडे खर्च होतो. विशेषत मुक्या जनावरात तिला फार रस आहे. तिच्या अव्याहत प्रयत्नामुळे 'सील'च्या शिकारीवर बधने आली. या प्रकरणी कॅनडा सरकारला आंतरराष्ट्रीय न्यायालयात खेचण्यापर्यंत ती आली होती. याबद्दल फ्रेंडस् ऑफ दी ॲनिमल सारख्या सस्था तिच्या सदैव ऋणी राहतील.

'ब्रिजिट' म्हणजे एक युगप्रवर्तक स्त्री-या अर्थाने की तिने सिनेमात एक नवे युग

चालू केले. 'ब्रिजिट बार्दो' म्हणजे आदर्श सौंदर्य ही सकल्पना एवढी मोठी होती की एका जमान्यात सगळ्या पोरी बार्दो स्टाईलने हिंडत असत. खरी ब्रिजिट दुकानात आली तरी दुकानदाराना अदाज लागत नसे.

'पॅब्लो पिकासो' सारख्या महान चित्रकाराला ब्रिजिटचं सौंदर्य रेखाटायला कुचला अपुरा वाटला यातच ब्रिजिटची थोरवी आहे. □

रंगभूमी

## लालन सारंगांचा :
# भूमिकांचा आत्मशोध घेणारा बहुरूपी कार्यक्रम

गेले काही महिने लालन सारंग ही अभिनेत्री बहुरूपी कार्यक्रम पेश करीत आहे. या कार्यक्रमाचे स्वरूप काहीसे बेगळ्या प्रकारचे आहे. म्हणजे असे की, दुसऱ्या कोणा लेखकाने लिहून दिलेला किंवा स्वत: नव्याने लिहिलेला हा कार्यक्रम नाही, तर तो तिने आजपर्यंत ज्या महत्त्वाच्या भूमिका रंगभूमीवर केल्या त्याचे दर्शन झलकरूपाने घडविणारा कार्यक्रम आहे.

कार्यक्रमाचे निराळेपण स्वत:च्या भूमिकाच्या दर्शनात जसे आहे तसे कार्यक्रमाच्या मांडणीत आणि प्रकटीकरणातही आहे. केवळ आपण आजवर केलेल्या भूमिकाचे दर्शन घडवून घटकाभर मनोरंजन करावे एवढाच हेतू त्यामागे नसावा. तर त्या रंजनाबरोबरच आत्मकथनाची जोड देऊन लालनने माणूस आणि कलावत अशा दोन पातळ्यांवर घेतलेला शोधही तितकाच महत्त्वाचा आहे. एखादी भूमिका आपल्याकडे कशी आली किंवा आरभी ती येणार नव्हती, पण कालातराने ती भूमिका कशी आली आणि ती आपण कशी पेश केली त्याचा योग्य तो तपशील येथे सागितला जातो. या तपशिलात काही गोष्टी विशेष लक्षवेधी अशा वाटल्या. उदाहरणार्थ एक स्त्री म्हणून, माता, पत्नी आणि अभिनेत्री अशा विविध भूमिकातून जाताना येणारा अनुभव विलक्षण बोलका होता. यामुळे केवळ माहिती मिळत नव्हती तर लालनचे एकूणच 'घडणे' कसे आहे त्याचाही अदाज येत होता.

अनुभव कथन, काही भाष्य आणि भूमिकेचा काही तपशील असे या कार्यक्रमाचे स्वरूप आहे. माणूस आणि कलावंत यांच्या संदर्भातील कथनात किंवा दर्शनात कोठेही मूळचे सूत्र सुटले नाही. कोणत्याही कथनात अकारण पाल्हाळ, विस्तार जाणवला नाही. एक आखीव तरीही उत्स्फूर्त असा बांधेसूद कार्यक्रम असेच याचे वर्णन करावे लागेल.

अनेकदा असे होते की, एखादी अभिनेत्री आपण रंगमचावर पाहतो. तिच्या काही भूमिका आपल्याला आवडतात, काही नावडतात. त्या त्या वेळी आपण आपली प्रतिक्रिया व्यक्तही करतो. त्यातले काही स्मरणात राहते, काही विस्मरून जाते. लालनच्या बाबतीतही तिने केलेल्या सर्वच भूमिका सर्वांच्या ध्यानात राहतील असे कोणीच म्हणणार नाही. काही विशिष्ट भूमिकामुळे तो कलावत आपल्या मनात दीर्घ काळ राहतो. लालनच्या सदर्भात 'सखाराम बाइंडर' मधली चंपा ही अशीच अविस्मरणीय भूमिका. किंबहुना लालन आणि चंपा हे मराठी रगभूमीवरचे एक अवीट समीकरण आहे. वास्तविक चंपाची भूमिका प्रथम तिच्याकडे आली नाही; पण नंतर ती आली. तेव्हा तिने त्याचे सोने केले असेच म्हणावे लागेल. या चपामुळे तिला जसा नावलौकिक, पैसा मिळाला तसाच मनस्तापही खूप सोसावा लागला. (अधिक तपशील 'बाइंडरचे दिवस' या कमलाकर सारंगाच्या पुस्तकात वाचावयास मिळतो) या चपाचे बसणे, उठणे, बोलणे आणि एकूणच वागणे बिनधास्तपणे कसे झाले ते साभिप्राय व्यक्त होत असतानाच आपण अनुभवायला हवे असे आहे.

आपल्याकडे एखाद्या कलावंताने एखादी भूमिका समरसून केली आणि ती लोकप्रिय झाली की, त्याच पद्धतीची नाटके-भूमिका त्या कलावताकडे मोठ्या प्रमाणात येतात. अशा चक्रात लालनही सापडली. 'बेबी', 'जंगली कबूतर' आदी काही बिनधास्त नाटकातून लालनने भूमिका जरूर केल्या, पण ती त्या आवर्तात अडकून राहिली नाही. नव्या, वेगळ्या, आव्हानात्मक भूमिकाचा शोध घेत ती राहिली. तो शोध आपण कसा घेतला, काही आपल्यापर्यंत कसा आला याचा अगदी मोजका भाग कथन करून काही नाटकातील भूमिकाचे वेगळेपण, निराळे वळण कसे स्वीकारले ते तिने साभिनय करून दाखवले. त्यामध्ये कमला, सूर्यास्त, रथचक्र आदी नाटकातील भाग प्रेक्षकाना खिळवून ठेवणारा होता. हे सागता सांगताच स्त्रीची विविध रूपे या निमित्ताने आपण कशी व्यक्त केली तेही सूत्र गाभीर्याने माडले आहे.

लालनने जेव्हा आपल्या भूमिका दर्शनाचा कार्यक्रम काही दिवसापूर्वी जाहीर केला तेव्हा काहीच्या मनी अशीही शका आली असणार की, लालन आता रंगभूमी निवृत्तीचा विचार तर करीत नाही ना? पण प्रत्यक्ष कार्यक्रम पाहात असताना किंवा नंतरही अशा शकेचे निरसन सहजपणाने होऊ शकते. एक तर लालनने रगभूमीवरून निवृत्त व्हावे असे काहीही घडलेले नाही. कलावत म्हणून तिने निराश व्हावे अशीही काही परिस्थिती नाही. फार तर एका पाठोपाठ अनेक नाटके-भूमिका, त्याचे दौरे यामुळे कटाळा येणे आपण समजू शकतो. तो काही काळापुरताच असतो. क्षणकालाची मरगळ निघून गेल्यावर जे ताजेपण येते ते पुढच्या प्रवासाला अधिक वेग आणणारे ठरले. तसेच हे असणार! असावे!

हा कार्यक्रम पाहात असताना असे मनात येऊन गेले की, रगभूमीवरच्या जाणत्या, लोकप्रिय कलावंतानी आयुष्याच्या मध्यावर आल्यावर असा एखादा प्रयोग करून पाहायला हरकत नाही. चर्चा-मुलाखतीतून काही कलावंत आपल्या कलायुष्याबद्दल, आपण केलेल्या भूमिकांबद्दल काहीबाही बोलत असतात. त्यातला काही भाग विचार करण्याजोगा असतोही. पण त्या विचारांना-अनुभवांना-चिंतनाला प्रात्यक्षिकाची जोड देऊन तो साराच कलात्मक अनुभव जनसामान्यापर्यंत पोहोचवायला काहीच हरकत नसावी! निदान तसा प्रयत्न व्हायला हरकत नसावी! कदाचित या प्रयत्नामुळे काहीसे तटस्थपणाने निवातपणे आपल्याच कलायुष्याचा वेध घेण्याची सधी लाभेल. पुढच्या प्रवासासाठी काही सूचनाही मिळेल.

लालन सारंगला आता विनंती अशी की, हा 'भूमिका विचार-दर्शना'चा कार्यक्रम अनेक गावी तिला करता आला तर पाहावा. कारण या कार्यक्रमाला रंगमचावरच्या नेहमीच्या कोणत्याच तंत्रसाधनाची आवश्यकता नाही. कोणताच पसारा नाही. त्यामुळे हा प्रयोग साध्या हॉलमध्येही करता येईल.

प्रयोगाबरोबरच आणखीही एक गोष्ट तिने करावीशी वाटते ती म्हणजे या भूमिकांच्या सदर्भात केलेला विचार पुस्तकरूपाने व्यक्त व्हावा. तो आणखी किती तरी लोकापर्यंत पोहोचेल!

ज्याना लालन सारंग ही व्यक्ती आणि कलाकृती म्हणून माहीत आहे त्यांनी आणि ज्याना ही सर्वार्थाने 'दुरुन' माहिती आहे त्यांनी अशा दोघांनीही हा कार्यक्रम जरुर पाहावा असा आहे!

—वि. भा. देशपांडे

' अनेक वर्षांपूर्वी आम्ही नियतीशी एक करार केला होता.
आज तो पूर्ण झाला . . . . '

—जवाहरलाल नेहरू, १५ ऑगस्ट १९४७

. . . . करार केला ह्यूम, दादाभाई, सुरेंद्रनाथांनी.
टिळक-गोखले-गांधीजी-नेहरू तो पूर्ण करण्यासाठी आजन्म झगडले.
इंडियन नॅशनल काँग्रेस हे त्या कराराचं मूर्त रूप.
२८ डिसेंबर १९८५ ला शंभर वर्षे पूर्ण होत असलेल्या
काँग्रेसची ही बखर.
दादाभाई नवरोजी ते राजीव गांधी
या सहा पिढ्यांच्या नेतृत्त्वाची घडण नि
त्यांचं कर्तृत्व यांची कहाणी !

# ॥ बखर काँग्रेसची ॥

# ॥ बखर काँग्रेसची ॥

**शिरीष सहस्रबुद्धे**

पृष्ठे : ३०० : आकार : डेमी
किंमत : ७५ रुपये ( किमान )
शताब्दीनिमित्त खास सवलत : ६० रुपये
सवलत २६ जानेवारी १९८६ पर्यंत

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०, फोन : ४४ ३४ ५९

वा. र. गोडे, ४१ भवानी शंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर, दादर
मुंबई : ४०० ०२८ * फोन : ४२२ ५४५५